भारत सरकार

**विधि व न्याय मंत्रालय**

सत्यमेव जयते

# कर्मचारी भविष्यनिर्वाह निधी आणि संकीर्ण उपबंध अधिनियम, १९५२

**(सन १९५२ चा अधिनियम क्रमांक १९)**

[३१ मार्च १९९८ रोजी यथाविद्यमान]

# The Employee's Provident Funds and Miscellaneous Provisions Act, 1952

**(Act No. 19 of 1952)**

*[As in force on the 31st March 1998]*

संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले

२००७

[ किंमत : रुपये ३०.०० ]

# प्राक्कथन

या आवृत्तीत, दिनांक १ जून १९९८ रोजी यथाविद्यमान असलेला दि एम्प्लॉईज प्रॉव्हिडन्ट फन्ड्स् अॅन्ड मिसलेनिअस प्रोव्हिजन्स अॅक्ट, १९५२ याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ **भारताचे राजपत्र,** असाधारण, भाग बारा, अनुभाग १, खंड ९ अंक ३ दिनांक १५ ऑक्टोबर १९९८ यात पृष्ठ २०८ ते २५० मध्ये प्रकाशित करण्यात आला होता. हा प्राधिकृत मराठी पाठ प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ, उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

नवी दिल्ली,
दिनांक १५ ऑक्टोबर १९८८.

**डॉ. रघबीर सिंग,**
सचिव, भारत सरकार.

# PREFACE

This edition of the The Employees' Provident Funds and Miscellaneous Provisions Act, 1952 as on the 1st June 1998 contains the authoritative text of that Act in Marathi which was published in *Gazette of India,* Extraordinary Part XII, Section 1, No. 3, Vol. 9, dated 15th October 1998 on pages 208 to 250.

This authoritative text was published under the authority of the President under section 2, clause *(a)* of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the authoritative text of that Act in Marathi.

New Delhi,
Date 15th October 1998.

Dr. RAGHBIR SINGH,
Secretary to the Government of India.

# कर्मचारी भविष्यनिर्वाह निधी आणि संकीर्ण उपबंध अधिनियम, १९५२

## कलमांचा क्रम

कलमे


१. संक्षिप्त नाव, विस्तार व प्रयुक्ती.

२. व्याख्या.

२ क. आस्थापनेमध्ये सर्व विभाग व शाखा समाविष्ट असणे.

३. दुसऱ्या आस्थापनेबरोबर सामाईक भविष्यनिर्वाह निधी असलेल्या आस्थापनेला अधिनियम लागू करण्याची शक्ती.

४. अनुसूची एकमध्ये भर घालण्याची शक्ती.

५. कर्मचारी भविष्यनिर्वाह निधी योजना.

५ क. केंद्रीय मंडळ

५ ख. राज्य मंडळ

५ ग. विश्वस्त मंडळ हे निगम-निकाय असणे.

५ घ. अधिकाऱ्यांची नियुक्ती.

५ घघ. केंद्रीय मंडळ किंवा त्याची कार्यकारी समिती किंवा राज्य मंडळ यांच्या कृती व कार्यवाही विवक्षित कारणांवरून विधिबाह्य ठरवल्या जाणार नाहीत.

५ ङ. प्रत्यायोजन

६. अंशदाने आणि योजनांमध्ये ज्यासाठी उपबंध करता येतील अशा बाबी.

६ क. कर्मचारी निवृत्तिवेतन योजना.

६ ख. केंद्र शासनाचे विशेष अनुदान.

६ ग. कर्मचारी ठेव संलग्न विमा योजना.

६ घ. योजना संसदेपुढे ठेवणे.

७. योजनेतील फेरबदल.

७ क. सेवायोजकांकडून देय असलेल्या रकमांचे निर्धारण.

७ ख. कलम ७ क अन्वये देण्यात आलेल्या आदेशांचे पुनर्विलोकन.

७ ग. नजरेतून सुटलेली रक्कम निर्धारित करणे.

७ घ. कर्मचारी भविष्यनिर्वाह निधी अपिलीय अधिकरण.

७ ङ. पदावधी.

७ च. राजीनामा.

७ छ. अध्यक्ष, अधिकाऱ्याचे वेतन व भत्ते आणि त्याच्या सेवेच्या इतर अटी व शर्ती.

७ ज. अधिकरणाचा कर्मचारीवर्ग.

७ झ. अधिकरणाकडे अपिले.

७ ञ. अधिकरणाची कार्यपद्धती.

७ ट. सादरकर्त्या अधिकाऱ्याची नियुक्ती करतेवेळी विधिव्यवसायी व शासन इत्यादीचे साहाय्य घेण्याचा अपीलकर्त्याचा अधिकार.

७ ठ. अधिकरणाचे आदेश.

७ ड. रिक्त पदे भरणे.

७ ढ. अधिकरण घटित करणाऱ्या आदेशाची अंतिमता.

७ ण. अपील दाखल करतेवेळी देय रक्कम जमा करणे.

**कलमे**


७ त. विवक्षित अर्जाचे अधिकरणांकडे हस्तांतरण

७ थ. सेवायोजकाकडून प्रदेश व्याज.

८. सेवायोजकांकडून देय असलेल्या रकमांच्या वसुलीची पद्धत.

८ क. सेवायोजक आणि कंत्राटदार यांनी रकमा वसूल करणे.

८ ख. वसुली अधिकाऱ्याच्या नावे प्रमाणपत्र काढणे.

८ ग. ज्याच्याकडे प्रमाणपत्र पाठवायचे तो वसुली अधिकारी.

८ घ. प्रमाणपत्राची विधिग्राह्यता आणि त्यांचे विशोधन.

८ ङ. प्रमाणपत्रान्वये करावयाच्या कार्यवाहीची स्थगिती आणि त्याचे विशोधन किंवा ते काढून घेणे.

८ च. वसुलीच्या इतर पद्धती.

८ छ. आयकर अधिनियमाच्या विवक्षित उपबंधाची प्रयुक्ती.

९. १९२२ च्या अधिनियम ११ खाली निधीस मान्यता देणे.

१०. जप्तीपासून संरक्षण.

११. अंशदानाच्या प्रदानाला अन्य ऋणांवर प्राथम्य देणे.

१२. नियोक्त्याचे वेतन इत्यादी कमी न करणे.

१३. निरीक्षक.

१४. शास्ती.

१४ क. कंपन्यांनी केलेले अपराध.

१४कक. पूर्वीच्या दोषसिद्धीनंतर विवक्षित प्रकरणांत वाढीव शिक्षा.

१४कख. विवक्षित अपराध दखलपात्र असणे.

१४कग. अपराधांची दखल आणि संपरीक्षा.

१४ ख. नुकसानभरपाई वसूल करण्याची शक्ती.

१४ ग. न्यायालयाची आदेश देण्याची शक्ती.

१५. विद्यमान भविष्यनिर्वाह निधीसंबंधी विशेष उपबंध.

१६. विशिष्ट आस्थापनांना अधिनियम लागू नसणे.

१७. सूट देण्याची शक्ती.

१७ क. खात्याचे हस्तांतरण.

१७ कक. सन १९५६ चा अधिनियम क्रमांक ३१ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी प्रस्तुत अधिनियम अंमलात येणे.

१७ ख. आस्थापनेच्या हस्तांतरणाच्या प्रकरणी दायित्व.

१८. सद्‌भावपूर्वक केलेल्या कृतीचे संरक्षण.

१८ क. अध्यक्षीय अधिकारी व इतर अधिकारी लोकसेवक असतील.

१९. शक्तींचे प्रत्यायोजन.

२०. केंद्र शासनाची निदेश देण्याची शक्ती.

२१. नियम करण्याची शक्ती.

२२. अडचणी निवारण्याची शक्ती.

**पहिली अनुसूची.**

**दुसरी अनुसूची.**

**तिसरी अनुसूची.**

**चौथी अनुसूची.**

# कर्मचारी भविष्यनिर्वाह निधी आणि संकीर्ण उपबंध अधिनियम, १९५२

**(१९५२ चा अधिनियम क्रमांक १९)**

(३१ मार्च १९९८ रोजी यथाविद्यमान)

[ १४ मार्च १९५२ ]

**कारखाने आणि अन्य आस्थापना यांमधील कर्मचाऱ्यांसाठी भविष्यनिर्वाह निधी [१][[२][ निवृत्तिवेतन निधी ] आणि ठेवसंलग्न विमा निधी ] सुरू करण्यासाठी, उपबंध करण्याकरिता अधिनियम.**

संसदेद्वारे तो पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो :—

**१.** [३][ (१) या अधिनियमाला "कर्मचारी भविष्यनिर्वाह निधी आणि संकीर्ण उपबंध अधिनियम, १९५२" असे म्हणता येईल. ] **संक्षिप्त नाव, विस्तार व प्रयुक्ती.**

(२) जम्मू आणि काश्मीर राज्य खेरीजकरून संपूर्ण भारतभर त्याचा विस्तार आहे.

[४][ (३) कलम १६ मधील उपबंधाच्या अधीनतेने, तो पुढील आस्थापनांना लागू होईल :—

(क) जी आस्थापना अनुसूची एक मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही उद्योगात गुंतलेला एक कारखाना आहे आणि ज्यामध्ये [५][ वीस ] किंवा त्याहून अधिक व्यक्ती नोकरीस लावल्या आहेत, अशी प्रत्येक आस्थापना, आणि

(ख) ज्यामध्ये [५][ वीस ] किंवा त्याहून अधिक व्यक्ती नोकरीस लावल्या आहेत, अशी अन्य कोणतीही आस्थापना किंवा केंद्र शासन **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे याबाबतीत विनिर्दिष्ट करील अशा आस्थापनांचा वर्ग :

परंतु, केंद्र शासन, आपल्या तसे करण्याच्या उद्देशाबाबत किमान दोन महिन्यांची नोटीस दिल्यानंतर, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाचे उपबंध, त्या अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल त्याप्रमाणे [५][ वीस ] पेक्षा कमी व्यक्तींना नोकरीस लावणाऱ्या कोणत्याही आस्थापनेस लागू करू शकेल. ]

[६][ (४) या कलमाचे पोटकलम (३) किंवा कलम १६ चे पोटकलम (१) यात काहीही अंतर्भूत असले तरी, ज्यावेळी केंद्रीय भविष्यनिर्वाह निधी आयुक्ताला, या बाबतीत त्याच्याकडे करण्यात आलेल्या अर्जावरून किंवा अन्यथा, असे आढळेल की, कोणत्याही आस्थापनेच्या संबंधात सेवायोजक आणि बहुसंख्य कर्मचारी यांच्यामध्ये, या अधिनियमाचे उपबंध त्या आस्थापनेला लागू करण्याबाबत सहमती झालेली आहे, त्यावेळी त्याला **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे या अधिनियमाचे उपबंध अशा कराराच्या दिनांकापासून किंवा अशा करारात विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या कोणत्याही नंतरच्या दिनांकापासून त्या आस्थापनेला लागू करता येतील. ]

[७][ (५) ज्या आस्थापनेला हा अधिनियम लागू झाला असेल त्या आस्थापनेत नोकरीस लावलेल्या व्यक्तींची संख्या कोणत्याही वेळी वीसपेक्षा कमी झाली तरी ती आस्थापना या अधिनियमाद्वारे शासित होणे चालू राहील :

[८]* * * * * *

---

[१] १९७६ चा अधिनियम ९९, कलम १६ अन्वये मूळ मजकुराऐवजी दाखल केले (१ ऑगस्ट, १९७६ रोजी व तेव्हापासून).

[२] १९९६ चा अधिनियम २५, कलम २ अन्वये "कुटुंब वेतन निधी" या मजकुराऐवजी दाखल केले.

[३] १९७६ चा अधिनियम ९९, कलम १७ अन्वये पोटकलम (१) ऐवजी दाखल केले (१ ऑगस्ट, १९७६ रोजी व तेव्हापासून).

[४] १९५६ चा अधिनियम ९४, कलम २ अन्वये पोटकलम (३) ऐवजी दाखल केले.

[५] १९६० चा अधिनियम ४६, कलम २ अन्वये "पन्नास" या शब्दाऐवजी दाखल केले (३१ डिसेंबर, १९६० रोजी व तेव्हापासून).

[६] १९८८ चा अधिनियम ३३, कलम २ अन्वये मूळ मजकुराऐवजी दाखल केले.

[७] १९६० चा अधिनियम ४६, कलम २ अन्वये समाविष्ट केले (३१ डिसेंबर, १९६० रोजी व तेव्हापासून).

[८] १९७१ चा अधिनियम १६, कलम १३ अन्वये परंतुक गाळले (२३ एप्रिल, १९७१ रोजी व तेव्हापासून).

व्याख्या. २. संदर्भानुसार अन्यथा आवश्यक नसेल तर या अधिनियमात :—

[१][ (क्) " समुचित शासन " याचा अर्थ,—

(एक) केंद्र शासनाच्या मालकीच्या किंवा त्याच्या नियंत्रणाखालील आस्थापनेच्या किंवा रेल्वे कंपनी, प्रमुख बंदर, खाण किंवा तेलक्षेत्र यांच्याशी संबंधित आस्थापनेच्या किंवा नियंत्रित उद्योगाच्या [२][किंवा एकाहून अधिक राज्यांमध्ये विभाग किंवा शाखा असणाऱ्या आस्थापनेच्या बाबतीत ] केंद्र शासन, असा आहे ; आणि

(दोन) अन्य कोणत्याही आस्थापनेच्या बाबतीत राज्य शासन, असा आहे ; ]

[३][ (कक्) " प्राधिकृत अधिकारी " याचा अर्थ, केंद्रीय भविष्यनिर्वाह निधी आयुक्त, अपर केंद्रीय भविष्यनिर्वाह निधी आयुक्त, प्रादेशिक भविष्यनिर्वाह निधी आयुक्त किंवा केंद्र शासनाकडून **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियुक्त करण्यात येईल असा अन्य कोणताही अधिकारी, असा आहे ; ]

(ख) " मूळ वेतन " याचा अर्थ, कर्मचाऱ्याला, तो कर्तव्यस्थ असताना किंवा [४][भरपगारी रजा व सुटी या दोन्हीपैकी कोणत्याही एका प्रकरणी ] सेवायोजनाच्या करारातील अटींनुसार मिळालेली आणि त्याला रोख रकमेत दिली गेलेली किंवा प्रदेय असणारी एकूण वित्तलब्धी, असा आहे. परंतु, यात पुढील रकमांचा समावेश होत नाही :—

(एक) कोणत्याही अन्नविषयक सवलतीचे रोख मूल्य ;

(दोन) कोणताही महागाई भत्ता (म्हणजेच राहणीमानाच्या खर्चातील वाढीबद्दल कर्मचाऱ्यांना कोणत्याही नावाने दिली जाणारी सर्व रोख प्रदाने), घरभाडे भत्ता, अतिकालिक भत्ता, बोनस, कमिशन किंवा कर्मचाऱ्याला त्याच्या नोकरीच्या किंवा अशा नोकरीत त्याने केलेल्या कामाच्या संबंधात देय असलेले अन्य कोणतेही तत्सम भत्ते ;

(तीन) सेवायोजकाने दिलेल्या कोणत्याही भेटवस्तू ;

(ग) " अंशदान " याचा अर्थ, एखाद्या सदस्याच्या बाबतीत एखाद्या योजनेनुसार देय असलेले अंशदान [५][किंवा ज्या कर्मचाऱ्याला विमा योजना लागू आहे त्याच्या बाबतीत देय असलेले अंशदान ], असा आहे ;

(घ) " नियंत्रित उद्योग " याचा अर्थ, लोकहिताच्या दृष्टीने ज्याचे नियंत्रण संघाकडून होणे समयोचित असल्याने केंद्रीय अधिनियमाद्वारे जाहीर केले गेले असेल असा कोणताही उद्योग, असा आहे ;

[६][ (ङ) " सेवायोजक " याचा अर्थ पुढीलप्रमाणे आहे :—

(एक) जी आस्थापना कारखाना आहे अशा आस्थापनेच्या संबंधात कारखान्यातल्या मालकाचा किंवा भोगवटादाराचा अभिकर्ता, मृत मालकाचा किंवा भोगवटादाराचा वैध प्रतिनिधी यांसह, असा कारखान्याचा मालक किंवा भोगवटादार, आणि एखाद्या व्यक्तीला कारखाने अधिनियम, १९४८ (१९४८ चा ६३) याच्या कलम ७ च्या पोटकलम (१) च्या खंड (च्) खाली कारखान्याचा व्यवस्थापक असे नाव देण्यात आले असेल तेव्हा, अशा नावाची व्यक्ती ; आणि

(दोन) अन्य कोणत्याही आस्थापनेच्या कामकाजाचे अंतिम नियंत्रण ज्या व्यक्तीकडे किंवा ज्या प्राधिकरणाकडे असेल ती व्यक्ती किंवा ते प्राधिकरण आणि जेव्हा ते उक्त कामकाजात व्यवस्थापक, व्यवस्थापन संचालक किंवा व्यवस्थापन अभिकर्ता यांच्यावर सोपवण्यात आले असेल तेव्हा असा व्यवस्थापक, व्यवस्थापन-संचालक किंवा व्यवस्थापन-अभिकर्ता ; ]

---

[१] १९५८ चा अधिनियम २२, कलम २ अन्वये मूळ खंडाऐवजी दाखल केले.

[२] १९६५ चा अधिनियम २२, कलम २ अन्वये समाविष्ट केले (२४ नोव्हेंबर, १९६४ रोजी व तेव्हापासून).

[३] १९८८ चा अधिनियम ३३, कलम ३(क्) अन्वये जादा दाखल केले (स्थायी आदेश क्रमांक ७१६(ङ्), दिनांक १५ जुलै, १९८८ अन्वये, दिनांक १ ऑगस्ट, १९८८ रोजी व तेव्हापासून).

[४] १९८८ चा अधिनियम ३३, कलम ३(ख्) अन्वये जादा दाखल केले (स्थायी आदेश क्रमांक ७१६(ङ्), दिनांक १५ जुलै, १९८८ अन्वये, दिनांक १ ऑगस्ट, १९८८ रोजी व तेव्हापासून).

[५] १९७६ चा अधिनियम ९९, कलम १८ अन्वये समाविष्ट केले (१ ऑगस्ट, १९७६ रोजी व तेव्हापासून).

[६] १९५६ चा अधिनियम ९४, कलम ४ अन्वये खंड (ङ्) ऐवजी दाखल केले.

(च्) " कर्मचारी " याचा अर्थ, ज्या व्यक्तीस कोणत्याही प्रकारच्या अंगमेहनतीच्या किंवा अन्य प्रकारच्या कामासाठी वेतनावर किंवा [1][ एखाद्या आस्थापनेत ] किंवा त्याच्या कामाच्या संबंधात नोकरीस लावले आहे, आणि जिला प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे तिचे वेतन सेवायोजकाकडून मिळते, अशी कोणतीही व्यक्ती, असा आहे ; आणि [2][ त्यामध्ये—

(एक) एखाद्या संविदाकाराकडून किंवा त्याच्यामार्फत अथवा आस्थापनेच्या कामासंबंधात नोकरीला लावलेल्या ;

(दोन) शिकाऊ उमेदवार अधिनियम, १९६१ (१९६१ चा ५२) अन्वये किंवा आस्थापनेच्या स्थायी आदेशान्वये कामावर लावलेल्या, कोणत्याही व्यक्तीचा समावेश होतो ;]

[3][ (च्च्) " सूट दिलेला कर्मचारी " याचा अर्थ, ज्याला कलम १७ [4]* * * * [ खाली सूट मंजूर करण्यात आली नसती तर, एखादी योजना [5][ किंवा, प्रकरणपरत्वे, विमा योजना ] लागू झाली असती असा कर्मचारी, असा आहे ;

(च्च्च्) " सूट दिलेली [1][ आस्थापना ] " याचा अर्थ, ज्या आस्थापनेच्या संबंधात, कोणत्याही योजनेचे [5][ किंवा, प्रकरणपरत्वे, विमा योजनेचे ] सर्व किंवा कोणतेही उपबंध अंमलात आणण्यापासून कलम १७ खाली सूट मंजूर करण्यात आली आहे, अशी [1][ आस्थापना ], असा आहे, मग अशी सूट त्या [1][ आस्थापनेला ] मंजूर करण्यात आली असो किंवा त्या आस्थापनेमध्ये नोकरीस ठेवलेल्या कोणत्याही व्यक्तीला किंवा व्यक्तीच्या वर्गाला मंजूर करण्यात आलेली असो ; ]

(छ्) " कारखाना " याचा अर्थ, ज्या कोणत्याही वास्तूत, तिच्या प्रसीमांसह कोणत्याही भागामध्ये, निर्मितीची प्रक्रिया विद्युतशक्तीच्या साहाय्याने किंवा विद्युतशक्तीच्या सहाय्याशिवाय चालवली जाते किंवा सर्वसामान्यपणे चालवली जाते, अशी कोणतीही वास्तू, असा आहे ;

[6]* * * * * *

(ज्) " निधी " याचा अर्थ, योजनेअन्वये स्थापन करण्यात आलेला भविष्यनिर्वाह निधी, असा आहे ;

(झ्) " उद्योग " याचा अर्थ, अनुसूची एकमध्ये विनिर्दिष्ट केलेला कोणताही उद्योग, असा आहे, आणि त्यामध्ये, कलम ४ खालील अधिसूचनेद्वारे त्या अनुसूचीमध्ये भर घातलेल्या अन्य कोणत्याही उद्योगाचा समावेश होतो ;

[7][ (झ्क्) " विमा निधी " याचा अर्थ, कलम ६ ग च्या पोट-कलम (२) अन्वये स्थापन करण्यात आलेला ठेवसंलग्न विमा निधी, असा आहे ;

(झ्ख्) " विमा योजना " याचा अर्थ, कलम ६ ग च्या पोट-कलम (१) अन्वये आखण्यात आलेली कर्मचारी ठेवसंलग्न विमा योजना, असा आहे ; ]

[8][ [9][ (झ्ग्) ] " निर्मिती " किंवा " निर्मितीची प्रक्रिया " याचा अर्थ, कोणत्याही वस्तूचा किंवा पदार्थाचा वापर, विक्री, परिवहन, सुपूर्दगी किंवा विनियोग करण्याच्या दृष्टीने वस्तू अथवा पदार्थ तयार करणे, त्यात फेरबदल करणे, त्याची दुरुस्ती करणे, तो शोभिवंत करणे, त्याला अंतिम रूप देणे, तो आवेष्टित करणे, त्यात वंगण लावणे, तो धुणे, साफसूफ करणे, फोडणे, पाडणे किंवा त्यावर अन्य संस्कार करणे किंवा अनुकूलन करणे यांसाठी करावयाची कोणतीही प्रक्रिया, असा आहे ; ]

---

[1] १९५६ चा अधिनियम ९४, कलम ३ अन्वये " एखाद्या कारखान्यात " या मजकुराऐवजी दाखल केले.

[2] १९८८ चा अधिनियम ३३, कलम ३ (ग्) अन्वये मूळ मजकुराऐवजी समाविष्ट केले (स्थायी आदेश क्र. ७१६ (ङ) दिनांक १५ जुलै १९८८ अन्वये दिनांक १ ऑगस्ट १९८८ रोजी व तेव्हापासून).

[3] १९५३ चा अधिनियम ३७, कलम ३ अन्वये समाविष्ट केले.

[4] १९६३ चा अधिनियम २८, कलम २ अन्वये पोट-कलम (१) हा मजकूर गाळला (३० नोव्हेंबर, १९६३ रोजी व तेव्हापासून).

[5] १९७६ चा अधिनियम ९९, कलम १८ अन्वये समाविष्ट केले (१ ऑगस्ट, १९७६ रोजी व तेव्हापासून).

[6] १९९६ चा अधिनियम २५, कलम ३ (क्) अन्वये खंड (छ्छ्) व (छ्छ्छ्) वगळण्यात आले.

[7] १९७६ चा अधिनियम ९९, कलम १८ अन्वये समाविष्ट केले (१ ऑगस्ट, १९७६ रोजी व तेव्हापासून).

[8] १९६३ चा अधिनियम २८, कलम २ अन्वये खंड (क्) ऐवजी दाखल केले (३० नोव्हेंबर, १९६३ रोजी व तेव्हापासून).

[9] १९७६ चा अधिनियम ९९, कलम १८ अन्वये खंड (झ्क्) ला खंड (झ्ग्) असा नवीन क्रमांक दिला (१ ऑगस्ट १९७६ रोजी व तेव्हापासून).

(ञ) " सदस्य " याचा अर्थ, निधीचा सदस्य, असा आहे ;

(ट) " कारखान्याचा भोगवटादार " याचा अर्थ, कारखान्याच्या कामकाजावर अंतिम नियंत्रण असणारी व्यक्ती, असा आहे आणि जेव्हा उक्त कामकाज एखाद्या व्यवस्थापन अभिकर्त्यावर सोपवलेले असेल, तेव्हा असा अभिकर्ता हा त्या कारखान्याचा भोगवटादार असल्याचे मानण्यात येईल ;

[१][ (टक) " निवृत्तिवेतन निधी " याचा अर्थ, कलम ६क, पोटकलम (२) अन्वये स्थापन करण्यात आलेला कर्मचारी निवृत्तिवेतन निधी, असा आहे ;

(टख) " निवृत्तिवेतन योजना " याचा अर्थ, कलम ६क पोटकलम (१) खाली तयार केलेली कर्मचारी व निवृत्तिवेतन योजना, असा आहे ; ]

[२][ (ठ) " योजना " याचा अर्थ, कलम ५ अन्वये आखण्यात आलेली कर्मचारी भविष्यनिर्वाह निधी योजना, असा आहे ; ]

[३][(ठ ठ) जो कर्मचारी निवृत्तिवेतन योजनेचा सदस्य आहे, त्याच्या संबंधात " नियत सेवावधी " याचा अर्थ, त्या कर्मचाऱ्याने वयाची ५८ वर्षे पूर्ण करणे, असा आहे ; ]

[४][ (ड) " अधिकरण " याचा अर्थ, कलम ७ घ अन्वये घटित करण्यात आलेले कर्मचारी भविष्यनिर्वाह निधी अपिलीय अधिकरण, असा आहे. ]

**आस्थापनेमध्ये सर्व विभाग व शाखा समाविष्ट असणे.**

[५][ **२क.** शंकानिरसनार्थ, याद्वारे असे जाहीर करण्यात येत आहे की, जेव्हा एखाद्या आस्थापनेमध्ये विविध विभाग असतील किंवा तिच्या शाखा असतील मग त्या एकाच ठिकाणी असोत किंवा वेगवेगळ्या ठिकाणी असोत, तेव्हा, असे सर्व विभाग किंवा शाखा त्याच आस्थापनेचे भाग असल्याचे समजण्यात येतील. ]

**दुसऱ्या आस्थापनेबरोबर सामाईक भविष्यनिर्वाह निधी असलेल्या आस्थापनेला अधिनियम लागू करण्याची शक्ती.**

[६][ **३.** जेव्हा एखाद्या आस्थापनेला हा अधिनियम लागू होण्याच्या लगतपूर्वी त्या आस्थापनेत नोकरीस लावलेले कर्मचारी आणि अन्य कोणत्याही आस्थापनेतील कर्मचारी यांच्यासाठी एखादा सामाईक भविष्यनिर्वाह निधी अस्तित्वात असेल, तेव्हा, केंद्र शासन **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, या अधिनियमांचे उपबंध अशा अन्य आस्थापनेलाही लागू होतील असा निदेश देऊ शकेल.

**पहिल्या अनुसूची मध्ये भर घालण्याची शक्ती.**

**४.** (१) केंद्र शासन **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे पहिल्या अनुसूचीमध्ये, ज्या उद्योगातील कर्मचाऱ्यांच्या संबंधात या अधिनियमाखाली भविष्यनिर्वाह निधी योजनेची आखणी करावी, असे त्याचे मत असेल, त्या कोणत्याही उद्योगाची भर घालू शकेल आणि त्यानंतर, अशा प्रकारे भर घालण्यात आलेला उद्योग हा या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ पहिल्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेला उद्योग असल्याचे मानण्यात येईल ;

(२) पोटकलम (१) खालील सर्व अधिसूचना, ह्या काढण्यात आल्यानंतर होईल तितक्या लवकर संसदेपुढे ठेवण्यात येतील.

---

[१] १९९६ चा अधिनियम २५, कलम ३ (ख) अन्वये मूळ खंडाऐवजी दाखल करण्यात आले.

[२] १९७१ चा अधिनियम १६, कलम १४ अन्वये खंड (ठ) ऐवजी दाखल केले (२३ एप्रिल, १९७१ रोजी व तेव्हापासून).

[३] १९९६ चा अधिनियम २५, कलम ३ (ग) द्वारे दाखल केले.

[४] १९८८ चा अधिनियम ३३, कलम ३ (ङ) द्वारे जादा दाखल करण्यात आले (स्थायी आदेश क्र. ७१६ (ङ) दिनांक १५ जुलै, १९८८ अन्वये, दिनांक १ ऑगस्ट, १९८८ रोजी व तेव्हापासून).

[५] १९६० चा अधिनियम ४६, कलम ३ अन्वये समाविष्ट केले (३१ डिसेंबर, १९६० रोजी व तेव्हापासून).

[६] १९५६ चा अधिनियम ९४, कलम ५ अन्वये मूळ कलमाऐवजी दाखल केले.

**५.** [१][ (१) ] केंद्र शासन **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे कर्मचाऱ्यांसाठी किंवा कर्मचाऱ्यांच्या कोणत्याही वर्गासाठी या अधिनियमाखाली भविष्यनिर्वाह निधी स्थापन करण्यासाठी कर्मचारी भविष्यनिर्वाह निधी योजना या नावाची एक योजना असू शकेल आणि उक्त योजना ज्यांना लागू होईल, त्या [२][ आस्थापना ] किंवा [२][ आस्थापनांचा ] वर्ग विनिर्दिष्ट करू शकेल [३][ आणि ही योजना आखण्यात आल्यानंतर शक्य होईल तितक्या लवकर, ह्या अधिनियमाच्या आणि योजनेच्या उपबंधानुसार एक निधी स्थापन करण्यात येईल. ] **कर्मचारी भविष्य-निर्वाह निधी योजना.**

[४][ (१क) हा निधी कलम ५क खाली स्थापन केलेल्या केंद्रीय मंडळाकडे निहित असेल व ते मंडळ त्याचे प्रशासन करील.

(१ख) या अधिनियमाच्या उपबंधाच्या अधीनतेने, पोटकलम (१) खाली आखलेल्या योजनेद्वारे, दुसऱ्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या सर्व बाबींसाठी किंवा त्यापैकी कोणत्याही बाबीसाठी उपबंध करता येतील.]

[३][ (२) पोटकलम १ खाली आखलेल्या योजनेद्वारे, असे उपबंधित करता येईल की, तिथे कोणतेही उपबंध, योजनेत याबाबतीत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा तारखेस, भविष्यलक्षी किंवा भूतलक्षी प्रभावाने अंमलात येतील. ]

[५][ **५क.** (१) केंद्र शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे त्यामध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा तारखेपासून, ज्या राज्यक्षेत्रांवर या अधिनियमांचा विस्तार आहे, त्या राज्यक्षेत्रांसाठी एक विश्वस्त मंडळ (या अधिनियमात ज्यास यापुढे केंद्रीय मंडळ असे निर्देशिले आहे.) स्थापन करू शकेल, त्यामध्ये पुढील [६][ व्यक्तींचा सदस्य म्हणून ] समावेश असेल त्या व्यक्ती अशा :— **केंद्रीय मंडळ.**

(क) केंद्र शासनाने ज्याची नियुक्ती करावयाची असा [७][ अध्यक्ष व उपाध्यक्ष ].

[८][कक ] केंद्रीय भविष्यनिर्वाह निधी आयुक्त, पदसिद्ध ; ]

(ख) केंद्र शासनाने आपल्या पदाधिकाऱ्यांमधून नियुक्त करावयाच्या जास्तीत जास्त पाच व्यक्ती ;

(ग) केंद्र शासन याबाबतीत विनिर्दिष्ट करील अशा राज्यांच्या शासनांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या, केंद्र शासनाने नियुक्त करावयाच्या जास्तीत जास्त पंधरा व्यक्ती ;

(घ) ही योजना लागू असलेल्या आस्थापनांच्या सेवायोजकांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या, व केंद्र शासन याबाबतीत मान्यता देईल अशा सेवायोजकांच्या संघटनांशी विचारविनिमय केल्यानंतर केंद्र शासनाने नियुक्त करावयाच्या [९][ दहा ] व्यक्ती ; आणि

(ङ) ज्यांना ही योजना लागू आहे त्या आस्थापनांमधील कर्मचाऱ्यांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या व केंद्र शासन याबाबतीत मान्यता देईल अशा कर्मचाऱ्यांच्या संघटनांशी विचारविनिमय करून, केंद्र शासनाने नियुक्त करावयाच्या [९][ दहा ] व्यक्ती.

(२) ज्या अटी व शर्तींच्या अधीनतेने केंद्रीय मंडळाच्या सदस्याची नियुक्ती करता येईल त्या अटी व शर्ती आणि केंद्रीय मंडळाच्या बैठकींची वेळ, ठिकाण व कार्यपद्धती, ही, योजनेमध्ये उपबंधित करण्यात येईल त्याप्रमाणे असेल.

---

[१] १९६३ चा अधिनियम ३७, कलम ४ अन्वये कलम ५ ला त्याचे पोटकलम (१) असा नवीन क्रमांक दिला.

[२] १९५६ चा अधिनियम ९४, कलम ३ अन्वये मूळ मजकुराऐवजी दाखल केले.

[३] १९६३ चा अधिनियम ३७, कलम ४ अन्वये समाविष्ट केले.

[४] १९६३ चा अधिनियम २८, कलम ३ अन्वये समाविष्ट केले (३० नोव्हेंबर, १९६३ रोजी व तेव्हापासून).

[५] १९६३ चा अधिनियम २८, कलम ४ अन्वये समाविष्ट केले (३० नोव्हेंबर, १९६३ रोजी व तेव्हापासून).

[६] १९८८ चा अधिनियम ३३, कलम ४(क) (एक) अन्वये हे शब्द घालण्यात आले (स्थायी आदेश क्र. ७१६ (ङ) दिनांक १५ जुलै, १९८८ अन्वये, दिनांक १ ऑगस्ट, १९८८ रोजी व तेव्हापासून).

[७] वरील अधिनियमाच्या कलम ४(क) (दोन) अन्वये हे शब्द दाखल करण्यात आले (स्थायी आदेश क्र. ७१६ (ङ) दिनांक १५ जुलै, १९८८ अन्वये, दिनांक १ ऑगस्ट, १९८८ रोजी व तेव्हापासून).

[८] वरील अधिनियमाच्या कलम ४(क) (तीन) अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले (स्थायी आदेश क्र. ७१६ (ङ) दिनांक १५ जुलै, १९८८ अन्वये, दिनांक १ ऑगस्ट, १९८८ रोजी व तेव्हापासून).

[९] वरील अधिनियमाच्या कलम ४ (चार) अन्वये हा शब्द बदली दाखल करण्यात आला (स्थायी आदेश क्र. ७१६ (ङ) दिनांक १५ जुलै, १९८८ अन्वये, दिनांक १ ऑगस्ट, १९८८ रोजी व तेव्हापासून).

(३) केंद्रीय मंडळ [१][ कलम ६क. [२] [आणि कलम ६ ग ] च्या उपबंधाच्या अधीनतेने, ] त्याच्याकडे निहित केलेल्या निधीचे प्रशासन, योजनेमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा पद्धतीने करील.

(४) केंद्रीय मंडळ, योजनेच्या [३][ [४][ निवृत्तिवेतन ] योजनेच्या व विमा योजनेच्या ] उपबंधांपैकी कोणत्याही उपबंधाद्वारे किंवा त्या अन्वये करणे आवश्यक असू शकतील, अशी इतर कामे करील.

[५][(५) केंद्रीय मंडळ, केंद्र शासन, भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्याशी विचारविनिमय केल्यानंतर या योजनेत विनिर्दिष्ट करील अशा नमुन्यात आणि अशा रीतीने, आपले उत्पन्न व खर्च यांचा योग्य तो लेखा ठेवील.

(६) केंद्रीय मंडळाच्या लेख्यांची, भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्याकडून वर्षातून एकदा लेखापरीक्षा करण्यात येईल आणि अशा लेखापरीक्षेसंबंधात त्यांच्याकडून करण्यात आलेला कोणताही खर्च केंद्रीय मंडळाकडून भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांना प्रदेय असेल.

(७) भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक आणि केंद्रीय मंडळाच्या लेख्यांच्या लेखापरीक्षेसंबंधात त्यांच्यकडून नियुक्त करण्यात आलेली कोणतीही व्यक्ती यांना, सरकारी लेख्यासंबंधात, नियंत्रक व महालेखापरीक्षक यांना असतात तेच अधिकार, विशेषाधिकार व प्राधिकार असतील, आणि विशेषत: पुस्तके, लेखे, संबंधित प्रमाणके, दस्तऐवज व कागदपत्रे सादर करण्यास फर्माविण्याचा आणि केंद्रीय मंडळाच्या कोणत्याही कार्यालयाची तपासणी करण्याचा अधिकार असेल.

(८) भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्याकडून किंवा त्यांच्याकडून यासंबंधात नेमण्यात आलेल्या अन्य कोणत्याही व्यक्तीकडून प्रमाणित करण्यात आलेले केंद्रीय मंडळाचे लेखे त्यावरील लेखापरीक्षा अहवालासह केंद्रीय मंडळाकडे पाठवण्यात येतील आणि मंडळाकडून ते नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या अहवालांवरील त्यांच्या टिप्पणीसह केंद्र शासनाकडे पाठवण्यात येतील.

(९) केंद्रीय मंडळाने आपल्या कामाचा आणि कार्याचा वार्षिक अहवालही केंद्र शासनाला सादर करणे त्याचे कर्तव्य असेल, आणि केंद्र शासन वार्षिक अहवाल व लेखापरीक्षित लेखे यांची प्रत, नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा अहवाल आणि त्यावरील केंद्रीय मंडळाची टिप्पणी यांसह संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर ठेवण्याची व्यवस्था करील. ]

**कार्यकारी समिती.** [६][ **५ कक** (१) केंद्र शासनाला, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, त्यात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा दिनांकापासून, केंद्रीय मंडळाला आपली कार्ये पार पाडण्यात सहाय्य करण्यासाठी, कार्यकारी समिती घटित करता येईल.

(२) कार्यकारी समितीमध्ये, सदस्य म्हणून खालील व्यक्तींचा समावेश असेल, त्या अशा :—

(क) केंद्रीय मंडळाच्या सदस्यांमधून केंद्र शासनाकडून नियुक्त करण्यात येईल असा अध्यक्ष;

(ख) कलम ५क च्या पोटकलम (१) च्या खंड (ख) मध्ये निर्देशिलेल्या व्यक्तींमधून केंद्र शासनाकडून नियुक्त करण्यात येतील अशा दोन व्यक्ती ;

(ग) कलम ५क च्या पोटकलम (१) च्या खंड (ग) मध्ये निर्देशिलेल्या व्यक्तींमधून केंद्र शासनाकडून नियुक्त करण्यात येतील अशा तीन व्यक्ती ;

(घ) कलम ५क च्या पोटकलम (१) च्या खंड (घ) मध्ये निर्देशिलेल्या व्यक्तींमधून केंद्रीय मंडळाकडून निवडून देण्यात येतील अशा सेवायोजकांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या तीन व्यक्ती ;

(ङ) कलम ५क च्या पोटकलम (१) च्या खंड (ङ) मध्ये निर्देशिलेल्या व्यक्तींमधून केंद्रीय मंडळाकडून निवडून देण्यात येतील अशा कर्मचाऱ्यांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या तीन व्यक्ती ;

(च) केंद्रीय भविष्यनिर्वाह निधी आयुक्त, पदसिद्ध.

(३) केंद्रीय मंडळाच्या सदस्याची ज्यांच्या अधीनतेने कार्यकारी समितीवर नियुक्ती करण्यात येईल किंवा निवड करण्यात येईल त्या अटी आणि शर्ती आणि कार्यकारी समितीच्या बैठकींची वेळ, ठिकाण व कार्यपद्धती या गोष्टी योजनेत उपबंधित केल्यानुसार असतील. ]

[१] १९७१ चा अधिनियम १६, कलम १५ अन्वये समाविष्ट केले (२३ एप्रिल, १९७१ रोजी व तेव्हापासून).
[२] १९७६ चा अधिनियम ९९, कलम १९ अन्वये समाविष्ट केले (१ ऑगस्ट, १९८८ रोजी व तेव्हापासून).
[३] वरील अधिनियमाच्या कलम १९ अन्वये "व कुटुंबवेतन योजनेच्या" या मजकुराऐवजी दाखल केले (१ ऑगस्ट, १९७६ रोजी व तेव्हापासून).
[४] १९९६ चा अधिनियम २५, कलम ४ अन्वये 'कुटुंब वेतन' या मजकुराऐवजी दाखल केले.
[५] १९८८ चा अधिनियम ३३, कलम ४ (ख) अन्वये दाखल करण्यात आले (स्थायी आदेश क्रमांक ७१६ (ङ), दिनांक १५ जुलै, १९८८ अन्वये, दिनांक १ ऑगस्ट १९८८ रोजी व तेव्हापासून).
[६] वरील अधिनियमाच्या कलम ५ अन्वये जादा दाखल करण्यात आले (स्थायी आदेश क्रमांक ७१६ (ङ), दिनांक १५ जुलै, १९८८ अन्वये, दिनांक १ ऑगस्ट १९८८ रोजी व तेव्हापासून).

**५ख.** (१) केंद्र शासन, कोणत्याही राज्याच्या शासनाशी विचारविनिमय केल्यानंतर, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, त्या राज्यासाठी योजनेमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा पद्धतीने एक विश्वस्त मंडळ (ज्यास या अधिनियमात यापुढे राज्य मंडळ निर्देशिलेले आहे) स्थापन करू शकेल. **राज्य मंडळ.**

(२) राज्य मंडळ, केंद्र शासन त्याला वेळोवेळी नेमून देईल अशा शक्ती वापरील आणि अशी कामे पार पाडील.

(३) ज्या अटी व शर्तींच्या अधीनतेने राज्य मंडळाच्या सदस्यांची नियुक्ती करता येईल त्या अटी व शर्ती आणि राज्य मंडळाच्या बैठकीची वेळ, ठिकाण आणि कार्यपद्धती, ही, योजनेमध्ये उपबंधित करण्यात येईल त्याप्रमाणे असेल.

**५ग.** कलम ५क किंवा ५ख अन्वये स्थापन करण्यात आलेले प्रत्येक विश्वस्त मंडळ हे ते स्थापन करणाऱ्या अधिसूचनेत विनिर्दिष्ट केलेल्या नावाचा, शाश्वत उत्तराधिकारी आणि सामाईक शिक्का असलेला नियम निकाय असेल आणि ते त्याच नावाने दावा लावील आणि त्याच्यावर दावा लावला जाईल. **विश्वस्त मंडळ हे निगम निकाय असणे.**

**५घ.** (१) केंद्र शासन, केंद्रीय भविष्यनिर्वाह निधी आयुक्ताची नियुक्ती करील, तो केंद्रीय मंडळाचा मुख्य कार्यकारी अधिकारी असेल आणि तो मंडळाच्या सर्वसाधारण नियंत्रणाच्या व अधीक्षणाच्या अधीन राहील. **अधिकाऱ्यांची नियुक्ती.**

(२) केंद्र शासन, केंद्रीय भविष्यनिर्वाह निधी आयुक्ताला त्याची कर्तव्ये पार पाडण्यात सहाय्य करण्यासाठी [१][ वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी यांची ] नियुक्ती करू शकेल.

(३) केंद्रीय मंडळ, [२][ योजनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा किमान वेतनमानाच्या अधीनतेने अपर केंद्रीय भविष्यनिर्वाह निधी आयुक्त, भविष्यनिर्वाह निधी उपायुक्त, प्रादेशिक भविष्यनिर्वाह निधी आयुक्त, सहायक भविष्यनिर्वाह निधी आयुक्त यांची आणि ] योजनेच्या [३][ [४][ निवृत्तिवेतन ] योजनेच्या आणि विमा योजनेच्या ] कार्यक्षम प्रशासनासाठी त्याला आवश्यक वाटतील अशा अन्य अधिकाऱ्यांची आणि कर्मचाऱ्यांची नियुक्ती करू शकेल.

(४) [५][ केंद्रीय भविष्यनिर्वाह निधी आयुक्त किंवा अपर केंद्रीय भविष्यनिर्वाह निधी आयुक्त किंवा वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी किंवा केंद्र शासनाच्या अधीन असलेले " क " गटाच्या किंवा " ख " गटाच्या वेतनमानाइतकेच वेतनमान असणारे केंद्रीय मंडळाच्या अधीन असलेले अन्य कोणतेही पद ] यांवरील कोणतीही नियुक्ती संघराज्य लोकसेवा आयोगाशी विचारविनिमय केल्याखेरीज केली जाणार नाही :

परंतु, पुढील परिस्थितीत असा विचारविनिमय आवश्यक असणार नाही :—

(क्) नियुक्ती जास्तीत जास्त एक वर्षाच्या कालावधीसाठी असेल ;

(ख्) जिची नियुक्ती करावयाची असेल ती व्यक्ती, तिच्या नियुक्तीच्या वेळी—

(१) भारतीय प्रशासन सेवेची सदस्य असेल ; किंवा

(२) केंद्र शासनाच्या किंवा राज्य शासनाच्या किंवा केंद्रीय मंडळाच्या [६][ गट " क " किंवा गट " ख " मधील पदावर ] सेवेत असेल.

(५) राज्य मंडळ, संबंधित राज्य शासनाच्या मान्यतेने, त्याला आवश्यक वाटेल तितका कर्मचारी वर्ग नियुक्त करू शकेल.

---

[१] १९८८ चा अधिनियम ३३, कलम ६(क्) अन्वये मूळ मजकुराऐवजी दाखल केले (स्थायी आदेश क्र. ७१६ (ङ्), दिनांक १५ जुलै, १९८८ अन्वये, दिनांक १ ऑगस्ट, १९८८ रोजी व तेव्हापासून).

[२] वरील अधिनियमाच्या कलम ६(ख्) अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला (स्थायी आदेश क्र. ७१६ (ङ्), दिनांक १५ जुलै, १९८८ अन्वये, दिनांक १ ऑगस्ट, १९८८ रोजी व तेव्हापासून).

[३] १९७६ चा अधिनियम ९९, कलम २० अन्वये " व कुटुंबवेतन योजनेच्या " या मजकुराऐवजी दाखल केले (दिनांक १ ऑगस्ट १९७६ रोजी व तेव्हापासून).

[४] १९९६ चा अधिनियम २५, कलम ४ अन्वये " कुटुंबवेतन " या मजकुराऐवजी दाखल केले.

[५] १९८८ चा अधिनियम ३३, कलम ६ (ग्) (एक) अन्वये हा मजकूर बदली दाखल करण्यात आला (स्थायी आदेश क्रमांक ७१६ (ङ्), दिनांक १५ जुलै, १९८८ अन्वये, दिनांक १ ऑगस्ट १९८८ रोजी व तेव्हापासून).

[६] वरील अधिनियमाच्या कलम ६ (ग्) (दोन) अन्वये हा मजकूर बदली दाखल करण्यात आला (स्थायी आदेश क्रमांक ७१६ (ङ्), दिनांक १५ जुलै, १९८८ अन्वये, दिनांक १ ऑगस्ट १९८८ रोजी व तेव्हापासून).

(६) केंद्रीय भविष्यनिर्वाह निधी आयुक्त, [१][ आणि वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी ] यांच्या सेवाप्रवेशाची पद्धत, वेतन आणि भत्ते, शिस्तविषयक आणि सेवेच्या अन्य शर्ती, केंद्र शासन विनिर्दिष्ट करील त्याप्रमाणे असतील आणि असे वेतन आणि भत्ते निधीमधून दिले जातील.

[२][ (७) अपर केंद्रीय भविष्यनिर्वाह निधी आयुक्त, भविष्यनिर्वाह निधी उपायुक्त, प्रादेशिक भविष्यनिर्वाह निधी आयुक्त, सहायक भविष्यनिर्वाह निधी आयुक्त आणि केंद्रीय मंडळाचे इतर अधिकारी व कर्मचारी यांच्या सेवाप्रवेशाची पद्धत, वेतन व भत्ते आणि शिस्तीच्या व सेवेच्या अन्य शर्ती, केंद्र शासनाच्या तत्सम वेतनश्रेणीतील अधिकाऱ्यांना व कर्मचाऱ्यांना लागू होणारे नियम व आदेश यांनुसार केंद्रीय मंडळांकडून विनिर्दिष्ट करण्यात येतील त्यानुसार असतील :

परंतु, पूर्वोक्तापैकी कोणत्याही बाबीसंबंधातील उक्त नियम व आदेश यामध्ये बदल करणे केंद्रीय मंडळाच्या मते आवश्यक असेल अशा बाबतीत ते केंद्र शासनाची पूर्वानुमती घेईल.

(ख) खंड (क) अन्वये अधिकाऱ्यांची व कर्मचाऱ्यांची तत्सम वेतनश्रेणी निश्चित करते वेळी, केंद्रीय मंडळ केंद्र शासनाच्या त्या अधिकाऱ्यांची व कर्मचाऱ्यांची शैक्षणिक अर्हता, सेवा प्रवेशाची पद्धती, कर्तव्ये व जबाबदाऱ्या विचारात घेईल आणि कोणतीही शंका असेल अशा बाबतीत, केंद्रीय मंडळ ती बाब केंद्र शासनाकडे निर्देशित करील आणि त्यावरील केंद्र शासनाचा निर्णय अंतिम असेल. ]

(८) राज्य मंडळाच्या अधिकाऱ्यांच्या व कर्मचाऱ्यांच्या सेवा प्रवेशाची पद्धती. वेतन आणि भत्ते शिस्तविषयक आणि सेवेच्या शर्ती ते मंडळ, संबंधित राज्य शासनाच्या मान्यतेने विनिर्दिष्ट करील त्याप्रमाणे असतील.

**[३][केंद्रीय मंडळ किंवा त्याची कार्यकारी समिती किंवा राज्य मंडळ यांच्या कृती व कार्यवाही विवक्षित कारणावरून विधिबाह्य ठरवल्या जाणार नाहीत.**

**५. घघ.** केंद्रीय मंडळ किंवा कलम ५ कक् अन्वये घटित करण्यात आलेली कार्यकारी समिती किंवा राज्य मंडळ यांच्याकडून करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कार्यवाही, केंद्रीय मंडळ, कार्यकारी समिती किंवा, प्रकरणपरत्वे, राज्य मंडळ यांच्या घटनेत केवळ कोणताही दोष किंवा रिक्तता असल्याच्या कारणावरून प्रश्नास्पद केली जाणार नाही.]

**प्रत्यायोजन.**

**५ ङ.** [४][केंद्रीय मंडळ, कार्यकारी समितीला किंवा मंडळाच्या अध्यक्षाला किंवा आपल्या अधिकाऱ्यांपैकी कोणत्याही अधिकाऱ्याला आणि राज्य मंडळ आपल्या अध्यक्षाला किंवा आपल्या अधिकाऱ्यांपैकी कोणत्याही अधिकाऱ्याला] योजनेच्या [५][[६][निवृत्तिवेतन] योजनेच्या आणि विमा योजनेच्या] कार्यक्षम प्रशासनासाठी, त्याला आपल्या या अधिनियमाखालील ज्या शक्ती व कार्ये आवश्यक वाटत असतील त्या शक्ती व कार्ये, ते विनिर्दिष्ट करील अशा कोणत्याही शर्ती व मर्यादा असल्यास त्यांच्या अधीनतेने, प्रत्यायोजित करू शकेल.

---

[१] १९८८ चा अधिनियम ३३, कलम ६ (घ) अन्वये हा मजकूर बदली दाखल करण्यात आला (स्थायी आदेश क्रमांक ७१६ (ङ), दिनांक १५ जुलै, १९८८ अन्वये, दिनांक १ ऑगस्ट, १९८८ रोजी व तेव्हापासून).

[२] वरील अधिनियमाच्या कलम ६ (ङ) अन्वये हा मजकूर बदली दाखल करण्यात आला (स्थायी आदेश क्रमांक ७१६, (ङ), दिनांक १५ जुलै, १९८८ अन्वये, दिनांक १ ऑगस्ट, १९८८ रोजी व तेव्हापासून).

[३] वरील अधिनियमाच्या कलम ७ अन्वये कलम ५ घघ समाविष्ट करण्यात आले. (स्थायी आदेश क्रमांक ७१६ (ङ), दिनांक १५ जुलै १९८८ अन्वये, दिनांक १ ऑगस्ट, १९८८ रोजी व तेव्हापासून).

[४] वरील अधिनियमाच्या कलम ८ अन्वये हा मजकूर बदली दाखल करण्यात आला (स्थायी आदेश क्रमांक ७१६ (ङ), दिनांक १५ जुलै १९८८ अन्वये, दिनांक १ ऑगस्ट, १९८८ रोजी व तेव्हापासून).

[५] १९७६ चा अधिनियम, ९९, कलम २० अन्वये " व कुटुंबवेतन योजनेच्या " या मजकुराऐवजी दाखल केले (दिनांक १ ऑगस्ट, १९७६ रोजी व तेव्हापासून).

[६] १९९६ चा अधिनियम २५, कलम ४ अन्वये " कुटुंब वेतन " या मजकुराऐवजी दाखल केले.

**अंशदाने आणि योजनांमध्ये ज्यासाठी उपबंध करता येतील अशा बाबी.**

**६.** [1]* * * * * सेवायोजकाने निधीला द्यावयाचे अंशदान हे त्या त्या वेळी प्रत्येक कर्मचाऱ्याला [2][ (मग त्याने त्यास प्रत्यक्षपणे नोकरीस ठेवलेले असो किंवा संविदाकाराने किंवा संविदाकारामार्फत नोकरीस, ठेवलेले असो.)] देय असलेले मूळ वेतन [3][महागाई भत्ता आणि प्रतिधारणभत्ता, (कोणताही असल्यास )] तो, यांच्या [4][आठ पूर्णांक एक तृतीयांश टक्के] इतके असेल आणि कर्मचाऱ्याने द्यावयाचे अंशदान हे त्याच्यासाठी सेवायोजकाकडून देय असलेल्या अंशदानाच्या रकमेइतके असेल ; आणि [5][ जर एखाद्या कर्मचाऱ्याची तशी इच्छा असेल तर, त्याचे मूळ वेतन [3][ महागाई भत्ता आणि प्रतिधारण भत्ता (कोणताही असल्यास) ] सेवायोजकाला त्याने या कलमान्वये देय असलेल्या त्याच्या अंशदानापेक्षा अधिक अंशदान देणे बंधनकारक असणार नाही. या शर्तीच्या अधीनतेने आठ पूर्णांक एक तृतीयांश टक्के रकमेपेक्षा अधिक असेल :]

[6][परंतु, केंद्र शासन त्याला योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, जी कोणतीही आस्थापना किंवा आस्थापनांचा वर्ग **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील, त्या आस्थापनेला किंवा आस्थापनांच्या वर्गाला हा अधिनियम लागू करताना, हे कलम "आठ पूर्णांक एक तृतीयांश टक्के" या दोन ठिकाणी येणाऱ्या शब्दाऐवजी "दहा टक्के" हे शब्द घालण्यात येतील. या फेरबदलाच्या अधीन राहील : ]

परंतु आणखी असे की, जेव्हा या अधिनियमाखाली देय असलेल्या कोणत्याही अंशदानाच्या रकमेमध्ये रुपयांचा अपूर्णांक समाविष्ट असेल तेव्हा या योजनेद्वारे, अशा अपूर्णांकांचे नजीकच्या पूर्ण रुपयात, अर्ध्या किंवा पाव रुपयात पूर्णांकन करण्याचे उपबंधित करता येईल.

[7][स्पष्टीकरण १].—या [8][कलमाच्या] प्रयोजनार्थ, महागाई भत्त्यामध्ये, कर्मचाऱ्याला देण्यात येत असलेल्या अन्नविषयक सवलतीचे रोख मूल्यही समाविष्ट असल्याचे समजण्यात येईल.

[9][स्पष्टीकरण **२**].—या [8][कलमाच्या] प्रयोजनार्थ, प्रतिधारण भत्ता याचा अर्थ, कोणत्याही कारखान्याच्या किंवा अन्य आस्थापनेच्या कोणत्याही कर्मचाऱ्याला, ज्या कालावधीत ती आस्थापना कार्यान्वित नसेल, त्या कालावधीत त्याची सेवा राखून ठेवण्यासाठी, त्या त्या वेळी देय असलेला भत्ता, असा आहे.

[10]* * * * * * *

**कर्मचारी निवृत्तिवेतन योजना.**

[11][**६क.** (१) आपल्या **राजपत्रात** अधिसूचना देऊन केंद्र शासन पुढील तरतुदी करण्यासाठी कर्मचारी निवृत्तिवेतन योजना म्हणून संबोधावयाची योजना तयार करू शकेल :—

(क) हा अधिनियम लागू असणाऱ्या कोणत्याही संस्थेतील किंवा संस्थेच्या वर्गातील कर्मचाऱ्यांना द्यावयाचे नियत सेवावधी निवृत्तिवेतन, पूर्ण सेवा निवृत्तिवेतन किंवा कायमची पूर्ण विकलांगता निवृत्तिवेतन ;

(ख) अशा कर्मचाऱ्यांच्या लाभधारकांना देय असणारे विधवा किंवा विधुर, मुले किंवा अनाथ मुले यांचे वेतन.

---

[1] १९६३ चा अधिनियम २८, कलम ५ अन्वये "(१)" हा क्रमांक गाळला (३० नोव्हेंबर, १९६३ रोजी व तेव्हापासून).

[2] वरील अधिनियमाच्या कलम ५ अन्वये समाविष्ट केले (३० नोव्हेंबर, १९६३ रोजी व तेव्हापासून).

[3] १९६० चा अधिनियम ४६, कलम ४ अन्वये "व महागाई भत्ता" या मजकुराऐवजी दाखल केले (३१ डिसेंबर, १९६० रोजी व तेव्हापासून).

[4] १९८८ चा अधिनियम ३३, कलम ९ (एक) अन्वये हे शब्द बदली दाखल करण्यात आले. (स्थायी आदेश क्रमांक ७१६ (ङ.), दिनांक १५ जुलै, १९८८ अन्वये, दिनांक १ ऑगस्ट, १९८८ रोजी व तेव्हापासून).

[5] वरील अधिनियमाच्या कलम ९ (क) (दोन) अन्वये बदली दाखल करण्यात आला (स्थायी आदेश क्रमांक ७१६ (ङ.) दिनांक १५ जुलै १९८८ अन्वये, दिनांक १ ऑगस्ट, १९८८ रोजी व तेव्हापसून).

[6] १९८८चा अधिनियम ३३, कलम ९(ख) अन्वये मूळ परंतुकाऐवजी हे परंतुक दाखल केले. (स्थायी आदेश क्रमांक ७१६(ङ.), दिनांक १५ जुलै, १९८८ अन्वये, दिनांक १ ऑगस्ट, १९८८ रोजी व तेव्हापासून).

[7] १९६० चा अधिनियम ४६, कलम ४ अन्वये "मूळ स्पष्टीकरणाला स्पष्टीकरण एक" असा नवीन क्रमांक दिला.

[8] १९६३ चा अधिनियम २८, कलम ५ अन्वये "पोटकलम" या मजकुराऐवजी दाखल केले (३० नोव्हेंबर, १९६३ रोजी व तेव्हापासून).

[9] १९६० चा अधिनियम ४६, कलम ४ अन्वये, समाविष्ट केले (३१ डिसेंबर, १९६० रोजी व तेव्हापासून).

[10] १९६३ चा अधिनियम २८, कलम ५ अन्वये पोटकलमे (२) व (३) गाळली (३० नोव्हेंबर, १९६३ रोजी व तेव्हापासून).

[11] १९९६ चा अधिनियम २५, कलम ५ अन्वये कलमे ६क व ६ख ऐवजी बदली दाखल केले.

(२) कलम ६ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, निवृत्तिवेतन योजना तयार झाल्यानंतर लवकरात लवकर निवृत्तिवेतन निधी स्थापन करण्यात येईल त्यामध्ये या निवृत्तिवेतन योजनेचा सदस्य असलेल्या प्रत्येक कर्मचाऱ्यांबाबत वेळोवेळी पुढील रकमांचा भरणा केला जाईल :—

(क्) निवृत्तिवेतन योजनेमध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे कलम ६ अंतर्गत येणारे मालकाचे अंशदान, ही रक्कम संबंधित कर्मचाऱ्याचे मूळ वेतन, महागाई भत्ता आणि असल्यास धारण भत्ते यांच्या $८\frac{१}{३}$ टक्क्यांपेक्षा जास्त नसेल ;

(ख्) कलम १७ पोटकलम (६) अंतर्गत येणाऱ्या सूट मिळालेल्या आस्थापनांच्या मालकांकडून देय असणाऱ्या रकमा ;

(ग्) निवृत्तिवेतन निधि स्थापनेच्या दिवसापर्यंतचा कर्मचारी वेतन निधीचा निव्वळ भत्ता ;

(घ्) केंद्र सरकार, संसदेने याबाबतीत केलेल्या कायद्याद्वारे रीतसर विनियोजन करून विनिर्दिष्ट करील अशा रकमा.

(३) निवृत्तिवेतन निधी स्थापन झाल्यानंतर, कुटुंब वेतन योजना (जिचा उल्लेख ह्यापुढे बंद केलेली योजना असा करण्यात आला आहे) प्रवर्तनात असणाचे बंद होईल आणि बंद केलेल्या योजनेची सर्व मत्ता निवृत्तिवेतन निधीमध्ये निहित असेल व हस्तांतरित केली जाईल. तसेच बंद वेतन योजनेखालील सर्व दायित्वे निवृत्तिवेतन निधीतून वसुलीयोग्य होतील आणि बंद केलेल्या योजनेच्या अंतर्गत येणाऱ्या लाभाधिकाऱ्यांना निवृत्तिवेतन निधीतून सर्व लाभ मिळण्याचा हक्क असेल आणि त्यांना मिळत असलेल्या बंद केलेल्या योजनेतील कोणत्याही लाभांपेक्षा ते लाभ कमी नसतील.

(४) निवृत्तिवेतन निधी केंद्रीय मंडळाकडे निहित असेल आणि निवृत्तिवेतन योजनेमध्ये विनिर्दिष्ट रीतीप्रमाणे केंद्रीय मंडळ त्याचे प्रशासन करील.

(५) या अधिनियमातील उपबंधाच्या अधीन राहून ही निवृत्तिवेतन योजना तिसऱ्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या सर्व किंवा कोणत्याही बाबींची तरतूद करील.

(६) ही निवृत्तिवेतन योजना अशी तरतूद करू शकेल की यातील सर्व किंवा कोणतेही उपबंध योजनेत त्याबाबतीत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा तारखेस भविष्यलक्षी किंवा भूतलक्षी प्रभावाने लागू होईल.

(७) पोटकलम (१) अंतर्गत तयार केलेली ही निवृत्तिवेतन योजना तयार झाल्यानंतर शक्य तितक्या लवकर संसदेचे अधिवेशन चालू असताना, एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन अधिवेशनात मिळून एकूण तीस दिवसांची होईल इतक्या मुदतीकरिता संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर ठेवण्यात येईल आणि ज्या अधिवेशनात ती अशा रीतीने ठेवण्यात आली असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी तिच्यात कोणताही फेरफार करण्यास दोन्ही सभागृहे सहमत होतील किंवा ती योजना करण्यात येऊ नये म्हणून दोन्ही सभागृहे सहमत होतील तर अशी योजना केवळ अशा सुधारित स्वरूपातच अंमलात येईल, किंवा, यथास्थिति, अंमलात येणार नाही. तथापि, अशी कोणतीही सुधारणा किंवा विलोपन यामुळे त्या योजनेनुसार तत्पूर्वी करण्यात आलेल्या कोणत्याही गोष्टींच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही. " ]

**कर्मचारी ठेवसंलग्न विमा योजना.**

[1][ **६ग.** (१) हा अधिनियम लागू असलेल्या कोणत्याही आस्थापनेतील किंवा आस्थापनांच्या वर्गातील कर्मचाऱ्यांसाठी आयुर्विम्याच्या लाभांचा उपबंध करण्याच्या प्रयोजनासाठी केंद्र शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, कर्मचारी ठेवसंलग्न विमा योजना या नावाची एक योजना राखू शकेल.

(२) ही विमा योजना आखण्यात आल्यानंतर शक्य होईल तितक्या लवकर, एक ठेवसंलग्न विमा निधी स्थापन करण्यात येईल आणि त्यामध्ये सेवायोजकाकडून वेळोवेळी, तो ज्याच्या संबंधात सेवायोजक असेल अशा प्रत्येक कर्मचाऱ्याच्या संबंधात, त्यावेळी त्याला देय असेल असे मूळ वेतन, महागाई भत्ता आणि प्रतिधारण भत्ता (कोणताही असल्यास) यांच्या बेरजेच्या जास्तीतजास्त एक टक्क्यापर्यंतची, केंद्र शासन **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील अशी रक्कम भरण्यात येईल.

**स्पष्टीकरण.—** या पोटकलमाच्या प्रयोजनासाठी " महागाई भत्ता " आणि " प्रतिधारण भत्ता " या शब्द प्रयोगाचे कलम ६ मध्ये असलेले अर्थ असतील.

[2]* * * * * *

(४) (क्) विमा योजनेद्वारे किंवा तदन्वये उपबंध करण्यात आलेल्या कोणत्याही लाभांच्या परिव्ययापोटी झालेले खर्च सोडून त्या योजनेच्या प्रशासनाच्या संबंधातील इतर सर्व खर्च भागवण्यासाठी केंद्र शासन वेळोवेळी ठरवील अशा पोटकलम (२) अन्वये सेवायोजकाने जेवढे अंशदान देणे आवश्यक ठरवण्यात आले आहे त्याच्या जास्तीतजास्त एक चतुर्थांशाइतकी आणखी रक्कम सेवायोजक विमा निधीत भरील ;

[3]* * * * * *

(५) विमा निधी केंद्रीय मंडळाकडे निहित असेल व त्याचे प्रशासन, विमा योजनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा रीतीने ते मंडळच करील.

(६) विमा योजनेद्वारे, अनुसूची चार मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या बाबींपैकी सर्व किंवा कोणत्याही बाबीसाठी उपबंध करता येतील.

---

[1] १९७६ चा अधिनियम ९९, कलम २१ अन्वये समाविष्ट केले (१ ऑगस्ट, १९७६ रोजी व तेव्हापासून).

[2] १९९६ चा अधिनियम २५, कलम ६(क्) अन्वये पोटकलम (३) वगळण्यात आले.

[3] वरील अधिनियमाच्या कलम ६(क्) अन्वये पोटकलम ४ चा खंड (क्) वगळण्यात आला.

(७) विमा योजनेद्वारे असे उपबंधित करता येईल की, तिचे कोणतेही उपबंध त्या योजनेत याबाबतीत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा तारखेस भविष्यलक्षी किंवा भूतलक्षी प्रभावाने अंमलात येतील.]

[१][**६घ.** कलम ५, कलम ६क आणि कलम ६ग खाली तयार केलेली प्रत्येक योजना, ती तयार करण्यात आल्यानंतर होईल तितक्या लवकर संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर, ते एका सत्राने बनलेल्या अथवा दोन किंवा अधिक क्रमवर्ती सत्रे मिळून बनलेल्या अशा एकूण तीस दिवसांच्या कालावधीकरिता सत्रासीन असताना ठेवली जाईल, आणि पूर्वोक्त सत्राच्या किंवा क्रमवर्ती सत्रांच्या पाठोपाठचे सत्र संपण्यापूर्वी, जर, त्या योजनेत कोणतेही आपरिवर्तन करण्याबाबत दोन्ही सभागृहाचे मतैक्य झाले अथवा ती योजना तयार करण्यात येऊ नये याबाबत दोन्ही सभागृहाचे मतैक्य झाले तर, त्यानंतर ती योजना अशा आपरिवर्तित रूपातच परिणामकारक होईल किंवा, प्रकरणपरत्वे, मुळीच परिणामकारक होणार नाही ; तथापि, अशा कोणत्याही आपरिवर्तनामुळे किंवा शून्यीकरणामुळे, तत्पूर्वी त्या योजनेखाली करण्यात आलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेला बाध येणार नाही. ] **योजना संसदेपुढे ठेवणे.**

**७.** (१) केंद्र शासनाला, या अधिनियमाखाली आखलेल्या कोणत्याही [२][योजनेमध्ये, [३][निवृत्तिवेतन ] योजनेमध्ये किंवा, प्रकरणपरत्वे, विमा योजनेमध्ये ] **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, [२][ भविष्यलक्षी किंवा भूतलक्षी प्रभावाने ] भर घालता येईल, [२][ विशोधन किंवा बदल करता येतील ]. **योजनेतील फेरबदल.**

[४][ (२) या पोटकलम (१) खालील निर्गमित केलेली प्रत्येक अधिसूचना, ती निर्गमित करण्यात आल्यानंतर होईल तितक्या लवकर संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर, ते एका सत्राने बनलेल्या अथवा दोन किंवा अधिक क्रमवर्ती सत्रे मिळून बनलेल्या अशा एकूण तीस दिवसांच्या कालावधीकरिता सत्रासीन असताना ठेवली जाईल, आणि पूर्वोक्त सत्राच्या किंवा क्रमवर्ती सत्रांच्या पाठोपाठचे सत्र संपण्यापूर्वी जर, त्या अधिसूचनेत कोणतेही आपरिवर्तन करण्याबाबत दोन्ही सभागृहाते मतैक्य झाले अथवा ती अधिसूचना निर्गमित करण्यात येऊ नये याबाबत दोन्ही सभागृहाचे मतैक्य झाले तर, त्यानंतर ती अधिसूचना अशा आपरिवर्तित रूपातच परिणामक होईल किंवा, प्रकरणपरत्वे, मुळीच परिणामक होणार नाही ; तथापि, अशा कोणत्याही आपरिवर्तनामुळे किंवा शून्यकरणामुळे, तत्पूर्वी त्या अधिसूचनांखाली करण्यात आलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेला बाध येणार नाही. ]

[५][ **७क.** [६][ (१) केंद्रीय भविष्यनिर्वाह निधी आयुक्त, कोणताही अपर भविष्यनिर्वाह निधी आयुक्त, कोणताही भविष्यनिर्वाह निधी उपायुक्त, कोणताही प्रादेशिक भविष्यनिर्वाह निधी आयुक्त, किंवा कोणताही सहायक भविष्यनिर्वाह निधी आयुक्त यांना आदेशाद्वारे— **सेवायोजकांकडून देय असलेल्या रकमांचे निर्धारण.**

(क) आस्थापनेला हा नियम लागू करण्यासंबंधात विवाद उद्भवेल अशा बाबतीत, विवादासंबंधात निर्णय घेता येईल ; आणि

(ख) या अधिनियमाचा कोणताही उपबंध, योजना किंवा कुटुंबवेतन योजना किंवा, प्रकरणपरत्वे, विमा योजना याअन्वये कोणत्याही सेवायोजकाकडून देय असलेली रक्कम निर्धारित करता येईल ;

आणि पूर्वोक्तापैकी कोणत्याही प्रयोजनासाठी, त्याला आवश्यक वाटेल अशी चौकशी आयोजित करता येईल.]

(२) पोटकलम (१) खाली चौकशी करणाऱ्या अधिकाऱ्याला, अशा चौकशीच्या प्रयोजनार्थ "दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८" (१९०८ चा ५) अन्वये पुढील बाबतीतील दाव्यांची संपरीक्षा करण्याकरिता एखाद्या न्यायालयाकडे ज्या शक्ती विहित करण्यात आलेल्या आहेत त्याच शक्ती असतील, त्या बाबी अशा :—

(क) कोणत्याही व्यक्तीस उपस्थित होण्यास भाग पाडणे किंवा तिची शपथेवर तपासणी करणे ;

(ख) दस्तऐवजांचा शोध घेण्यास आणि ते सादर करावयास लावणे ;

(ग) शपथपत्राच्या रूपाने पुरावा स्वीकारणे ;

(घ) साक्षीदारांची तपासणी करण्यासाठी आयोगपत्रे काढणे ; आणि अशी कोणतीही चौकशी ही "भारतीय दंड संहिता" याच्या (१८६० चा ४५) कलम १९३ व २२८ च्या अर्थान्तर्गत आणि कलम १९६ च्या प्रयोजनार्थ न्यायिक कार्यवाही असल्याचे समजण्यात येईल.

---

[१] १९८६ चा अधिनियम ४, कलम २, अनुसूची द्वारे कलम ६ग नंतर हे कलम समाविष्ट केले.

[२] १९७६ चा अधिनियम ९९, कलम २२ अन्वये विवक्षित शब्दांऐवजी दाखल केले.

[३] १९९६ चा अधिनियम २५, कलम ४ अन्वये "कुटुंब वेतन" या मजकुराऐवजी दाखल केले.

[४] १९८६ चा अधिनियम ४, कलम २ (२) द्वारे मूळ पोटकलमाऐवजी दाखल केले.

[५] १९६३ चा अधिनियम २८, कलम ६ अन्वये समाविष्ट केले (३० नोव्हेंबर, १९६३ रोजी व तेव्हापासून).

[६] १९८८ चा अधिनियम ३३, कलम १० (क) अन्वये मूळ मजकुराऐवजी दाखल केले (स्थायी आदेश क्रमांक ७१६(इ) दिनांक १५ जुलै, १९८८ अन्वये दिनांक १ ऑगस्ट, १९८८ रोजी व तेव्हापासून).

(३) [१][ संबंधित ] सेवायोजकाला स्वतःची बाजू मांडण्याची संधी दिल्याखेरीज, पोटकलम (१) खाली [२]* * * कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

[३][ (३क) पोटकलम (१) खालील चौकशीसाठी उपस्थित असणे ज्याला आवश्यक आहे असा कोणताही सेवायोजक, कर्मचारी किंवा अन्य कोणतीही व्यक्ती कोणतेही विधिग्राह्य कारण नमूद न करता, अशा चौकशीच्या वेळी उपस्थित राहण्यास कसूर करील किंवा तसे करण्यास फर्मावले असता कोणताही दस्तऐवज सादर करण्यात किंवा कोणताही अहवाल वा विवरणपत्र दाखल करण्यात कसूर करील अशा बाबतीत चौकशी आयोजित करणाऱ्या अधिकाऱ्याला अधिनियमाच्या प्रयुक्तीबद्दल निर्णय घेता येईल किंवा, प्रकरणपरत्वे, कोणत्याही सेवायोजकाकडून येणे असलेली रक्कम, अशा चौकशीच्या कालावधीत दाखल करण्यात आलेल्या पुराव्याच्या आणि अभिलेखात उपलब्ध असलेल्या इतर दस्तऐवजांच्या आधारे निर्धारित करता येईल.]

[४][ (४) पोटकलम (१) अन्वये सेवायोजकाविरुद्ध एकतर्फी आदेश काढण्यात आला असेल अशा बाबतीत, असा आदेश संज्ञापित करण्यात आल्याच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या आत त्याला असा आदेश अपास्त करण्यासाठी अधिकाऱ्याकडे अर्ज करता येईल आणि कारणे दाखवा नोटीस यथोचितरीत्या बजावण्यात आलेली नव्हती किंवा चौकशी आयोजित करण्यात आली त्यावेळी कोणत्याही पर्याप्त कारणामुळे तो उपस्थित राहू शकला नाही अशी त्याने अधिकाऱ्याचे समाधान होईल अशा रीतीने खात्री पटवली, तर अधिकारी त्याचा पूर्वीचा आदेश अपात्र करणारा आदेश देईल आणि चौकशीच्या कार्यवाहीसाठी दिनांक ठरवून देईल :

परंतु, सेवायोजकाला सुनावणीच्या दिनांकाची नोटीस पाठवली होती आणि अधिकाऱ्यापुढे उपस्थित होण्यासाठी त्याला पुरेसा कालावधी होता याबद्दल अधिकाऱ्याची खात्री झाली असेल तर केवळ कारणे दाखवा नोटिशीच्या अंमलबजावणीत अनियमितता होती, या कारणावरून असा आदेश अपास्त करता येणार नाही.

**स्पष्टीकरण.---** एकतर्फी देण्यात आलेल्या आदेशाविरुद्ध या अधिनियमान्वये अपील दाखल करण्यात आले असेल आणि अपीलकर्त्याने अपील काढून घेतले आहे या कारणाव्यतिरिक्त अन्य कारणावरून असे अपील निकालात काढण्यात आले असेल अशा बाबतीत एकतर्फी आदेश अपास्त करण्यासाठी या पोटकलमाखालील कोणताही अर्ज दाखल केला जाऊ शकणार नाही.

(५) या कलमान्वये देण्यात आलेला कोणताही आदेश त्याची नोटीस विरुद्ध पक्षावर बजावण्यात येईपर्यंत पोटकलम (४) खाली करण्यात आलेल्या कोणत्याही अर्जामुळे अपास्त होणार नाही. ]

[५][ **कलम ७ अन्वये देण्यात आलेल्या आदेशांचे पुनर्विलोकन.**

**७ख.** (१) कलम ७ च्या पोटकलम (१) अन्वये देण्यात आलेल्या, परंतु ज्यानुसार या अधिनियमान्वये कोणतेही अपील दाखल करण्यात आलेले नाही अशा आदेशामुळे व्यथित झालेल्या आणि नवीन महत्त्वाच्या बाबीचा किंवा पुराव्याचा शोध लागल्यानंतर जो यथोचित तत्परता दाखवूनही तिला कळला नव्हता किंवा आदेश देण्यात आला त्यावेळी ती सादर करू शकली नव्हती किंवा अभिलेखात उघड उघड दिसणाऱ्या एखाद्या चूकभुलीमुळे अशा आदेशाचे पुनर्विलोकन करून घेऊ इच्छित असणारी कोणतीही व्यक्ती ती आदेश देणाऱ्या कोणत्याही व्यक्तीकडे त्या आदेशांच्या पुनर्विलोकनासाठी अर्ज करू शकेल :

परंतु, अशा अधिकाऱ्याला, अशा कोणत्याही कारणावरून पुनर्विलोकन करणे आवश्यक आहे अशी त्याची खात्री झाल्यास, स्वतःच्या मतेही (अधिकारातही) त्याच्या आदेशाचे पुनर्विलोकन करता येईल.

(२) पोटकलम (१) खालील पुनर्विलोकनासाठी आलेला प्रत्येक अर्ज योजनेमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा नमुन्यात आणि रीतीने अशा कालावधीत दाखल करण्यात येईल.

(३) पुनर्विलोकनासाठी अर्ज स्वीकारणाऱ्या अधिकाऱ्याला पुनर्विलोकनासाठी पुरेसे कारण नाही असे आढळून येईल अशा बाबतीत तो असा अर्ज फेटाळून लावील.

(४) पुनर्विलोकनासाठी करण्यात आलेला अर्ज मंजूर करावा असे अधिकाऱ्यांचे मत असेल त्या बाबतीत, तो त्याला मंजुरी देईल :

---

[१] १९८८ चा अधिनियम ३३, कलम १० (ख) दोन अन्वये हा शब्द घालण्यात आला (स्थायी आदेश क्रमांक ७१६ (ङ), दिनांक १५ जुलै, १९८८ अन्वये, दिनांक १ ऑगस्ट, १९८८ रोजी व तेव्हापासून).

[२] वरील अधिनियमाच्या कलम १० (ख) (एक) द्वारे हा मजकूर गाळण्यात आला (स्थायी आदेश क्रमांक ७१६ (ङ), दिनांक १५ जुलै, १९८८ अन्वये, दिनांक १ ऑगस्ट, १९८८ रोजी व तेव्हापासून).

[३] वरील अधिनियमाच्या कलम १० (ग) अन्वये जादा दाखल करण्यात आले (स्थायी आदेश क्रमांक ७१६ (ङ), दिनांक १५ जुलै, १९८८ अन्वये, दिनांक १ ऑगस्ट, १९८८ रोजी व तेव्हापासून).

[४] वरील अधिनियमाच्या कलम १० (घ) अन्वये मूळ मजकुराऐवजी समाविष्ट करण्यात आला (स्थायी आदेश क्रमांक ७१६ (ङ), दिनांक १५ जुलै, १९८८ अन्वये, दिनांक १ ऑगस्ट, १९८८ रोजी व तेव्हापासून).

[५] वरील अधिनियमाच्या कलम ११ अन्वये ही कलमे जादा दाखल करण्यात आली (स्थायी आदेश क्रमांक ७१६ (ङ), दिनांक १५ जुलै, १९८८ अन्वये, दिनांक १ ऑगस्ट, १९८८ रोजी व तेव्हापासून).

परंतु---

(क्) ज्या आदेशासंबंधात पुनर्विलोकनासाठी अर्ज करण्यात आला आहे त्याच्या पुष्ट्यर्थ उपस्थित होण्यास आणि त्यांचे म्हणणे ऐकून घेण्यास त्याच्या समोरील सर्व पक्षाना पूर्वसूचना दिल्याशिवाय, असा कोणताही अर्ज मंजूर केला जाणार नाही ; आणि

(ख्) आदेश देण्यात आला त्यावेळी जी गोष्ट किंवा पुरावा आपल्याला माहीत नसल्याचे किंवा आपण सादर करू शकत नसल्याचे अर्जदाराचे अभिकथन, अशा अभिकथनाच्या पुराव्याविना नवीन गोष्ट किंवा पुरावा यांच्या आधारे असा कोणताही अर्ज मंजूर केला जाणार नाही.

(५) पुर्नविलोकनासाठी करण्यात आलेला अर्ज फेटाळणाऱ्या अधिकाऱ्याच्या आदेशाविरुद्ध कोणतेही अपील करता येणार नाही, परंतु त्याने पुनरीक्षणासाठी काढलेला आदेश हा जणू काही त्याने कलम ७क खाली काढलेला मूळ आदेश आहे असे समजून पुनरीक्षणाखाली काढलेल्या आदेशाविरुद्ध अपील करता येईल.

**७ग.** सेवायोजकाकडून येणे असलेली रक्कम निर्धारित करणारा आदेश कलम ७क किंवा ७ख अन्वये देण्यात आला असे असेल आणि ज्या अधिकाऱ्याने आदेश दिला त्याला --- **नजरेतून सुटलेली रक्कम निर्धारित करणे.**

(क्) असे मानण्यास कारण असेल की सेवायोजकाकडून येणे असलेली नेमकी रक्कम निर्धारित करणारा कोणताही दस्तऐवज किंवा अहवाल उपलब्ध करून देण्यात अथवा सर्व महत्त्वाच्या गोष्टी संपूर्णपणे व खरेपणे उघड करण्यात सेवायोजकाकडून झालेली अकृती किंवा चूक या कारणामुळे कोणत्याही कालावधीसाठी अशा सेवायोजकाकडून अशा रीतीने येणे असलेली कोणतीही रक्कम त्याच्या नजरेतून सुटली आहे.

(ख्) त्याच्याकडे असलेल्या माहितीनुसार असे मानण्यास कारण असेल की, खंड (क्) मध्ये उल्लेखिलेल्यानुसार सेवायोजकाकडून कोणतीही अकृती किंवा चूक घडलेली नसली तरीही कलम ७क किंवा ७ख अन्वये निर्धारित करावयाची अशी कोणतीही रक्कम कोणत्याही कालावधीसाठी निर्धारित करण्यातून निसटली आहे ;

अशा बाबतीत त्याला, कलम ७क किंवा कलम ७ख अन्वये देण्यात आलेल्या आदेशाच्या दिनांकापासून पाच वर्षांच्या कालावधीत, ते प्रकरण पुन्हा सुरू करता येईल आणि या अधिनियमाच्या उपबंधानुसार सेवायोजकाकडून येणे असलेली रक्कम पुनर्निर्धारित करण्यासाठी समुचित आदेश देता येतील :

परंतु, सेवायोजकाला आपल्या प्रकरणाचे अभिवेदन देण्याची वाजवी संधी देण्यात आल्याखेरीज सेवायोजकाकडून येणे असलेल्या रकमेचे पुनर्निर्धारण करण्याचा कोणताही आदेश या कलमाखाली देण्यात येणार नाही.

**७घ.** (१) केंद्र शासनाला, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, कर्मचारी भविष्यनिर्वाह निधी अपिलीय अधिकरण नावाचे एक किंवा अधिक अधिकरणे, या अधिनियमाद्वारे अशा अधिकरणाला प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करण्यासाठी आणि कार्य पार पाडण्यासाठी घटित करता येतील आणि अधिकरण घटित करणाऱ्या अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा क्षेत्रात असणाऱ्या आस्थापनांच्या बाबतीत अशा प्रत्येक अधिकरणाला अधिकारिता असेल. **कर्मचारी भविष्यनिर्वाह निधी अपिलीय अधिकरण.**

(२) केंद्र शासनाकडून नियुक्त करण्यात येईल अशा फक्त एकाच व्यक्तीचा अधिकरणांमध्ये समावेश असेल.

(३) एखादी व्यक्ती उच्च न्यायालयाचा न्यायाधीश आहे, होती किंवा असण्यास अर्ह आहे असे असल्याखेरीज अधिकरणाचा अधिकारी (यात यापुढे अध्यक्ष अधिकारी असे उल्लेखिलेला) म्हणून नियुक्ती होण्यास अर्ह असणार नाही.

**७ङ.** अधिकरणाचा अध्यक्ष अधिकारी, त्याने अधिकारपद ग्रहण केल्याच्या दिनांकापासून पाच वर्षांच्या कालावधीपर्यंत किंवा तो बासष्ट वर्षांचा होईपर्यंत---यांपैकी जे आधी घडेल तोपर्यंत, पद धारण करील. **पदावधी.**

**७च.** अध्यक्ष अधिकाऱ्याला, केंद्र शासनाला दिलेल्या त्याच्या स्वहस्ताक्षरातील नोटीशीद्वारे, आपल्या पदाचा राजीनामा देता येईल : **राजीनामा.**

परंतु, अध्यक्ष अधिकारी, केंद्र शासनाकडून त्याला त्याचे पद लवकर सोडण्याची परवानगी देण्यात आल्याशिवाय अशी नोटीस मिळाल्याच्या दिनांकापासून तीन महिन्यांचा कालावधी संपेपर्यंत किंवा त्याचा उत्तराधिकारी म्हणून यथोचितरीत्या नियुक्त करण्यात आलेली व्यक्ती पदग्रहण करीपर्यंत किंवा तिचा पदावधी संपेपर्यंत---यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत, पद धारण करील.

**अध्यक्ष अधिकाऱ्याचे वेतन व भत्ते आणि त्याच्या सेवेच्या इतर अटी व शर्ती.**

**७छ.** अध्यक्ष अधिकाऱ्याला देय असलेले वेतन व भत्ते आणि त्याच्या सेवेच्या इतर अटी व शर्ती (निवृत्तिवेतन उपदान व इतर सेवानिवृत्त लाभ यांसह) विहित करण्यात येतील त्यानुसार असतील :

परंतु, अध्यक्ष अधिकाऱ्यांचे वेतन व भत्ते तसेच त्याच्या सेवेच्या इतर अटी व शर्ती, यामध्ये त्याच्या नियुक्तीनंतर त्याला नुकसानकारक होईल अशा रीतीने बदल केला जाणार नाही.

**अधिकरणाचा कर्मचारीवर्ग.**

**७ज.** (१) केंद्र शासन, अधिकरणाला त्याची कार्ये पार पाडण्यासाठी आवश्यक असलेले अधिकारी व इतर कर्मचारी यांचे स्वरूप व संवर्ग निर्धारित करील आणि त्याला योग्य वाटेल असे अधिकारी व इतर कर्मचारी यांची अधिकरणासाठी तरतूद करील.

(२) अधिकरणाचे अधिकारी व इतर कर्मचारी, अध्यक्ष अधिकाऱ्याच्या सर्वसाधारण अधीक्षणाखाली त्यांची कार्ये पार पाडतील.

(३) अधिकरणाचे अधिकारी व कर्मचारी यांचे वेतन व भत्ते आणि त्यांच्या सेवेच्या इतर अटी व शर्ती, विहित करण्यात येतील त्यानुसार असतील.

**अधिकरणाकडे अपिले.**

**७झ.** (१) [कलम ७ ख च्या पोटकलम (५) मध्ये निर्देशिलेल्या पुनर्विलोकनासाठी करण्यात आलेले अपील फेटाळणारा आदेश खेरीजकरून ] पोटकलम (३) चे परंतुक, किंवा कलम १ चे पोटकलम (४) किंवा कलम ३ किंवा कलम ७क चे पोटकलम (१) किंवा कलम ७ख किंवा कलम ७ग किंवा कलम १४ अन्वये केंद्र शासनाकडून काढण्यात आलेल्या कोणत्याही आदेशामुळे, प्राधिकरणाकडून काढण्यात आलेल्या कोणत्याही आदेशामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीला अशा अधिसूचनेविरुद्ध किंवा आदेशाविरुद्ध अधिकरणाकडे अपील दाखल करता येईल.

(२) पोटकलम (१) खालील प्रत्येक अपील, विहित करण्यात येईल अशा स्वरूपात व रीतीने अशा कालावधीत आणि अशा फीसह दाखल करण्यात येईल.

**अधिकरणांची कार्यपद्धती.**

**७ञ.** (१) अधिकरणाला, आपल्या शक्तींचा वापर करताना किंवा आपली कार्ये पार पाडताना उद्भवणाऱ्या सर्व बाबींसंबंधात आपली कार्यपद्धती विनियमित करण्याची तसेच आपल्या बैठकी घेण्याची ठिकाणे ठरविण्याची शक्ती असेल.

(२) अधिकरणाला, आपली कार्ये पार पाडण्याच्या प्रयोजनार्थ, कलम ७क मध्ये निर्देशिलेल्या अधिकाऱ्यांकडे विहित केलेल्या सर्व शक्ती वापरता येतील आणि अधिकरणापुढील कोणतीही कार्यवाही ही, कलमे १९३ व २२८ च्या अर्थांतर्गत आणि भारतीय दंड संहितेच्या (१८६० चा ४५) कलम १५६ च्या प्रयोजनार्थ न्यायिक कार्यवाही असल्याचे मानण्यात येईल आणि अधिकरण हे फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) चे कलम १९५ आणि प्रकरण सव्वीस यांच्या सर्व प्रयोजनासाठी दिवाणी न्यायालय असल्याचे मानण्यात येईल.

**सादरकर्त्या अधिकाऱ्यांची नियुक्ती करतेवेळी विधिव्यवसायी व शासन इत्यादीचे सहाय्य घेण्याचा अपीलकर्त्याचा अधिकार.**

**७ट.** (१) या अधिनियमान्वये अधिकरणाकडे अपील दाखल करणाऱ्या व्यक्तीला आपले प्रकरण अधिकरणापुढे सादर करण्यासाठी एकतर जातीने हजर राहता येईल किंवा आपल्या पसंतीच्या विधि व्यवसायीचे सहाय्य घेता येईल.

(२) केंद्र शासनाला किंवा राज्य शासनाला किंवा या अधिनियमाखालील कोणत्याही प्राधिकरणाला सादरकर्ते अधिकारी या नात्याने काम करण्यासाठी, एका किंवा अधिक विधिव्यवसायींना अथवा आपल्या अधिकाऱ्यांपैकी कोणत्याही अधिकाऱ्याला, प्राधिकृत करता येईल आणि अशा तऱ्हेने प्राधिकृत करण्यात आलेल्या प्रत्येक व्यक्तीला अधिकरणापुढील कोणत्याही अपिलासंबंधात आपले प्रकरण सादर करता येईल.

**अधिकरणाचे आदेश.**

**७ठ.** (१) अधिकरणाला अपिलातील पक्षांना त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी देण्यात आल्यानंतर ज्या आदेशाविरुद्ध अपील करण्यात आले असेल तो पक्का करणारे, त्यात बदल करणारे किंवा निर्भावित करणारे असे त्याला योग्य वाटतील ते त्यावरील आदेश देता येतील अथवा नव्या अभिनिर्णयासाठी किंवा, प्रकरणपरत्वे, आदेशासाठी, आवश्यक वाटल्यास जादा पुरावे घेतल्यानंतर, अधिकरणाला योग्य वाटतील अशा निदेशांसह, ज्या प्राधिकरणाने असा आदेश दिला त्याच्याकडे परत प्रकरण निर्देशित करता येईल.

(२) अधिकरणाला आपल्या आदेशाच्या दिनांकापासून पाच वर्षांच्या कालावधीत कोणत्याही वेळी, अभिलेखावरून दिसून येणारी कोणतीही चूक दुरुस्त करण्याच्या हेतूने, त्याने पोटकलम (१) अन्वये

दिलेला कोणताही आदेश विशोधित करता येईल आणि अपिलातील पक्षांनी ती चूक त्याच्या निदर्शनास आणून दिली तर ते आदेशात त्याप्रमाणे विशोधन करील :

परंतु, सेवायोजकाकडून येणे असलेली रक्कम वाढविण्याच्या दृष्टीने किंवा अन्यथा त्याचे दायित्व वाढविण्याच्या दृष्टीने परिणामकारक असणारे विशोधन, अधिकरणाने त्याला तसे करण्याच्या आपल्या उद्देशाची नोटीस दिलेली असल्याशिवाय आणि त्याचे म्हणणे ऐकून घेण्याची त्याला वाजवी संधी दिलेली असल्याशिवाय, या पोटकलमान्वये केले जाणार नाही.

(३) अधिकरण या कलमान्वये देण्यात आलेल्या प्रत्येक आदेशाची प्रत अपिलातील पक्षांना पाठवून देईल.

(४) अपील निकालात काढण्यात आल्याचा अधिकरणांकडून देण्यात आलेला कोणताही आदेश कोणत्याही न्यायालयात प्रश्नास्पद केला जाणार नाही.

**रिक्त पदे भरणे.**

**७ड.** कोणत्याही कारणांमुळे अध्यक्ष अधिकाऱ्याचे पद रिक्त झाल्यास, केंद्र शासनाला ते रिक्त पद भरण्यासाठी या अधिनियमांच्या उपबंधानुसार अन्य व्यक्तीची नियुक्ती करता येईल आणि त्या टप्प्यावर रिक्त पद भरण्यात आले असेल तेथून अधिकरणापुढील कार्यवाही चालू करता येईल.

**अधिकरण घटित करणाऱ्या आदेशाची अंतिमता.**

**७ढ.** कोणत्याही व्यक्तीची अध्यक्ष अधिकारी म्हणून नियुक्ती करणाऱ्या केंद्र शासनाचा आदेश कोणत्याही रीतीने प्रश्नास्पद केला जाणार नाही आणि अधिकरणापुढील कोणतीही कृती किंवा कार्यवाही, असे अधिकरण घटित होण्यातील केवळ कोणत्याही दोषाच्या कारणावरून कोणत्याही रीतीने प्रश्नास्पद केली जाणार नाही.

**अपील दाखल करतेवेळी देय रकमा जमा करणे.**

**७ण.** सेवायोजकाने केलेले कोणतेही अपील, त्याने त्या अपिलासोबत कलम ७क मध्ये उल्लेखिलेल्या अधिकाऱ्याकडून निर्धारित करण्यात आलेल्या देय रकमेच्या पंच्याहत्तर टक्के इतकी रक्कम जमा केल्याशिवाय, अधिकरणाकडून दाखल करून घेतले जाणार नाही :

परंतु, अधिकरणाला अभिलिखित करता येतील अशा कारणावरून, या कलमान्वये जमा करावयाच्या रकमेचे अधित्यजन करता येईल किंवा ती कमी करता येईल.

**विवक्षित अर्जाचे अधिकरणांकडे हस्तांतरण.**

**७त.** कलम १९क अन्वये केंद्र शासनापुढे प्रलंबित असणारे सर्व अर्ज, त्यांच्या निरसनापूर्वी असे अर्ज ज्या आस्थापनासंबंधात करण्यात आले असतील त्यांच्या बाबतीत अधिकारितेचा वापर करणाऱ्या अधिकरणांकडे, हे अर्ज म्हणजे जणू काही अधिकरणाकडे दाखल करण्यात आलेली अपिले असल्याप्रमाणे हस्तांतरित होतील.

**सेवायोजकाकडून प्रदेय व्याज.**

**७थ.** सेवायोजक, त्याच्याकडून या अधिनियमान्वये देय असलेल्या कोणत्याही रकमेवर, ती रक्कम ज्या दिनांकास देय झाली असेल त्या दिनांकापासून ती प्रत्यक्षात भरली असेल त्या दिनांकापर्यंतच्या कालावधीसाठी वर्षाला बारा टक्के या दराने किंवा योजनेत विनिर्दिष्ट करण्यात आले असेल अशा अधिक दराने सरळ व्याज देण्यास दायी असेल :

परंतु, योजनेत विनिर्दिष्ट करण्यात आलेला अधिक दर, कोणत्याही अनुसूचित बँकेकडून आकारण्यात येणाऱ्या कर्ज (उसनवारी) दरापेक्षा अधिक असणार नाही. ]

**सेवायोजकाकडून देय रकमांच्या वसुलीची पद्धत.**

[१][**८.** (क) ज्या एखाद्या आस्थापनेला कोणतीही [२][योजना किंवा विमा योजना] लागू असेल [३][अशा आस्थापनेच्या] संबंधात सेवायोजकाकडून, [४][निधी किंवा, प्रकरणपरत्वे, विमा निधी] मध्ये प्रदेय असलेल्या कोणत्याही अंशदानाच्या, कलम १४ख अन्वये वसूल करण्याजोग्या हानीच्या, कलम १५ च्या पोटकलम (२) [५][किंवा कलम १७ च्या पोटकलम (५) खाली] हस्तांतरित करणे आवश्यक असलेल्या संचित रकमांच्या संबंधात किंवा या अधिनियमाच्या अन्य कोणत्याही उपबंधाखाली किंवा [२][योजनेच्या किंवा विमा योजनेच्या] कोणत्याही उपबंधाखाली त्याच्याकडून प्रदेय असलेल्या कोणत्याही आकारांच्या संबंधात, देय असलेली कोणतीही रक्कम, किंवा

---

[१] १९५३ चा अधिनियम ३७, कलम ६ अन्वये मूळ मजकुराऐवजी दाखल केले.

[२] १९७६ चा अधिनियम ९९, कलम २४ अन्वये मूळ मजकुराऐवजी दाखल केले (१ ऑगस्ट, १९७६ रोजी व तेव्हापासून).

[३] १९५६ चा अधिनियम ९४, कलम ३ अन्वये मूळ मजकुराऐवजी दाखल केले.

[४] १९७६ चा अधिनियम ९९, कलम २४ अन्वये "निधी" या मजकुराऐवजी दाखल केले (१ ऑगस्ट, १९७६ रोजी व तेव्हापासून).

[५] १९६३ चा अधिनियम २८, कलम ७ अन्वये समाविष्ट केले (३० नोव्हेंबर, १९६३ रोजी व तेव्हापासून).

(ख) सूट दिलेल्या [१][ आस्थापनेच्या ] संबंधात सेवायोजकाकडून, कलम १४ख खाली वसूल करण्याजोग्या कोणत्याही हानींच्या किंवा या अधिनियमाच्या कोणत्याही उपबंधाखाली किंवा [२][कलम १७ मध्ये ] विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही शर्तीखाली त्याच्याकडून समुचित शासनाला प्रदेय असलेल्या कोणत्याही आकाराच्या संबंधात [२][ किंवा उक्त कलम १७ खाली [३][ निवृत्तिवेतन ] योजनेमध्ये त्याच्याकडून प्रदेय असलेल्या अंशदानाच्या संबंधात ] देय असलेली कोणतीही रक्कम—

जर थकित असेल तर [४][ कलमे ८ख ते ८छ मध्ये विहित केलेल्या रीतीने ] वसूल करू शकेल.

**सेवायोजक आणि संविदाकार यांनी रकमा वसूल करणे.**

[५][ **८क.** (१) संविदांकाराकडून किंवा त्याच्या मार्फत नोकरीस लावलेल्या कर्मचाऱ्याच्या बाबतीत सेवायोजकाने भरलेली किंवा, त्याच्याकडून देय असलेली [६][ अंशदानाची रक्कम म्हणजेच कोणत्याही योजनेच्या अनुषंगाने सेवायोजकाचे त्याचप्रमाणे कर्मचाऱ्यांचे अंशदान आणि विमा योजनेच्या अनुषंगाने सेवायोजकाचे अंशदान ] आणि [७]* * * निधीच्या प्रशासनाचा खर्च भागविण्यासाठी असतील असे कोणतेही आकार असा सेवायोजक, संविदाकाराकडून, एकतर कोणत्याही कंत्राटान्वये त्या संविदाकारास देय असेल अशा कोणत्याही रकमेमधून कापून घेऊन किंवा संविदाकाराने फेडावयाच्या एखाद्या ऋणाच्या रुपाने वसूल करून घेऊ शकतो.

(२) ज्या एखाद्या संविदाकाराला, त्याने किंवा त्याच्यामार्फत नोकरीस ठेवलेल्या कोणत्याही कर्मचाऱ्याच्या संबंधात पोटकलम (१) मध्ये निर्देशिलेली रक्कम वसूल करून घेता येते तो संविदाकार [८][ कोणत्याही योजनेखालील ] त्या कर्मचाऱ्याचे अंशदान, अशा कर्मचाऱ्याला देय असलेले मूळ वेतन, महागाई भत्ता आणि प्रतिधारण भत्ता (कोणताही असल्यास) यातून कापून घेऊन अशा कर्मचाऱ्याकडून वसूल करून घेऊ शकतो.

(३) एतद्विरुद्ध कोणतीही संविदा असली तरी, कोणताही संविदाकार, सेवायोजकांचे अंशदान किंवा पोटकलम (१) मध्ये निर्देशिलेले आकार, त्याने किंवा त्याच्यामार्फत नोकरीस ठेवलेल्या कर्मचाऱ्याला देय असलेले मूळ वेतन, महागाई भत्ता आणि प्रतिधारण भत्ता (कोणताही असल्यास) त्यातून कापून घेऊन किंवा अन्यथा असे अंशदान किंवा आकार अशा कर्मचाऱ्याकडून वसूल करून घेण्यास हक्कदार असणार नाही.

**स्पष्टीकरण.**—या कलमातील "महागाई भत्ता" आणि "प्रतिधारण भत्ता" या शब्दप्रयोगांचा अर्थ, कलम ६ मध्ये असल्याप्रमाणे असेल. ]

**[९][ वसुली अधिकाऱ्याच्या नावे प्रमाणपत्र काढणे.**

**८ख.** (१) कलम ८ अन्वये कोणत्याही रकमेची थकबाकी असेल अशा बाबतीत, प्राधिकृत अधिकाऱ्याला, वसुली अधिकाऱ्याच्या नावे, थकबाकीची रक्कम विनिर्दिष्ट करणारे त्याच्या सहीचे प्रमाणपत्र काढता येईल आणि वसुली अधिकारी, असे प्रमाणपत्र मिळाल्यानंतर, त्यामध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या रकमेची, आस्थापनेकडून किंवा, प्रकरणपरत्वे, सेवायोजकाकडून, खाली नमूद केलेल्यापैकी एक किंवा अनेक पद्धतींनी वसुली करण्याची कार्यवाही करील :—

(क) आस्थापनेची किंवा, प्रकरणपरत्वे, सेवायोजकाची जंगम किंवा स्थावर संपत्ती जप्त केल्यानंतर तिची विक्री करून ;

(ख) सेवायोजकाला अटक व कारागृहात स्थानबद्ध करून ;

(ग) आस्थापनेच्या, किंवा, प्रकरणपरत्वे, सेवायोजकाच्या संपत्तीच्या व्यवस्थापनासाठी प्रापकाची नियुक्ती करून ;

---

[१] १९५६ चा अधिनियम ९४, कलम ४ अन्वये मूळ मजकुराऐवजी दाखल केले.

[२] १९७१ चा अधिनियम १६, कलम २१ अन्वये मूळ मजकूराऐवजी दाखल केले (२३ एप्रिल, १९७१ रोजी व तेव्हापासून).

[३] १९९६ चा अधिनियम २५, कलम ४ अन्वये 'कुटुंबवेतन' या मजकूराऐवजी दाखल केले.

[४] १९८८ चा अधिनियम ३३, कलम १२ अन्वये विवक्षित शब्दांऐवजी दाखल केले (स्थायी आदेश क्रमांक ७१६ (इ), दिनांक १५ जुलै, १९८८ अन्वये दिनांक १ ऑगस्ट, १९८८ रोजी व तेव्हापासून).

[५] १९६३ चा अधिनियम २८, कलम ८ अन्वये, समाविष्ट केले (३० नोव्हेंबर, १९६३ रोजी व तेव्हापासून).

[६] १९७६ चा अधिनियम ९९, कलम २५ अन्वये विवक्षित शब्दांऐवजी घातले (१ ऑगस्ट, १९७६ रोजी व तेव्हापासून).

[७] १९८८ चा अधिनियम ३३, कलम १३ अन्वये वगळण्यात आले (स्थायी आदेश क्रमांक ७१६ (इ.), दिनांक १५ जुलै, १९८८ अन्वये दिनांक १ ऑगस्ट, १९८८ रोजी व तेव्हापासून).

[८] १९७६ चा अधिनियम ९९, कलम २५ अन्वये, समाविष्ट केले (१ ऑगस्ट, १९७६ रोजी व तेव्हापासून).

[९] १९८८ चा अधिनियम ३३, कलम १४ अन्वये ही कलमे समाविष्ट करण्यात आली (स्थायी आदेश क्रमांक ७१६ (इ), दिनांक १५ जुलै, १९८८ अन्वये, दिनांक १ ऑगस्ट, १९८८ रोजी व तेव्हापासून).

परंतु, या कलमाखालील कोणत्याही संपत्तीची जप्ती व विक्री ही सर्वप्रथम आस्थापनेच्या संपत्तीसंबंधात अंमलात आणली जाईल आणि प्रमाणपत्रात विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या संपूर्ण थकबाकीच्या रकमेच्या वसुलीसाठी अशी जप्ती व विक्री अपुरी असेल अशा बाबतीत, अशा थकबाकीच्या संपूर्ण किंवा अंशत: वसुलीसाठी वसुली अधिकाऱ्याला सेवायोजकाच्या संपत्तीसंबंधात तशी कार्यवाही करता येईल.

(२) अन्य कोणत्याही पद्धतीने थकबाकीच्या वसुलीसाठी कार्यवाही करण्यात आली असली तरीही प्राधिकृत अधिकाऱ्याला पोटकलम (१) अन्वये प्रमाणपत्र काढता येईल.

**ज्याच्याकडे प्रमाणपत्र पाठवायचे तो वसुली अधिकारी.**

**८ग.** (१) एखादा सेवायोजक, ज्याच्या अधिकारिता क्षेत्रात—

(क) त्याचा धंदा किंवा व्यवसाय करत असेल किंवा ज्याच्या अधिकारिता क्षेत्रात त्याच्या आस्थापनेचे प्रमुख ठिकाण समाविष्ट असेल ; किंवा

(ख) राहत असेल किंवा आस्थापनेची वा सेवायोजकाची कोणतीही जंगम वा स्थावर संपत्ती उभी आहे, अशा वसुली अधिकाऱ्याकडे प्राधिकृत अधिकाऱ्याला कलम ८ मध्ये उल्लेखिलेले प्रमाणपत्र पाठवता येईल.

(२) आस्थापनेची किंवा सेवायोजकाची संपत्ती एकापेक्षा अधिक वसुली अधिकाऱ्यांच्या अधिकारिता क्षेत्रामध्ये उभी असेल आणि प्राधिकृत अधिकाऱ्याने ज्याच्याकडे प्रमाणपत्र पाठवले तो वसुली अधिकारी—

(क) त्याच्या अधिकारिता क्षेत्रातील जंगम किंवा स्थावर संपत्तीच्या विक्रीद्वारे संपूर्ण रक्कम वसूल करू शकत नसेल, किंवा

(ख) रकमेची संपूर्ण किंवा अंशत: वसुली लवकर व्हावी किंवा वसुली व्हावी यासाठी तसे करणे आवश्यक आहे असे त्याचे मत असेल,

अशा बाबतीत त्याला, ज्याच्या अधिकारिता क्षेत्रात आस्थापनेची किंवा सेवायोजकाची संपत्ती असेल अथवा सेवायोजक राहत असेल, त्या वसुली अधिकाऱ्याकडे प्रमाणपत्र अथवा रक्कम अंशत: वसूल करावयाची असेल अशा बाबतीत, विहित रीतीने प्रमाणित केलेल्या आणि वसूल करावयाची रक्कम त्यात विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या प्रमाणपत्राची प्रत पाठवता येईल आणि त्यानंतर तो वसुली अधिकारीही या कलमाखालील येणे असलेली रक्कम, प्रमाणपत्र किंवा त्याची प्रत म्हणजेच जणू काही प्राधिकृत अधिकाऱ्याकडून त्याला पाठवण्यात आलेले प्रमाणपत्रच असल्याप्रमाणे, वसूल करण्याची कार्यवाही करील.

**प्रमाणपत्राची विधिग्राह्यता आणि त्याचे विशोधन.**

**८घ.** (१) प्राधिकृत अधिकारी कलम ८ख अन्वये वसुली अधिकाऱ्यांच्या नावे प्रमाणपत्र काढील अशा बाबतीत, रकमेच्या अचूकतेबाबत वसुली अधिकाऱ्यापुढे आक्षेप घेण्याचा सेवायोजकाला अधिकार असणार नाही आणि प्रमाणपत्रासंबंधात कोणत्याही कारणावरून घेतलेली कोणतीही हरकत वसुली अधिकाऱ्याकडून मान्य केली जाणार नाही.

(२) वसुली अधिकाऱ्याच्या नावे प्रमाणपत्र काढण्यात आले असले तरीही वसुली अधिकाऱ्याला सूचना पाठवून प्रमाणपत्र काढून घेण्याची किंवा त्यातील कोणतीही लिपिकीय वा अंकगणितीय चूक दुरुस्त करण्याची शक्ती प्राधिकृत अधिकाऱ्याला असेल.

(३) प्राधिकृत अधिकारी, वसुली अधिकाऱ्याला, प्रमाणपत्र काढून घेण्याचे किंवा रद्द करण्याचे आदेश अथवा त्याच्याकडून पोटकलम (२) अन्वये करण्यात आलेली कोणतीही दुरुस्ती अथवा कलम ८ङ च्या पोटकलम (४) अन्वये करण्यात आलेले कोणतेही विशोधन याबद्दल माहिती कळवील.

**प्रमाणपत्रान्वये करावयाच्या कार्यवाहीची स्थगिती आणि त्याचे विशोधन किंवा ते काढून घेणे.**

**८ङ.** (१) कोणत्याही रकमेच्या वसुलीसाठी वसुली अधिकाऱ्याच्या नावे प्रमाणपत्र काढण्यात आले असले तरीही, प्राधिकृत अधिकारी रक्कम भरण्यासाठी मुदत देऊ शकेल आणि त्यानंतर अशा तऱ्हेने देण्यात आलेली मुदत संपेपर्यंत वसुली अधिकाऱ्याला कार्यवाही स्थगित करता येईल.

(२) रकमेच्या वसुलीसाठी प्रमाणपत्र काढण्यात आले असेल अशा बाबतीत, प्राधिकृत अधिकारी, असे प्रमाणपत्र काढण्यात आल्यानंतर भरण्यात आलेली कोणतीही रक्कम किंवा भरणा करण्यासाठी देण्यात आलेली कोणतीही मुदत याबद्दल वसुली अधिकाऱ्याला माहिती देईल.

(३) ज्यासाठी वसुलीचे प्रमाणपत्र काढण्यात आले आहे अशा रकमेची मागणी करणाऱ्या आदेशात या अधिनियमाखालील अपिलात किंवा अन्य कार्यवाहीत बदल करण्यात आला असेल आणि परिणामत: मागणी कमी झाली असेल परंतु तो आदेश या अधिनियमखालील पुढील कार्यवाहीची विषयवस्तू असेल अशा बाबतीत, प्राधिकृत अधिकारी, उक्त कपात प्रमाणपत्राच्या रकमेच्या ज्या हिश्श्यासंबंधात असेल त्याची वसुली, अपील किंवा इतर कार्यवाही ज्या कालावधीत प्रलंबित असेल तितक्या कालावधीपुरती स्थगित ठेवील.

(४) रकमेच्या वसुलीसाठी प्रमाणपत्र काढण्यात आल्यानंतर या अधिनियमाखालील अपील किंवा इतर कार्यवाहीच्या परिणामी अदत्त रकमेत कपात झाली असेल अशा बाबतीत, प्राधिकृत अधिकारी, अशा अपिलाची किंवा इतर कार्यवाहीची विषयवस्तू असलेला आदेश अंतिम व निर्णायक ठरेल तेव्हा, प्रमाणपत्रात दुरुस्ती करील, किंवा प्रकरणपरत्वे, ते मागे घेईल.

वसुलीच्या इतर पद्धती.

**८च.** (१) कलम ८ख अन्वये वसुली अधिकाऱ्याच्या नावे प्रमाणपत्र काढण्यात आले असले तरीही, केंद्रीय भविष्यनिर्वाह निधी आयुक्ताला, किंवा, प्रकरणपरत्वे, केंद्रीय मंडळाकडून प्राधिकृत करण्यात आलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याला, या कलमात उपबंधित करण्यात आलेल्या पद्धतींपैकी कोणत्याही एका वा अनेक पद्धतींद्वारे रक्कम वसूल करता येईल.

(२) कोणत्याही व्यक्तीकडून, ज्याची थकबाकी असेल अशा कोणत्याही सेवायोजकाला कोणतीही रक्कम देय असेल अशा बाबतीत, केंद्रीय भविष्यनिर्वाह निधी आयुक्ताला किंवा केंद्रीय मंडळातून यासंबंधात प्राधिकृत करण्यात आलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याला, अशा सेवायोजकाकडून या अधिनियमान्वये येणे असलेली थकबाकी उक्त रकमेतून वजा करण्यास फर्माविता येईल ; आणि अशी व्यक्ती अशा मागणीचे अनुपालन करील आणि अशा वजा केलेल्या रकमेचा केंद्रीय भविष्यनिर्वाह निधी आयुक्ताकडे, किंवा, प्रकरणपरत्वे, अशा तऱ्हेने प्राधिकृत करण्यात आलेल्या प्राधिकाऱ्याकडे भरणा करील :

परंतु, दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ (१९०८ चा ५) च्या कलम ६० अन्वये दिवाणी न्यायालयाच्या हुकूमनाम्याची अंमलबजावणी करताना जप्तीतून सूट मिळालेल्या रकमेच्या कोणत्याही भागाला या पोटकलमातील कोणतीही गोष्ट लागू होणार नाही.

(३) (एक) केंद्रीय भविष्यनिर्वाह निधी आयुक्त, किंवा यासंबंधात केंद्रीय मंडळाकडून प्राधिकृत करण्यात आलेला अन्य कोणताही अधिकारी कोणत्याही वेळी किंवा वेळोवेळी, लेखी नोटीशीद्वारे, सेवायोजकाला, किंवा प्रकरणपरत्वे, आस्थापनेला ज्या व्यक्तीकडून पैसा देय असेल किंवा देय होणार असेल अशा व्यक्तीला अथवा जी व्यक्ती, सेवायोजक, किंवा, प्रकरणपरत्वे, आस्थापना यांच्यासाठी किंवा यांच्या वतीने पैसा धारण करीत असेल किंवा नंतर धारण करणार असेल अशा कोणत्याही व्यक्तीला, केंद्रीय भविष्यनिर्वाह निधी आयुक्तांकडे, एकतर पैसा देय होताच किंवा धारण करताच तात्काळ अथवा नोटीशीत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा वेळी किंवा अशा कालावधीत (पैसा देय होईल किंवा धारण केला जाईल अशा वेळेपूर्वी नव्हे), थकबाकी संबंधात सेवायोजकाकडून येणे असलेली रक्कम भरण्यास पुरेसा असेल इतका पैसा अथवा ते त्या रकमेइतका किंवा रकमेपेक्षा कमी असेल तेव्हा संपूर्ण पैसा भरण्यास फर्मावू शकेल.

(दोन) सेवायोजकासाठी किंवा सेवायोजकाच्या वतीने अन्य कोणत्याही व्यक्तीसह संयुक्तरीत्या पैसा धारण करणाऱ्या किंवा नंतर धारण करणार असेल अशा कोणत्याही व्यक्तीला या पोटकलमान्वये नोटीस पाठवता येईल आणि या पोटकलमाच्या प्रयोजनार्थ अशा लेख्यातील संयुक्त धारकांचे शेअर्स, विरुद्ध शाबीत झाले नाही तर, समान असल्याचे गृहीत धरले जाईल.

(तीन) नोटिशीची प्रत, सेवायोजकाकडे केंद्रीय भविष्यनिर्वाह निधी आयुक्ताला, किंवा, प्रकरणपरत्वे, अशा तऱ्हेने प्राधिकृत करण्यात आलेल्या अधिकाऱ्याला माहीत असलेल्या सेवायोजकाच्या शेवटच्या पत्त्यावर आणि संयुक्त लेख्याच्या बाबतीत सर्व संयुक्त धारकांकडे केंद्रीय भविष्यनिर्वाह निधी आयुक्ताला, किंवा, प्रकरणपरत्वे, अशा तऱ्हेने प्राधिकृत करण्यात आलेल्या अधिकाऱ्याला माहीत असलेल्या त्यांच्या शेवटच्या पत्त्यांवर रवाना करण्यात येईल.

(चार) या पोटकलमात अन्यथा उपबंधित करण्यात आले असेल ते खेरीजकरून, या पोटकलमान्वये जिला नोटीस पाठवण्यात आली आहे अशी प्रत्येक व्यक्ती, अशा नोटिशीचे अनुपालन करण्यास बांधील असेल आणि विशेषतः अशी नोटीस डाक कार्यालय, बँक किंवा विमाकार यांना पाठवण्यात आली असेल अशा बाबतीत त्याविरुद्ध कोणताही, नियम, प्रथा किंवा आवश्यकता असली तरीही, भरणा करण्यापूर्वी कोणतीही नोंद, पृष्ठांकन किंवा तत्सम गोष्ट करण्याच्या प्रयोजनार्थ कोणतेही पास बुक, ठेव पावती, पॉलिसी किंवा अन्य कोणताही दस्तऐवज सादर करणे आवश्यक असणार नाही.

(पाच) या पोटकलमान्वये जिच्या संबंधात नोटीस काढण्यात आली असेल अशा कोणत्याही संपत्तीबाबत नोटीशीच्या दिनांकानंतर नोटिशीत अंतर्भूत असलेल्या कोणत्याही हक्क मागणीसंबंधात करण्यात आलेला कोणताही दावा रद्दबादल असेल.

(सहा) या पोटकलमान्वये जिला नोटीस पाठविण्यात आली आहे अशी व्यक्ती, मागणी करण्यात आलेली कोणतीही रक्कम किंवा तिचा कोणताही भाग ती सेवायोजकाला देणे लागत नाही अथवा सेवायोजकासाठी किंवा त्याच्या वतीने कोणताही पैसा धारण करीत नाही असे शपथेवर निवेदन देऊन नोटिशीला हरकत घेईल तेव्हा, या पोटकलमात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे अशा व्यक्तीला अशी कोणतीही रक्कम, किंवा प्रकरणपरत्वे, जिचा कोणताही भाग भरण्यास फर्मावण्यात येत असल्याचे आढळून आल्यास, अशी व्यक्ती, नोटिशीच्या सेवायोजकाप्रत असलेल्या तिच्या दायित्वांच्या मर्यादेपर्यंत अथवा या अधिनियमान्वये नियोक्त्याचे ज्या रकमेचे दायित्व असेल त्या मर्यादेपर्यंत यापैकी जे कमी असेल त्यानुसार, केंद्रीय भविष्यनिर्वाह निधी आयुक्त, किंवा, प्रकरणपरत्वे प्राधिकृत करण्यात आलेला असा कोणताही अधिकारी यांना व्यक्तिशः दायी असेल.

(सात) केंद्रीय भविष्यनिर्वाह निधी आयुक्त किंवा अशा तऱ्हेने प्राधिकृत करण्यात आलेला अधिकारी, यांना कोणत्याही वेळी किंवा वेळोवेळी, या पोटकलमान्वये काढण्यात आलेली कोणतीही नोटीस विशोधित किंवा प्रत्याहृत करता येईल अथवा अशा नोटिशीनुसार कोणताही भरणा करण्याचा कालावधी वाढवता येईल.

(आठ) केंद्रीय भविष्यनिर्वाह निधी आयुक्त किंवा अशा तऱ्हेने प्राधिकृत करण्यात आलेला कोणताही अधिकारी या पोटकलमान्वये काढण्यात आलेल्या कोणत्याही नोटिशीनुसार भरण्यात आलेल्या कोणत्याही रकमेची पावती देईल आणि अशा रीतीने रक्कम भरणारी व्यक्ती अशा रीतीने भरण्यात आलेल्या रकमेच्या मर्यादेपुरती तिच्या सेवायोजकाप्रत असलेल्या दायित्वातून मुक्त होईल.

(नऊ) या पोटकलमान्वये नोटीस मिळाल्यानंतर सेवायोजकाप्रत कोणतीही दायित्व पार पाडणारी कोणतीही व्यक्ती अशा रीतीने पार पाडण्यात आलेल्या सेवायोजकाप्रत तिच्या स्वतःच्या दायित्वाच्या मर्यादेपुरती अथवा या अधिनियमान्वये देय रकमेच्या सेवायोजकाच्या मर्यादेपुरती त्यापैकी जे कमी असेल त्याप्रमाणे केंद्रीय भविष्यनिर्वाह निधी आयुक्त किंवा अशा रीतीने प्राधिकृत करण्यात आलेला अधिकारी यांना व्यक्तिशः दायी असेल.

(दहा) या पोटकलमान्वये जिला नोटीस पाठविण्यात आलेली आहे अशा व्यक्तीने, त्यानुसार केंद्रीय भविष्यनिर्वाह निधी आयुक्त किंवा अशा रीतीने प्राधिकृत करण्यात आलेला अधिकारी यांच्याकडे भरणा करण्यात कसूर केली तर, ती नोटिशीत विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या रकमेसंबंधातील कसूरदार सेवायोजक असल्याचे समजण्यात येईल आणि ती रक्कम म्हणजे जणू काही तिच्याकडून येणे असलेली थकबाकी असल्याप्रमाणेच त्या रकमेच्या वसुलीसाठी तिच्या विरुद्ध कलमे ८ख व ८ङ मध्ये उपबंधित केलेल्या रीतीने पुढील कार्यवाही करता येईल आणि कलम ८ख अन्वये वसुली अधिकाऱ्याने आपल्या शक्तींचा वापर करताना देय रकमेची जप्ती केल्याप्रमाणे नोटीस परिणामकारक असेल.

(४) केंद्रीय भविष्यनिर्वाह निधी आयुक्त किंवा यासंबंधात केंद्रीय मंडळाकडून प्राधिकृत करण्यात आलेला कोणताही अधिकारी यांना, त्यांच्याकडे भरणा करण्यासाठी असलेला सेवायोजकांचा संपूर्ण पैसा ज्याच्या ताब्यात असेल त्या न्यायालयाकडे, त्या पैशासाठी, किंवा तो देय रकमेपेक्षा अधिक असेल तर, देय रक्कम चुकती करण्यासाठी पुरेशा अशा रकमेसाठी अर्ज करता येईल.

(५) केंद्रीय भविष्यनिर्वाह निधी आयुक्त किंवा सहायक भविष्यनिर्वाह निधी आयुक्तापेक्षा कमी दर्जाचा नसेल असा कोणताही अधिकारी, केंद्र शासनाकडून सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे तशा रीतीने प्राधिकृत करण्यात आल्यास, सेवायोजकाकडून, किंवा, प्रकरणपरत्वे, आस्थापनेकडून येणे असलेली थकबाकीची रक्कम, आयकर अधिनियम, १९६१ (१९६१ चा ४३) याच्या तिसऱ्या अनुसूचित विहित करण्यात आलेल्या रीतीने त्याच्या किंवा तिच्या जंगम संपत्तीच्या अटकावणीद्वारे वा विक्रीद्वारे, वसूल करू शकेल.

**आयकर अधिनियमाच्या विवक्षित उपबंधांची प्रयुक्ती.**

**८ छ.** आयकर अधिनियम, १९६१ (१९६१ चा ४३) याच्या दुसऱ्या व तिसऱ्या अनुसूच्यांचे उपबंध आणि वेळोवेळी अंमलात असलेले आयकर (प्रमाणपत्र कार्यवाही) नियम, १९६२ आवश्यक त्या फेरबदलांसह, उक्त उपबंध आणि नियम, आयकराऐवजी या अधिनियमाच्या कलम ८ मध्ये निर्देशिलेल्या रकमेच्या थकबाकीशी संदर्भित असल्याप्रमाणे लागू होतील :

परंतु, उक्त उपबंध आणि नियम यांतील "करपात्र व्यक्ती" चा कोणताही निर्देश हा या अधिनियमात व्याख्या केलेल्या सेवायोजकाचा निर्देश आहे, असा अर्थ लावला जाईल. ]

**१९२२ चा अधिनियम ११ खाली निधीस मान्यता देणे.**

**९.** "भारतीय आयकर अधिनियम, १९२२" (१९२२ चा ११) याच्या प्रयोजनार्थ, हा निधी त्या अधिनियमाच्या प्रकरण ९ क च्या अर्थांतर्गत मान्यताप्राप्त भविष्यनिर्वाह निधी असल्याचे समजले जाईल :

[1][ "परंतु, उक्त प्रकरणात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे ज्याखाली निधी स्थापन केला आहे त्या योजनेचा जो कोणता उपबंध त्या प्रकरणाच्या किंवा त्याखाली केलेल्या नियमांच्या कोणत्याही उपबंधाशी प्रतिकूल असेल तो परिणामशून्य ठरणार नाही. ].

**जप्तीपासून संरक्षण.**

**१०.** (१) कोणत्याही सदस्याची निधीमध्ये [2][ किंवा कोणत्याही सूट दिलेल्या कर्मचाऱ्याची भविष्यनिर्वाह निधीमध्ये ] त्याच्या नावे शिल्लक असलेली जमा रक्कम, ही कोणत्याही प्रकारे अभिहस्तांकित किंवा आकारणी केली जाण्यास पात्र असणार नाही आणि अशा सदस्याने [3][ किंवा सूट दिलेल्या कर्मचाऱ्याने ] काढलेल्या कोणत्याही ऋणांच्या किंवा पत्करलेल्या दायित्वाच्या बाबतीत कोणत्याही न्यायालयाच्या कोणत्याही हुकूमनाम्यानुसार किंवा आदेशानुसार जप्तीस पात्र होणार नाही, आणि "इलाखा शहर नादारी अधिनियम, १९०९" (१९०९ चा ३) खाली नियुक्त केलेल्या शासकीय अभिहस्तांकिती किंवा "प्रांतीय नादारी अधिनियम, १९२०" (१९२० चा ५) खाली नियुक्त केलेला कोणताही पदस्थ अभिहस्तांकिती अशा कोणत्याही रकमेवर हक्क मागणी सांगण्यास हक्कदार असणार नाही.

---

[1] १९५३ चा अधिनियम क्रमांक ३७, कलम ७ अन्वये समाविष्ट केले.

[2] वरील अधिनियमाच्या कलम ८ अन्वये समाविष्ट केले.

[3] वरील अधिनियमाच्या कलम ८ अन्वये समाविष्ट केले.

[१][ (२) कोणत्याही सदस्याची निधीमध्ये किंवा सूट दिलेल्या कर्मचाऱ्यांची भविष्यनिर्वाह निधीमध्ये त्याच्या मृत्यूच्यावेळी त्याच्या नावे शिल्लक असलेली आणि त्या योजनेअन्वये किंवा भविष्यनिर्वाह निधीच्या नियमांन्वये त्या नामनिर्देशितीला देय असलेली कोणतीही जमा रक्कम, उक्त योजनेद्वारे किंवा नियमांद्वारे प्राधिकृत केलेल्या कोणत्याही वजातींच्या अधीनतेने, नामनिर्देशितीकडे निहित होईल आणि सदस्याच्या किंवा सूट दिलेल्या कर्मचाऱ्यांच्या मृत्यूपूर्वी मृत व्यक्तीने किंवा नामनिर्देशितीने काढलेल्या कोणत्याही ऋणापासून किंवा पत्करलेल्या अन्य कोणत्याही दायित्वापासून मुक्त असेल. ] [२][ आणि कोणत्याही न्यायालयाचा कोणताही हुकूमनामा किंवा कोणताही आदेश याअन्वये जप्तीसही पात्र असणार नाही. ]

[३][ (३) पोटकलम (१) आणि पोटकलम (२) चे उपबंध हे शक्य होईल तेथवर, [४][ निवृत्तिवेतन ] योजनेअन्वये देय असलेल्या [४][ निवृत्तिवेतनाच्या ] किंवा इतर कोणत्याही रकमेच्या संबंधात [५][ आणि विमा योजनेअन्वये देय असलेल्या कोणत्याही रकमेच्या संबंधात देखील ] निधीमधून देय असलेल्या कोणत्याही रकमेच्या संबंधात जसे लागू होतात तसेच लागू होतील. ]

**अंशदानाच्या प्रदानाला अन्य ऋणांवर प्राथम्य देणे**

**११.** [६][ (१) [७][ जेव्हा एखादा सेवायोजक, नादार असल्याचे न्यायनिर्णित केले जाते किंवा असा सेवायोजक, ही कंपनी असेल, तर तिच्या परिसमापनासाठी आदेश दिला जातो, तेव्हा—

(क) ज्या [८][ आस्थापनेला ] कोणतीही [९][ योजना किंवा विमा योजना ] लागू असेल त्या आस्थापनांच्या संबंधात सेवायोजकाकडून निधीकरिता [१०][ किंवा, प्रकरणपरत्वे, विमा निधीकरिता ] देय असलेल्या कोणत्याही अंशदानाच्या, कलम १४ ख अन्वये वसूल करण्याजोग्या हानीच्या, कलम १५ च्या पोटकलम (२) अन्वये हस्तांतरित करणे आवश्यक असलेल्या संचित रकमांच्या बाबतीत किंवा या अधिनियमाच्या अन्य कोणत्याही उपबंधान्वये [९][ योजनेच्या किंवा विमा योजनेच्या ] कोणत्याही उपबंधान्वये देय असलेल्या आकारांच्या बाबतीत त्याच्याकडून येणे असलेली कोणतीही रक्कम ; किंवा

(ख) सूट दिलेल्या [८][ आस्थापनेच्या ] संबंधाक सेवायोजकाकडून [९][ भविष्यनिर्वाह निधीच्या किंवा कोणत्याही विमा निधीच्या ] नियमान्वये [९][ भविष्यनिर्वाह निधीकरिता किंवा कोणत्याही विमा निधीकरिता ] करावयाच्या कोणत्याही अंशदानाच्या (सूट दिलेल्या कर्मचाऱ्यांचा संबंध असेल तेथवर) [११][ कलम १७, पोटकलम (६) अन्वये [४][निवृत्तिवेतन ] योजनेला त्याच्याकडून देय असलेल्या कोणत्याही अंशदानाच्या ] कलम १४ख अन्वये वसूल करण्याजोग्या हानीच्या किंवा या अधिनियमाच्या कोणत्याही उपबंधान्वये किंवा कलम १७ अन्वये विनिर्दिष्ट केलेल्या शर्तीपैकी कोणत्याही शर्तीअन्वये त्याच्याकडून समुचित शासनाला देय असलेल्या कोणत्याही आकाराच्या संबंधातील कोणतीही रक्कम—

जेव्हा अशा रकमेबद्दलचे दायित्व, त्या न्यायनिर्णयाचा किंवा परिसमापनाचा आदेश काढण्यापूर्वी उपार्जित झालेले असेल, तेव्हा,] " इलाखा शहर नादारी अधिनियम, १९०९ " (१९०९ चा ३) याच्या कलम ४९ अन्वये किंवा " प्रांतीय नादारी अधिनियम, १९२० " (१९२० चा ५) याच्या कलम ६१ अन्वये किंवा [१२][ कंपनी अधिनियम, १९५६ (१९५६ चा १) याच्या कलम ५३० अन्वये ] नादार व्यक्तीच्या संपत्तीच्या किंवा, प्रकरणपरत्वे, परिसमापन करण्यात येत असलेल्या कंपनीच्या मत्तांच्या वितरणाच्यावेळी जी ऋणे अन्य सर्व ऋणांपेक्षा प्राथम्य देऊन चुकती करावयाची असतात, अशा ऋणांमध्ये समाविष्ट असल्याचे मानले जाईल.

[१] १९५३ चा अधिनियम क्रमांक ३७, कलम ८ अन्वये समाविष्ट केले.
[२] १९८८ चा अधिनियम ३३, कलम १५ अन्वये वरील मजकूर जादा दाखल करण्यात आला [स्थायी आदेश क्रमांक ७१६ (ड) दिनांक १५ जुलै १९८८ अन्वये, दिनांक १ ऑगस्ट १९८८ रोजी व तेव्हापासून].
[३] १९७१ चा अधिनियम १६, कलम २२ अन्वये समाविष्ट केले (२३ एप्रिल १९७१ रोजी व तेव्हापासून).
[४] १९९६ चा अधिनियम २५, कलम ४ अन्वये " कुटुंब वेतन " या मजकुराऐवजी दाखल केले.
[५] १९७६ चा अधिनियम ९९, कलम २६ अन्वये समाविष्ट केले (१ ऑगस्ट १९७६ रोजी व तेव्हापासून).
[६] १९७३ चा अधिनियम ४०, कलम ३ अन्वये कलम ११ ला त्याचे पोटकलम (१) असा नवीन क्रमांक दिला (१ नोव्हेंबर १९७३ रोजी व तेव्हापासून).
[७] १९५३ चा अधिनियम ३७, कलम ९ अन्वये विवक्षित शब्दांऐवजी दाखल केले.
[८] १९५६ चा अधिनियम ९४, कलम ३ अन्वये मूळ मजकुराऐवजी दाखल केले.
[९] १९७६ चा अधिनियम ९९, कलम २७ अन्वये दाखल केले (१ ऑगस्ट १९७६ रोजी व तेव्हापासून).
[१०] वरील अधिनियमाच्या कलम २७ अन्वये समाविष्ट केले (१ ऑगस्ट १९७६ रोजी व तेव्हापासून).
[११] १९७१ चा अधिनियम १६, कलम २३ अन्वये समाविष्ट केले. (२३ एप्रिल १९७१ रोजी व तेव्हापासून).
[१२] १९७३ चा अधिनियम ४०, कलम ३ अन्वये विवक्षित शब्दांऐवजी दाखल केले (१ नोव्हेंबर १९७३ रोजी व तेव्हापासून).

[१][ **स्पष्टीकरण.**— या पोटकलमात आणि कलम १७ मध्ये " विमा निधी " याचा अर्थ, कोणत्याही सेवायोजकाने कर्मचाऱ्यांसाठी आयुर्विम्याच्या स्वरुपाच्या लाभांचा उपबंध करण्यासाठी असलेल्या कोणत्याही योजनेअन्वये स्थापन केलेला, त्यांच्या भविष्यनिर्वाह निधीमधील ठेवींशी संलग्न असलेला किंवा नसलेला असा निधी की, ज्यासाठी कर्मचाऱ्यांसी कोणतेही वेगळे अंशदान किंवा हप्ता भरलेला नसेल, असा आहे ].

[२][ (२) पोटकलम (१) च्या उपबंधांना बाध न येता सेवायोजकाकडून कोणतीही रक्कम, [३][ मग ती कर्मचाऱ्यांच्या अंशदानाच्या (कर्मचाऱ्यांच्या वेतनातून कापून घेतलेल्या) किंवा सेवायोजकाच्या अंशदानाच्या संबंधातील असो ] सेवायोजकाकडून सहा महिन्यांपेक्षा अधिक काळापासून येणे असेल तर, अशा प्रकारे येणे असलेली रक्कम ही त्या आस्थापनेच्या मत्तांवरील पहिला बोजा असल्याचे मानण्यात येईल आणि त्यावेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, तिला इतर सर्व ऋणांवर प्राथम्य देऊन ती चुकती करण्यात येईल.

**नियोक्त्याचे वेतन इत्यादी कमी न करणे.**

[४][ **१२.** कोणतीही [५][ योजना किंवा विमा योजना ] लागू असलेल्या [६][ आस्थापनेच्या ] संबंधात, कोणताही सेवायोजक केवळ [७][ निधी किंवा विमा निधीकरता ] कोणतेही अंशदान किंवा या अधिनियमान्वये किंवा [५][ योजनेअन्वये किंवा विमा योजनेअन्वये ] कोणतेही आकार देण्याच्या त्याच्या दायित्वाच्या कारणावरून ज्याला ही [५][ योजना किंवा विमा योजना ] लागू आहे अशा कोणत्याही कर्मचाऱ्यांचे वेतन किंवा त्याच्या सेवायोजनाच्या सुस्पष्ट किंवा उपलक्षित शर्तीनुसार तो ज्यास हक्कदार असेल, अशा वार्धक्य वेतन, उपदान, [७][ भविष्यनिर्वाह निधी किंवा जीवन विमा ] यांच्या स्वरूपातील लाभाचे एकूण प्रमाण प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे कमी करणार नाही. ]

**निरीक्षक.**

**१३.** (१) समुचित शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाच्या, कोणत्याही [८][ योजनेच्या ] [९][ [१०][ निवृत्तिवेतन ] योजनेच्या किंवा विमा योजनेच्या ] प्रयोजनार्थ, त्याला योग्य वाटेल अशा व्यक्तींची निरीक्षक म्हणून नियुक्ती करू शकेल आणि त्यांची अधिकारिता ठरवून देऊ शकेल.

(२) पोटकलम (१) अन्वये नियुक्त केलेला कोणताही निरीक्षक, या अधिनियमांच्या किंवा कोणत्याही [५][ योजनेच्या किंवा विमा योजनेच्या ] संबंधात सादर करण्यात आलेल्या कोणत्याही माहितीच्या अचूकतेबाबत चौकशी करण्याच्या प्रयोजनार्थ किंवा ज्या [६][ आस्थापनेला ] कोणतीही [५][ योजना किंवा विमा योजना ] लागू असेल, [११][ त्या [६][ आस्थापनेच्या ] संबंधात या अधिनियमाच्या किंवा कोणत्याही योजनेच्या कोणत्याही उपबंधाची पूर्तता करण्यात आली असल्याची खात्री करून घेण्याच्या प्रयोजनार्थ किंवा जिला [५][ योजना किंवा विमा योजना ] लागू करण्यात आलेली नाही, अशा कोणत्याही [६][ आस्थापनेला ] या अधिनियमांचे किंवा कोणत्याही [५][ योजनेचे किंवा विमा योजनेचे ] उपबंध लागू करता येण्याजोगे आहेत काय, हे निश्चित करण्याच्या प्रयोजनार्थ किंवा ज्या शर्तीच्या अधीनतेने कलम १७ खाली सूट देण्यात आली असेल, त्या शर्तीची पूर्तता अशा सूट दिलेल्या आस्थापनेच्या सेवायोजकाकडून केली जाते आहे का, हे ठरवण्याच्या प्रयोजनार्थ,—

(क) सेवायोजकाला किंवा [१२][ कलम ८क खाली कोणतीही रक्कम ज्याच्याकडून वसूल करावयाची आहे अशा कोणत्याही संविदाकाराला ] त्याला [१३]* * * आवश्यक वाटेल अशी माहिती सादर करण्यास भाग पाडू शकेल.

---

[१] १९७६ चा अधिनियम ९९, कलम २७ अन्वये समाविष्ट केले. (१ ऑगस्ट, १९७६ रोजी व तेव्हापासून).

[२] १९७३ चा अधिनियम ४०, कलम ३ अन्वये समाविष्ट केले. (१ नोव्हेंबर, १९७३ रोजी व तेव्हापासून).

[३] १९८८ चा अधिनियम ३३, कलम १६ अन्वये हा मजकूर बदली दाखल करण्यात आला.

[४] १९५३ चा अधिनियम ३७, कलम १० अन्वये मूळ कलमाऐवजी दाखल केले.

[५] १९७६ चा अधिनियम ९९, कलम २८ अन्वये समाविष्ट केले (१ ऑगस्ट, १९७६ रोजी व तेव्हापासून).

[६] १९५६ चा अधिनियम ९४, कलम ३ अन्वये मूळ मजकुराऐवजी दाखल केले.

[७] १९७६ चा अधिनियम ९९, कलम २८ अन्वये दाखल केले. (१ ऑगस्ट, १९७६ रोजी व तेव्हापासून).

[८] १९७१ चा अधिनियम १६, कलम २४ अन्वये दाखल केले. (२३ एप्रिल, १९७१ रोजी व तेव्हापासून).

[९] १९७६ चा अधिनियम ९९, कलम २९ अन्वये मूळ मजकुराऐवजी दाखल केले. (१ ऑगस्ट, १९७६ रोजी व तेव्हापासून).

[१०] १९९६ चा अधिनियम २५, कलम ४ अन्वये " कुटुंब वेतन " या मजकुराऐवजी दाखल केले.

[११] १९५३ चा अधिनियम ३७, कलम ११ अन्वये समाविष्ट केले.

[१२] १९६३ चा अधिनियम २८, कलम ९ अन्वये समाविष्ट केले. (३० नोव्हेंबर १९६३ रोजी व तेव्हापासून).

[१३] १९५३ चा अधिनियम ३७, कलम ११ अन्वये " योजनेच्या संबंधात " हे शब्द गाळले.

(ख) कोणत्याही वाजवी वेळी [१][ आणि त्याला योग्य वाटेल अशा सहायकांसह ] कोणत्याही [२][ आस्थापनेत ] किंवा तिच्याशी संबंधित असलेल्या कोणत्याही जागेत [१][ प्रवेश करून तिची झडती घेऊ शकेल ] आणि जिच्याकडे अशा आस्थापनेचा प्रभार असल्याचे आढळून येईल अशा कोणत्याही व्यक्तीला, त्या [२][ आस्थापनेतील ] कर्मचाऱ्याच्या सेवायोजनासंबंधीचे किंवा वेतन प्रदानासंबंधीचे कोणतेही लेखे, लेखापुस्तके, नोंदवह्या आणि अन्य दस्तऐवज सादर करण्यास भाग पाडू शकेल ;

(ग) पूर्वोक्त प्रयोजनांपैकी कोणत्याही प्रयोजनाशी संबंध असलेल्या कोणत्याही बाबीच्या संबंधात, सेवायोजकाची किंवा [१][ ज्याच्याकडून कलम ८क खाली कोणतीही रक्कम वसूल करावयाची आहे अशा कोणत्याही संविदाकाराची ], त्याच्या अभिकर्त्याची किंवा कर्मचाऱ्याची किंवा आस्थापनेचा किंवा तिच्याशी संबंधित कोणत्याही जागेचा प्रभार असल्याचे आढळलेल्या कोणत्याही अन्य व्यक्तीची किंवा जी त्या [२][ आस्थापनेत ] कर्मचारी आहे किंवा होतो असे त्या निरीक्षकाला सकारण वाटत असेल, अशा अन्य कोणत्याही व्यक्तीची तपासणी करू शकेल ;

[३][ (घ) त्या आस्थापनेच्या संबंधात ठेवण्यात आलेले कोणतेही पुस्तक, नोंदवही किंवा अन्य दस्तऐवज यांच्या प्रती काढून घेऊ शकेल किंवा त्यातून उतारे घेऊ शकेल आणि सेवायोजकाने या अधिनियमाखालील कोणताही अपराध केला आहे, असे जेव्हा त्याला सकारण वाटत असेल तेव्हा, त्याला आवश्यक वाटेल अशा सहाय्यासह, त्या अपराधाच्या संबंधात त्याला संबद्ध वाटतील अशी पुस्तके, नोंदवह्या किंवा अन्य दस्तऐवज किंवा त्यांचा काही भाग जप्त करू शकेल ;

(ङ) [४][ योजनेद्वारे किंवा विमा योजनेद्वारे ] उपबंधित करण्यात येतील अशा अन्य शक्तींचा वापर करू शकेल.

[५][ (२क) पोटकलम (१) अन्वये नियुक्त केलेला कोणताही निरीक्षक, या अधिनियमाच्या किंवा कोणत्याही [६][ निवृत्तिवेतन ] योजनेच्या संबंधात सादर करण्यात आलेल्या कोणत्याही माहितीच्या अचुकतेबाबत चौकशी करण्याच्या प्रयोजनार्थ, किंवा ज्या आस्थापनेला कुटुंब वेतन योजना लागू असेल त्या आस्थापनेच्या संबंधात, या अधिनियमाच्या किंवा [६][ निवृत्तिवेतन ] योजनेच्या कोणत्याही उपबंधाची पूर्तता करण्यात आली असल्याची खात्री करून घेण्याच्या प्रयोजनार्थ, पोटकलम (२) च्या खंड (क), खंड (ख), खंड (ग) किंवा खंड (घ) अन्वये त्यास प्रदान करण्यात आलेल्या सर्व शक्तींचा किंवा त्यांच्यापैकी कोणत्याही शक्तीचा वापर करू शकेल ].

[५][[७][ (२ख) ] " फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८ " (१८९८ चा ५) चे उपबंध, ते ज्याप्रमाणे उक्त संहितेच्या कलम ९८ खाली काढण्यात आलेल्या अधिपत्राच्या प्राधिकाराखाली केलेल्या कोणत्याही झडतीला किंवा जप्तीला लागू होतात, त्याचप्रमाणे, शक्य होईल तेथवर, पोटकलम (२) [८][ किंवा, प्रकरणपरत्वे, पोटकलम (२क) ] खालील कोणत्याही झडतीला किंवा जप्तीला लागू होतील.

[९]* * * * *

**शास्ती.** **१४.** (१) जो कोणी, या अधिनियमाखाली, [१०][ योजनेखाली, [११][ [६][ निवृत्तिवेतन ] योजनेखाली किंवा विमा योजनेखाली ]] त्याने करावयाची प्रदाने टाळण्याच्या किंवा इतर कोणत्याही व्यक्तीला असे प्रदान टाळण्यास मदत करण्याच्या प्रयोजनार्थ, हेतुपुरस्सर खोटे कथन किंवा खोटे अभिवेदन करील किंवा केले जाण्याची व्यवस्था करील तो [१२][ एक वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस किंवा पाच हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस किंवा या दोन्ही शिक्षांस पात्र होईल. ]

---

[१] १९६३ चा अधिनियम २८, कलम ९ अन्वये मूळ मजकुराऐवजी दाखल केले (३० नोव्हेंबर, १९६३ रोजी व तेव्हापासून).

[२] १९५६ चा अधिनियम ९४, कलम ३ अन्वये मूळ मजकुराऐवजी दाखल केले.

[३] १९६३ चा अधिनियम २८, कलम ९ अन्वये मूळ खंड (घ) ऐवजी दाखल केला (३० नोव्हेंबर, १९६३ रोजी व तेव्हापासून).

[४] १९७६ चा अधिनियम ९९, कलम २९ अन्वये मूळ मजकुराऐवजी दाखल केले (१ ऑगस्ट, १९९७ रोजी व तेव्हापासून).

[५] १९६३ चा अधिनियम २८, कलम ९ अन्वये समाविष्ट केले (३० नोव्हेंबर, १९६३ रोजी व तेव्हापासून).

[६] १९९६ चा अधिनियम २५, कलम ४ अन्वये " कुटुंब वेतन " या मजकुराऐवजी दाखल केले.

[७] १९७६ चा अधिनियम ९९, कलम २४ अन्वये पोटकलम (२क) ला पोटकलम (२ख) असा नवीन क्रमांक देण्यात आला (२३ एप्रिल, १९७१ रोजी व तेव्हापासून).

[८] १९७१ चा अधिनियम १६, कलम २४ अन्वये समाविष्ट करण्यात आले (२३ एप्रिल, १९७१ रोजी व तेव्हापासून).

[९] १९८८ चा अधिनियम ३३, कलम १७ अन्वये पोटकलम (३) वगळण्यात आले (स्थायी आदेश क्रमाक ७१६(ङ), दिनांक १५ जुलै, १९८८ अन्वये दिनांक १ ऑगस्ट, १९८८ रोजी व तेव्हापासून).

[१०] १९७१ चा अधिनियम १६, कलम २५ अन्वये " किंवा कोणत्याही योजनेखाली " या मजकुराऐवजी दाखल केले.

[११] १९७६ चा अधिनियम ९९, कलम ३० अन्वये मूळ मजकुराऐवजी दाखल केले (७ सप्टेंबर, १९७६ रोजी व तेव्हापासून).

[१२] १९८८ चा अधिनियम ३३, कलम १८ (क) अन्वये वरील मजकूर बदली दाखल करण्यात आला.

[१][(१क) जो सेवायोजक कलम ६ च्या किंवा कलम १७ च्या पोटकलम (२) चा खंड (क्) हा, निरीक्षण आकारांच्या प्रदानाशी संबंधित असेल तेथवर, त्याच्या, किंवा योजनेचा परिच्छेद ३८ हा प्रशासन आकारांच्या प्रदानाशी संबंधित असेल तेथवर त्याच्या, उपबंधाचे उल्लंघन करील किंवा त्यांच्या अनुपालनात कसूर करील, त्यास [२][ तीन वर्षांपर्यंत ] असू शकेल इतक्या कारावासाची शिक्षा दिली जाईल, परंतु,—

(क्) सेवायोजकाने कर्मचाऱ्यांच्या वेतनातून कापून घेतलेले कर्मचाऱ्यांचे अंशदान भरण्याच्या बाबतीत कसूर झाली असेल त्या प्रकरणात, अशी शिक्षा [३][ एक वर्ष कारावास आणि दहा हजार रुपये द्रव्यदंड यांपेक्षा ] कमी असणार नाही ;

[४][ (ख्) इतर कोणत्याही प्रकरणात ती सहा महिने कारावास आणि पाच हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतका द्रव्यदंड, यापेक्षा कमी असणार नाही : ]

परंतु, न्यायालय, न्यायनिर्णयात अभिलिखित करावयाच्या कोणत्याही पुरेशा आणि विशेष कारणांच्या आधारे कमी मुदतीची कारावासाची शिक्षा [५]* * * * * ठोठावू शकेल].

[६][ (१ख्) जो सेवायोजक कलम ६ग च्या, किंवा कलम १७ च्या पोटकलम (३क्) चा खंड (क्) हा निरीक्षण आकारांच्या प्रदानाशी संबंधित असेल तेथवर, त्यांच्या उपबंधांचे उल्लंघन करील किंवा त्याच्या अनुपालनात कसूर करील त्यास [७][ एक वर्षापर्यंत ] असू शकेल परंतु [८][ सहा ] महिन्यांपेक्षा कमी असणार नाही इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा दिली जाईल तसेच तो [९][ पाच ] हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाच्या शिक्षेलाही पात्र होईल :

परंतु, न्यायालय, न्यायनिर्णयात अभिलिखित करावयाच्या पुरेशा आणि विशेष कारणांच्या आधारे कमी मुदतीची कारावासाची शिक्षा [१०]* * * * * ठोठावू शकेल].

(२) [११][ या अधिनियमाच्या उपबंधाच्या अधीनतेने, योजनेत ] [१२][[१३][ निवृत्तिवेतन ] योजनेत किंवा विमा योजनेत ] असा उपबंध करता येईल की, जी कोणतीही व्यक्ती त्या योजनेच्या कोणत्याही उपबंधांचे उल्लंघन करील किंवा त्यांच्या अनुपालनात कसूर करील तिला [१४][एक वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची किंवा चार हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची किंवा या दोन्ही शिक्षा दिल्या जातील. ]

[१५][ (२क) जो कोणी, या अधिनियमाच्या कोणत्याही उपबंधांचे किंवा ज्या शर्तीच्या अधीनतेने कलम १७ खाली सूट मंजूर करण्यात आली त्या शर्तीपैकी कोणत्याही शर्तीचे उल्लंघन करील किंवा त्यांचे अनुपालन करण्यात कसूर करील, त्यास अशा उल्लंघनासाठी किंवा अनुपालनासाठी, या अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये इतरत्र दुसऱ्या कोणत्याही शास्तीचा उपबंध करण्यात आला नसेल तर, [१६][ सहा महिन्यांपर्यंत, परंतु एक महिन्यापेक्षा कमी नसेल इतक्या कारावासाची आणि पाच हजार रुपयापर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा ठोठावता येईल. ]]

---

[१] १९७३ चा अधिनियम ४०, कलम ४ अन्वये समाविष्ट केले (१ नोव्हेंबर, १९७३ रोजी व तेव्हापासून).

[२] १९८८ चा अधिनियम ३३, कलम १८(ख्) (एक) अन्वये हा मजकूर बदली दाखल करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम १८(ख्) (दोन) अन्वये हा मजकूर बदली दाखल करण्यात आला.

[४] वरील अधिनियमाच्या कलम १८(ख्) (तीन) अन्वये हा खंड बदली दाखल करण्यात आला.

[५] वरील अधिनियमाच्या कलम १८(ख्) (चार) अन्वये हा मजकूर वगळण्यात आला.

[६] १९७६ चा अधिनियम ९९, कलम ३० अन्वये समाविष्ट केले (७ सप्टेंबर, १९७६ रोजी व तेव्हापासून).

[७] १९८८ चा अधिनियम ३३, कलम १८(ग्) (एक) अन्वये हा शब्द बदली दाखल करण्यात आला.

[८] वरील अधिनियमाच्या कलम १८(ग्) (दोन) अन्वये हा शब्द बदली दाखल करण्यात आला.

[९] वरील अधिनियमाच्या कलम १८(ग्) (तीन) अन्वये हा शब्द बदली दाखल करण्यात आला.

[१०] वरील अधिनियमाच्या कलम १८(ग्) (चार) अन्वये हा मजकूर वगळण्यात आला.

[११] १९७३ चा अधिनियम ४०, कलम ४ अन्वये मूळ मजकुराऐवजी दाखल करण्यात आला (१ नोव्हेंबर, १९९६ रोजी व तेव्हापासून).

[१२] १९७६ चा अधिनियम ९९, कलम ३० अन्वये दाखल केले (७ सप्टेंबर, १९९६ रोजी व तेव्हापासून).

[१३] १९९६ चा अधिनियम २५, कलम ४ अन्वये 'कुटुंब वेतन' या मजकुराऐवजी दाखल केले.

[१४] १९८८ चा अधिनियम ३३, कलम १८(घ्) अन्वये हा मजकूर बदली दाखल केला.

[१५] १९५३ चा अधिनियम ३७, कलम १२ अन्वये समाविष्ट केले.

[१६] १९८८ चा अधिनियम ३३, कलम १८(ङ्) अन्वये हा मजकूर बदली दाखल केला.

[१]*     *     *     *     *

**कंपन्यांनी केलेले अपराध.**

[२][ **१४क.** (१) जर या अधिनियमाखालील [३][ योजनेखालील [४][ [५][ निवृत्तिवेतन ] योजनेखालील किंवा विमा योजनेखालील ] ] एखादा अपराध करणारी व्यक्ती ही कंपनी असेल तर, जी व्यक्ती अपराध घडला त्यावेळी कंपनीची प्रभारी होती आणि कंपनीचे कामकाज आयोजित करण्यास जबाबदार होती, अशी प्रत्येक व्यक्ती, त्या अपराधाबद्दल दोषी असल्याचे समजले जाईल आणि तिच्या विरुद्ध कार्यवाही केली जाण्यास व तद्नुसार शिक्षा ठोठावली जाण्यास ती पात्र असेल :

परंतु, या पोटकलमात अंतर्भूत असलेल्या कशामुळेही, हा अपराध जिच्या नकळत घडला किंवा असा अपराध घडण्यास प्रतिबंध करण्यासाठी आपण यथाशक्य सर्व दक्षता घेतली होती, असे जिने शाबीत केले असेल अशी कोणतीही व्यक्ती, कोणत्याही शिक्षेस पात्र ठरवली जाणार नाही.

(२) पोटकलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जेव्हा एखादी कंपनी या अधिनियमाखालील [३][ योजनेखालील [४][ [५][ निवृत्तिवेतन ] योजनेखालील किंवा विमा योजनेखालील ]] अपराध करते आणि तो, कंपनीच्या कोणत्याही संचालकाच्या किंवा व्यवस्थापकाच्या, सचिवाच्या किंवा अन्य अधिकाऱ्यांच्या संमतीने किंवा मूकानुमतीने करण्यात आला होता किंवा तो त्यांच्या हलगर्जीपणामुळे करण्यात आला होता, असे शाबीत झाले तर, कंपनीचा असा संचालक किंवा व्यवस्थापक, सचिव किंवा अन्य अधिकारी, त्या अपराधाबद्दल दोषी असल्याचे समजले जाईल आणि तो त्याच्याविरुद्ध कार्यवाही केली जाण्यास आणि तद्नुसार शिक्षा ठोठावली जाण्यास पात्र असेल.

**स्पष्टीकरण.**— या कलमाच्या प्रयोजनार्थ,—

(क) " कंपनी " याचा अर्थ, कोणताही निगम निकाय असा आहे ; आणि त्यामध्ये पेढीचा आणि इतर व्यक्तींच्या अधिसंघाचा समावेश होतो ; आणि

(ख) " संचालक " याच्या पेढीचा संबंधातील अर्थ, पेढीतील भागीदार, असा आहे. ]

**पूर्वीच्या दोषसिद्धिनंतर विवक्षित प्रकरणांत वाढीव शिक्षा.**

[६][ **१४कक.** या अधिनियमाखाली, योजनेखाली, " [४][ [५][निवृत्तिवेतन ] योजनेखाली किंवा विमा योजनेखाली ]] शिक्षापात्र असलेल्या एखाद्या अपराधाबद्दल न्यायालयाकडून सिद्धदोष ठरवण्यात आल्यानंतर जो कोणी तोच अपराध करील तो अशा नंतरच्या प्रत्येक अपराधाबद्दल [७][ पाच वर्षांपर्यंत असू शकेल परंतु दोन वर्षांपेक्षा कमी असणार नाही एवढ्या कारावासाच्या तसेच पंचवीस हजार रुपयांपर्यंत असू शकेल ] " एवढ्या द्रव्यदंडासही पात्र होईल.

**विवक्षित अपराध दखलपात्र असणे.**

**१४कख.** " फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८ " यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमान्वये शिक्षापात्र असलेला, सेवायोजकाकडून अंशदान भरण्यात होणाऱ्या कसुरीशी संबंधित असलेला अपराध हा दखलपात्र असेल.

**अपराधांची दखल आणि संपरीक्षा.**

**१४कग.** (१) कोणतेही न्यायालय, या अधिनियमाखाली, योजनेखाली, [४][ [५][निवृत्तिवेतन ] योजनेखाली किंवा विमा योजनेखाली ] शिक्षापात्र असलेल्या कोणत्याही अपराधाची, असा अपराध घडविणाऱ्या तथ्याबाबतचा लेखी अहवाल, कलम १३ अन्वये नियुक्त केलेल्या निरीक्षकाने, केंद्रीय भविष्यनिर्वाह निधी आयुक्ताच्या किंवा केंद्र शासनाने याबाबतीत **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे ज्याला प्राधिकार दिला असेल, अशा इतर अधिकाऱ्याच्या पूर्वमंजुरीने दिला असल्याशिवाय, दखल घेणार नाही.

(२) इलाखा शहर दंडाधिकारी किंवा प्रथम वर्गाचा दंडाधिकारी यांच्यापैकी कनिष्ठ असणारे कोणतेही न्यायालय, या अधिनियमाखालील किंवा योजनेखालील किंवा [४][ [५][निवृत्तिवेतन ] योजनेखाली किंवा विमा योजनेखाली ] कोणत्याही अपराधांची संपरीक्षा करणार नाही.

---

[१] १९७३ चा अधिनियम ४०, कलम ४ अन्वये पोटकलम (३) गाळले (१ नोव्हेंबर, १९७३ रोजी व तेव्हापासून).

[२] १९५३ चा अधिनियम ३७, कलम १३ अन्वये समाविष्ट केले.

[३] १९७१ चा अधिनियम, १६ कलम १३ अन्वये मूळ मजकुराऐवजी दाखल करण्यात आला.

[४] १९७६ चा अधिनियम ९९, कलम ३१ अन्वये मूळ मजकुराऐवजी दाखल करण्यात आला.

[५] १९९६ चा अधिनियम २५, कलम ४ अन्वये " कुटुंब वेतन " या मजकुराऐवजी दाखल केले.

[६] १९७३ चा अधिनियम ४०, कलम ५ अन्वये समाविष्ट केले.

[७] १९८८ चा अधिनियम ३३, कलम १९ द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल करण्यात आला.

**१४ख.** जेव्हा एखाद्या सेवायोजक निधीचे," [1][[2][ निवृत्तिवेतन निधीचे ] किंवा विमा निधीचे ] अंशदान भरण्यात ] किंवा कलम १५ च्या पोटकलम (२) [3][" किंवा १७ च्या पोटकलम ५ ] खाली, त्याने हस्तांतरित करणे आवश्यक असलेल्या संचित रकमांचे हस्तांतरण करण्यात किंवा या अधिनियमाच्या किंवा [1][ कोणत्याही योजनेच्या किंवा विमा योजनेच्या ] अन्य कोणत्याही उपबंधानुसार किंवा कलम १७ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही शर्तीनुसार, देय असलेला कोणताही प्रभार देण्यात कसूर करील तेव्हा, [4][ केंद्रीय भविष्यनिर्वाह निधी आयुक्त किंवा केंद्र शासनाने याबाबतीत, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे ज्याला प्राधिकार दिला असेल असा इतर अधिकारी. ]

**नुकसानभरपाई वसूल करण्याची शक्ती.**

[5][ थकबाकीच्या एकूण रकमेपेक्षा अधिक नसेल इतकी त्याला लादणे योग्य वाटेल एवढी नुकसान-भरपाईची रक्कम योजनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल. त्यानुसार द्रव्यदंडाद्वारे ] [6]* * * अशा सेवायोजकाकडून वसूल करू शकेल :

[7][ परंतु असे की, अशी कोणतीही नुकसानभरपाई आकारण्यापूर्वी वसूल करण्यापूर्वी सेवायोजकाला त्याची बाजू मांडण्याची वाजवी संधी दिली जाईल ] :

[8][ परंतु आणखी, असे की, केंद्रीय मंडळाला जी आजारी औद्योगिक कंपनी आहे अशा आणि जिच्या संबंधात आजारी औद्योगिक कंपनी (विशेष उपबंध) अधिनियम, १९८५ (१९८६ चा १) याच्या कलम ४ अन्वये स्थापन झालेल्या औद्योगिक व वित्तीय पुनर्रचना मंडळाद्वारे पुनर्वसन योजना मंजूर झाली आहे अशा आस्थापनेच्या संबंधातील या कलमान्वये आकारण्यात आलेली नुकसानभरपाई योजनेत विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या अटी व शर्ती यांच्या अधीनतेने कमी करता येईल किंवा अधित्यजित करता येईल. ]

[9]**[१४ग.** (१) ज्यावेळी कोणत्याही सेवायोजकास निधीचे [1][[2][ निवृत्तिवेतन निधीचे ] किंवा विमा निधीचे ] कोणतेही अंशदान भरण्यात किंवा कलम १५ च्या पोटकलम (२) किंवा १७ च्या पोटकलम (५) अन्वये त्याने हस्तांतरित करणे आवश्यक असलेल्या संचित रकमांचे हस्तांतरण करण्यात कसूर केल्याच्या अपराधाबद्दल सिद्धदोष ठरवण्यात आले असेल तेव्हा, न्यायालय त्यास, कोणतीही शिक्षा देण्याबरोबरच, लेखी आदेश देऊन त्याद्वारे त्यास, त्या आदेशात विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीच्या (न्यायालयास योग्य वाटल्यास, आणि त्याबाबतीत अर्ज करण्यात आल्यावर, न्यायालय असा कालावधी वेळोवेळी वाढवून देऊ शकेल) आत, ज्या अंशदानाच्या रकमांच्या किंवा, प्रकरणपरत्वे, संचित रकमांच्या हस्तांतरणाच्या संबंधात अपराध करण्यात आलेला आहे ती अंशदानाची रक्कम भरण्यास किंवा त्या संचित रकमा हस्तांतरित करण्यास फर्मावू शकेल.

**न्यायालयाची आदेश देण्याची शक्ती.**

(२) ज्यावेळी पोटकलम (१) अन्वये आदेश देण्यात आला असेल, त्यावेळी न्यायालयाने दिलेल्या कालावधीच्या किंवा कोणत्याही वाढीव कालावधी देण्यात आला असल्यास अशा वाढीव कालावधीच्या आत अपराध चालू राहिल्याच्या संबंधात सेवायोजक या अधिनियमान्वये शिक्षेस पात्र असणार नाही. परंतु, अशा कालावधीच्या, किंवा, प्रकरणपरत्वे, वाढीव कालावधीच्या समाप्तीनंतर न्यायालयाच्या आदेशाचे सर्वोतोपरी अनुपालन करण्यात आले नसेल तर, सेवायोजकाने आणखी अपराध केला आहे असे समजले जाईल व त्याबद्दल त्याला कलम १४ अन्वये कारावासाची शिक्षा देण्यात येईल तसेच, अशा कालावधीच्या समाप्तीनंतर आदेशाचे पालन न केलेल्या प्रत्येक दिवसासाठी शंभर रुपयांपर्यंत असू शकेल एवढ्या द्रव्यदंडासही तो पात्र होईल. ]

---

[1] १९७६ चा अधिनियम ९९, कलम ३२ अन्वये मूळ मजकुराऐवजी दाखल केले. (१ ऑगस्ट, १९७६ रोजी व तेव्हापासून).

[2] १९९६ चा अधिनियम २५, कलम २ अन्वये "कुटुंब वेतननिधी" या ऐवजी दाखल केले.

[3] १९६३ चा अधिनियम २८, कलम १० अन्वये समाविष्ट केले (३० नोव्हेंबर, १९६३ रोजी व तेव्हापासून).

[4] १९७३ चा अधिनियम ४०, कलम ६ अन्वये "समुचित शासन" या मजकुराऐवजी दाखल केले (१ नोव्हेंबर, १९७३ रोजी व तेव्हापासून).

[5] १९८८ चा अधिनियम ३३, कलम २० अन्वये हा मजकूर दाखल केला.

[6] १९७३ चा अधिनियम ४० कलम ६ अन्वये "पंचवीस टक्के" हे शब्द गाळले (१ नोव्हेंबर, १९७३ रोजी व तेव्हापासून).

[7] वरील अधिनियमाच्या कलम ६ अन्वये समाविष्ट केले (१ नोव्हेंबर, १९७३ रोजी व तेव्हापासून).

[8] १९८८ चा अधिनियम ३३, कलम २०ख अन्वये हे परंतुक समाविष्ट करण्यात आले.

[9] १९७३ चा अधिनियम ४०, कलम ७ अन्वये समाविष्ट केले (१ नोव्हेंबर, १९७३ रोजी व तेव्हापासून).

**विद्यमान भविष्यनिर्वाह निधीसंबंधी उपबंध.**

**१५.** (१) [१][हा अधिनियम लागू असलेल्या [२][ आस्थापनेच्या ] कोणत्याही भविष्यनिर्वाह निधीचा वर्गणीदार असणारा प्रत्येक कर्मचारी, हा कलम १७ च्या उपबंध अधीनतेने, तो ज्या [२][ आस्थापनेत] नोकरीला असेल त्या [२][ आस्थापनेला ] [१][ योजना लागू होईपर्यंत ] भविष्यनिर्वाह निधीपासून त्याला उपार्जित होणाऱ्या लाभांचा हक्कदार असणे चालू राहील आणि हा अधिनियम संमत झाला नसता तर तो भविष्यनिर्वाह निधी ज्या रीतीने आणि ज्या शर्तींच्या अधीनतेने ठेवण्यात आला असता, त्याच रीतीने आणि त्याच शर्तींच्या अधीनतेने ठेवणे चालू राहील.

(२) [३][ एखाद्या [२][ आस्थापनेला ] कोणतीही योजना लागू केल्यानंतर त्या योजनेखाली स्थापन केलेल्या निधीचा सदस्य, होणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या जमाखाती त्या [२][ आस्थापनेच्या ] कोणत्याही भविष्यनिर्वाह निधीमध्ये जी संचित रक्कम शिल्लक असेल ] ती त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यात किंवा भविष्यनिर्वाह निधी स्थापन करणाऱ्या कोणत्याही विलेखामध्ये किंवा अन्य संलेखामध्ये एतद्विरुद्ध काहीही अंतर्भूत असेल तरीही, परंतु या योजनेमध्ये कोणतेही उपबंध अंतर्भूत असल्यास त्यांच्या अधीनतेने, या योजनेखाली स्थापन केलेल्या निधीमध्ये हस्तांतरित केली जाईल आणि तिला हक्कदार असणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या खात्यात निधीमध्ये जमा केली जाईल.

**विशिष्ट आस्थापनांना अधिनियम लागू नसणे.**

**१६.** [४][ (१) हा अधिनियम पुढील आस्थापनांना लागू होणार नाही :—

(क्) " सहकारी संस्था अधिनियम, १९१२ (१९१२ चा २) " यान्वये किंवा कोणत्याही राज्यात सहकारी संस्थांच्या संबंधात त्या त्या वेळी अंमलात असेल अशा अन्य कोणत्याही कायद्यान्वये नोंदणी केलेल्या, पन्नासपेक्षा कमी व्यक्तींना नोकरीस ठेवणाऱ्या आणि विद्युतशक्तीच्या सहाय्याशिवाय कामे करणाऱ्या कोणत्याही आस्थापनेला ; किंवा

[५][ (ख्) केंद्र शासनाच्या किंवा राज्य शासनाच्या मालकीची असेल किंवा त्याच्या नियंत्रणाखाली असेल अशा आणि जिचे कर्मचारी, अंशदायी भविष्यनिर्वाह निधी किंवा वार्धक्यवेतन यांसारख्या लाभांना, असे लाभ नियंत्रित करणाऱ्या केंद्र शासनाकडून वा राज्य शासनाकडून तयार करण्यात आलेल्या कोणत्याही योजनेनुसार वा नियमानुसार हक्कदार आहेत, अशा कोणत्याही आस्थापनेला ; किंवा

(ग्) कोणत्याही केंद्रीय, प्रांतीय वा राज्य अधिनियमान्वये स्थापन झालेल्या आणि जिचे कर्मचारी, अंशदायी भविष्यनिर्वाह निधी किंवा वार्धक्यवेतन यांसारख्या लाभांना, असे लाभ नियंत्रित करणाऱ्या त्या अधिनियमानुसार तयार करण्यात आलेल्या कोणत्याही योजनेनुसार वा नियमानुसार हक्कदार आहेत, अशा अन्य कोणत्याही आस्थापनेला : किंवा

(घ्) नव्याने स्थापन झालेल्या अन्य कोणत्याही आस्थापनेला अशी—आस्थापना स्थापन झालेली आहे किंवा असेल अशा दिनांकापासून तीन वर्षांचा कालावधी संपेपर्यंत. ]

**स्पष्टीकरण.**— शंका निरसनार्थ याद्वारे असे जाहीर करण्यात येते की, एखाद्या आस्थापनेने केवळ आपले ठिकाण बदलले एवढ्या एकाच कारणावरून ती आस्थापना नव्यानेच स्थापना झाली आहे असे मानण्यात येणार नाही. ]

[६][ (२) केंद्र शासनाच्या मते जर [२][ आस्थापनांच्या ] कोणत्याही वर्गाची वित्तीय स्थिती किंवा प्रकरणांची अन्य परिस्थिती लक्षात घेता, तसे करणे आवश्यक किंवा, समयोचित असेल तर केंद्र शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे त्या अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा शर्तींच्या अधीनतेने. [२][ आस्थापनांच्या ] त्यावर्गाला, अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा कालावधीसाठी हा अधिनियम लागू होण्यापासून [७][ भविष्यलक्षी किंवा भूतलक्षी ] प्रभावाने सूट देऊ शकेल. ]

---

[१] १९५३ चा अधिनियम ३, कलम १४ अन्वये विवक्षित शब्दांऐवजी दाखल केले.

[२] १९५६ चा अधिनियम ९४, कलम ३ अन्वये मूळ मजकुराऐवजी दाखल केले.

[३] १९५३ चा अधिनियम ३७, कलम १४ अन्वये विवक्षित अंक, कंस आणि अक्षरे यांऐवजी दाखल केले.

[४] १९६० चा अधिनियम ४६, कलम ५ अन्वये पूर्वीच्या पोटकलम (१) ऐवजी घातले (३१ डिसेंबर, १९६० रोजी व तेव्हापासून) १९५३ चा अधिनियम ३७, कलम १५ अन्वये कलम १६ ला त्याचे पोटकलम (१) असा नवीन क्रमांक देण्यात आला होता.

[५] १९८८ चा अधिनियम ३३, कलम २१ अन्वये मूळ खंड (ख्) ऐवजी हा खंड दाखल करण्यात आला. (स्थायी आदेश क्रमांक ७१६(ड्), दिनांक १५ जुलै, १९८८ अन्वये दिनांक १ ऑगस्ट, १९८८ रोजी व तेव्हापासून).

[६] १९५३ चा अधिनियम ३७, कलम १५ अन्वये समाविष्ट केले.

[७] १९८८ चा अधिनियम ३३, कलम २१ (दोन) अन्वये वरील मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[१] [ **१६क.** (१) सेवायोजक आणि शंभर किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्ती कामावर लावलेल्या असतील अशा आस्थापनेसंबंधातील बहुतांश कर्मचारी यांनी याबाबतीत अर्ज केल्यावर ते शासन त्या आस्थापने संबंधातील भविष्यनिर्वाह निधीचे लेखे, योजनेत विनिर्दिष्ट केलेल्या अटींच्या व शर्तींच्या अधीनतेने ठेवण्यासाठी सेवायोजकास लेखी आदेशाद्वारे प्राधिकारपत्र देऊ शकेल :

**भविष्यनिर्वाह निधीचे लेखे ठेवण्यासाठी विवक्षित सेवायोजकांना प्राधिकारपत्र देणे.**

परंतु, या पोटकलमान्वये अशा आस्थापनेच्या सेवायोजकाने भविष्यनिर्वाह निधीच्या अंशदानाची रक्कम देण्यात कोणतीही कसूर केली असेल किंवा, ह्या अधिनियमान्वये, अशा प्राधिकृतीच्या दिनांकापासून तीन वर्षांच्या कालावधीत या अधिनियमाखालील अन्य कोणताही अपराध त्याच्या हातून घडला असेल तर, अशा आस्थापनेच्या सेवायोजकाला भविष्यनिर्वाह निधीचे लेखे ठेवण्याचे प्राधिकारपत्र देण्यात येणार नाही.

(२) पोटकलम (१) अन्वये भविष्यनिर्वाह निधी लेखे ठेवण्यासाठी एखाद्या आस्थापनेस प्राधिकार पत्र देण्यात आले असेल त्याबाबतीत, अशा आस्थापनेचा सेवायोजक योजनेमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा रीतीने भविष्यनिर्वाह निधीचे लेखे ठेवील, अशी विवरणे सादर करील, अशी अंशदाने ठेव म्हणून ठेवील, निरीक्षणाच्या अशा सुविधा पुरवील, असे प्रशासकीय आकार देईल आणि अशा अन्य अटींचे व शर्तींचे पालन करील.

(३) या पोटकलमाखाली दिलेले कोणतेही प्राधिकारपत्र हे, सेवायोजकाने अधिकारपत्रातील कोणत्याही अटीचे व शर्तींचे पालन करण्यात कसूर केल्यास किंवा त्याच्या हातून या अधिनियमाच्या कोणत्याही उपबंधाखालील कोणताही अपराध घडला असेल त्याबाबतीत त्या कलमान्वये देण्यात आलेले कोणतेही प्राधिकारपत्र केंद्र शासन लेखी आदेशाद्वारे रद्द करू शकेल :

परंतु, असा प्राधिकार रद्द करण्यापूर्वी केंद्र शासन सेवायोजकाला त्याचे म्हणणे मांडण्याची वाजवी संधी देईल. ]

[२] [ **१७.** (१) समुचित शासन **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे त्या अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा शर्तींच्या अधीनतेने [३] [ कोणत्याही योजनेच्या उपबंधापैकी सर्व किंवा कोणताही उपबंध—मग भूतलक्षी प्रभावाने असो किंवा भविष्यलक्षी प्रभावाने असो—लागू होण्यापासून खालीलपैकी कोणत्याही आस्थापनेला सूट देऊ शकेल. ]

**सूट देण्याची शक्ती.**

(क) हा अधिनियम लागू असलेल्या ज्या [४] [आस्थापनेचे ], भविष्यनिर्वाह निधीच्या अंशदानाच्या दरासंबंधीचे नियम, समुचित शासनाच्या मते, कलम ६ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या नियमांपेक्षा कमी अनुकूल नसतील आणि त्यातील कर्मचारी, या अधिनियमाखालीं किंवा त्याच प्रकारच्या अन्य कोणत्याही [४] [ आस्थापनेतील ] कर्मचाऱ्यांच्या संबंधातील अन्य योजनेखाली उपबंधित केलेल्या लाभांपेक्षा एकंदरीने कमी अनुकूल नसणारे लाभ उपभोगत असतील, अशीं कोणतीही [४] [आस्थापना ] ; किंवा

(ख) ज्या आस्थापनेचे कर्मचारी भविष्यनिर्वाह निधी निवृत्तिवेतन किंवा उपदानाच्या स्वरूपातील लाभ उपभोगत असतील आणि समुचित शासनाच्या मते, असे लाभ हे पृथकपणे किंवा संयुक्तपणे एकंदरीने या अधिनियमाखाली किंवा, त्याच प्रकारच्या कोणत्याही, [४] [आस्थापनेतील ] कर्मचाऱ्यांच्या संबंधातील कोणत्याही योजनेखाली उपबंधित केलेल्या लाभांहून अशा कर्मचाऱ्यांना कमी अनुकूल नसतील असे लाभ उपभोगत असतील अशी कोणतीही [४] [आस्थापना ].

[५] * * * * *

[६] [ परंतु, अशी कोणतीही सूट केंद्रीय मंडळाशी विचारविनिमय केल्याशिवाय दिली जाणार नाही आणि ते मंडळ विचारविनिमय केल्यानंतर सूट देण्यासंबंधातील आपली मते योजनेत विनिर्दिष्ट केलेल्या कालमर्यादेत समुचित शासनाला कळवील. ]

---

[१] १९८८ चा अधिनियम, ३३, कलम २२ अन्वये नवीन कलम समाविष्ट करण्यात आले.

[२] १९५३ चा अधिनियम, ३७, कलम १६ अन्वये मूळ कलमाऐवजी दाखल केले.

[३] १९८८ चा अधिनियम, ३३, कलम २३(क्) (एक) अन्वये मूळ मजकुराऐवजी घातले. (स्थायी आदेश क्रमांक ७१६(ङ्), दिनांक १५ जुलै १९८८ अन्वये, दिनांक १ ऑक्टोबर १९८८ रोजी व तेव्हापासून).

[४] १९५६ चा अधिनियम, ९४, कलम ३ अन्वये मूळ मजकुराऐवजी दाखल करण्यात आला.

[५] १९६३ चा अधिनियम, २८, कलम १ अन्वये स्पष्टीकरण गाळले (३० नोव्हेंबर १९६३ रोजी व तेव्हापासून).

[६] १९८८ चा अधिनियम, ३३, कलम २३(क्) (दोन) अन्वये समाविष्ट केले. (स्थायी आदेश क्रमांक ७१६(ङ्), दिनांक १५ जुलै १९८८ अन्वये, दिनांक १ ऑक्टोबर, १९८८ रोजी व तेव्हापासून).

[१] [ (१क) पोटकलम (१) च्या खंड (क्) अन्वये आस्थापनेला सूट देण्यात आली असेल अशा बाबतीत,—

(क्) कलमे ६, ७क, ८ व १४ख यांचे उपबंध, शक्य तेथवर अशी सूट देणाऱ्या अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा इतर शर्तीबरोबरच, सूट देण्यात आलेल्या आस्थापनेच्या सेवायोजकाला लागू होतील आणि असा सेवायोजक कोणतेही उक्त उपबंध यांचे उल्लंघन करील किंवा त्यांच्या अनुपालनात कसूर करील अशा बाबतीत, जणू काही उक्त आस्थापनेला खंड (क्) अन्वये सूट देण्यात आलेली नसल्याप्रमाणे तो कलम १४ खालील शिक्षेस पात्र असेल ;

(ख्) सेवायोजक, भविष्यनिर्वाह निधीच्या प्रशासनासाठी योजनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल इतक्या सदस्यांचा समावेश असलेल्या विश्वस्त मंडळाची स्थापना करील ;

(ग्) विश्वस्त मंडळाच्या सदस्यांच्या सेवेच्या अटी व शर्ती योजनेत विनिर्दिष्ट करण्यात येतील त्यानुसार असतील ;

(घ्) खंड (ख्) अन्वये स्थापन करण्यात आलेले विश्वस्त मंडळ—

(एक) प्रत्येक कर्मचाऱ्याच्या संबंधात जमा झालेले अंशदान काढून घेतलेल्या रकमा आणि उपार्जित झालेले व्याज दर्शविण्यासाठी तपशीलवार लेखे ठेवील ;

(दोन) विभागीय भविष्यनिर्वाह निधी आयुक्ताला किंवा केंद्र शासन वेळोवेळी निर्देशित करील अशा अन्य कोणत्याही अधिकाऱ्याला अशी विवरणपत्रे सादर करील ;

(तीन) केंद्र शासनाकडून वेळोवेळी काढण्यात येतील अशा निदेशांनुसार भविष्यनिर्वाह निधींच्या पैशाची गुंतवणूक करील ;

(चार) आवश्यक असेल तेथे, कोणत्याही कर्मचाऱ्याच्या भविष्यनिर्वाह निधी लेख्याचे हस्तांतरण करील ; आणि

(पाच) योजनेत विनिर्दिष्ट करण्यात येतील अशी अन्य कर्तव्ये पार पाडील.

(१ख) पोटकलम (१क) च्या खंड (ख्) अन्वये स्थापन करण्यात आलेले विश्वस्त मंडळ, त्या पोटकलमाच्या खंड (घ्) च्या कोणत्याही उपबंधाचे व्यतिक्रमण करील किंवा त्यांच्या अनुपालनात कसूर करील अशा बाबतीत उक्त मंडळाच्या विश्वस्तांनी कलम १४ च्या पोटकलम (२क) अन्वये अपराध केल्याचे मानण्यात येईल आणि ते त्या पोटकलमात उपबंधित करण्यात आलेल्या शास्तीच्या शिक्षेस पात्र असतील.

[२] [ (१ग) समुचित शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे आणि निवृत्तिवेतन निधीच्या गुंतवणुकीचे स्वरूप विहित करणाऱ्या व त्यात विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा इतर शर्तींच्या अधीनतेने, जर एखाद्या आस्थापनेचे कर्मचारी किंवा आस्थापनेच्या वर्गाचे कर्मचारी, इतर कोणत्याही निवृत्तिवेतन योजनेचे सदस्य असतील किंवा अशा निवृत्तिवेतन योजनेचे सदस्य होण्याचा त्यांचा प्रस्ताव असेल आणि त्या निवृत्तिवेतन योजनेचे लाभ या अधिनियमाखालील निवृत्तिवेतन योजनेच्या लाभाइतकेच असतील किंवा जास्त अनुकूल असतील तर त्या आस्थापनेला किंवा आस्थापनाच्या वर्गाला या निवृत्तिवेतन योजनेच्या प्रवर्तनातून सूट देऊ शकेल. ]

(२) योजना लागू असेल अशा कोणत्याही [३][आस्थापनेत] नोकरीस ठेवलेल्या कोणत्याही व्यक्तीला किंवा व्यक्तींच्या वर्गाला, जर अशी व्यक्ती किंवा व्यक्तींचा वर्ग, भविष्यनिर्वाह निधी, उपदान किंवा वार्धक्य निवृत्तिवेतन या स्वरूपातील लाभांचा हक्कदार असेल आणि असे लाभ हे पृथकपणे किंवा संयुक्तपणे, एकंदरीने, या अधिनियमाखाली किंवा योजनेखाली उपबंधित केलेल्या लाभांहून कमी अनुकूल नसतील तर अशा व्यक्तीला किंवा व्यक्तींच्या वर्गाला, या योजनेच्या सर्व किंवा कोणत्याही उपबंधाच्या प्रवर्तनापासून सूट देण्याचा उपबंध कोणत्याही योजनेत करता येईल :

परंतु, अशी कोणतीही सूट व्यक्तींच्या एखाद्या वर्गाला, अशा वर्गापैकी बहुसंख्य व्यक्तींची अशा लाभांचे हक्कदार असणे चालू रहावे अशी इच्छा आहे, असे समुचित शासनाचे मत असल्याखेरीज मंजूर केली जाणार नाही.

[४][ (२क) [५][ जर सेवायोजकाने तसे न करण्याची विनंती केली असेल तर, एखाद्या आस्थापनेतील कर्मचारी कोणतेही वेगळे अंशदान न देता किंवा हप्ता न भरता आयुर्विम्याच्या स्वरूपाचे लाभ,—मग

[१] १९८८ चा अधिनियम ३३, कलम २३ (ख्) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर समाविष्ट करण्यात आला (स्थायी आदेश क्रमांक ७१६(ङ्), दिनांक १५ जुलै, १९८८ अन्वये दिनांक १ ऑक्टोबर १९८८ रोजी व तेव्हापासून).

[२] १९९६ चा अधिनियम २५, कलम ७ अन्वये मूळ मजकुराऐवजी दाखल करण्यात आला.

[३] १९५६ चा अधिनियम ९४, कलम ३ अन्वये मूळ मजकुराऐवजी दाखल करण्यात आला.

[४] १९७६ चा अधिनियम ९९, कलम ३४ अन्वये समाविष्ट केले. (१ ऑगस्ट १९७६ रोजी व तेव्हापासून).

[५] १९८८ चा अधिनियम ३३, कलम २३(ग्) अन्वये मूळ मजकुराऐवजी दाखल करण्यात आला (स्थायी आदेश क्रमांक ७१६(ङ्), दिनांक १५ जुलै १९८८ अन्वये दिनांक १ ऑक्टोबर १९८८ रोजी व तेव्हापासून).

ते त्यांच्या भविष्यनिर्वाह निधीतील ठेवींशी संलग्न असोत किंवा नसोत-उपभोगत आहेत आणि असे लाभ हे, अशा कर्मचाऱ्यांना, विमा योजनेअन्वये अनुज्ञेय असलेल्या लाभांपेक्षा अधिक अनुकूल आहेत याविषयी केंद्रीय भविष्यनिर्वाह निधी आयुक्तांची खात्री पटली असल्यास, तो, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे आणि त्या अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा शर्तींच्या अधीनतेने, अशा आस्थापनेत विमा योजनेच्या सर्व किंवा कोणत्याही उपबंधांच्या प्रवर्तनापासून भविष्यलक्षी किंवा भूतलक्षी प्रभावाने सूट देऊ शकेल. ]]

(२ख) कोणत्याही आस्थापनेत नोकरीस ठेवलेल्या आणि त्या योजनेच्या कक्षेत येणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस किंवा व्यक्तींच्या वर्गास अनुज्ञेय असलेले आयुर्विम्याच्या स्वरूपातील लाभ हे अशा व्यक्तीस किंवा व्यक्तींच्या वर्गास विमा योजनेत उपबंधित केलेल्या लाभांपेक्षा अधिक अनुकूल असतील तर, पोट-कलम (२क) च्या उपबंधांना बाध न येता, विमा योजनेमध्ये अशा व्यक्तीस किंवा व्यक्तींच्या वर्गास त्या योजनेच्या सर्व किंवा कोणत्याही उपबंधांच्या प्रवर्तनापासून सूट देण्यासाठी उपबंध करता येईल. ]

[१][ (३) जेव्हा एखाद्या आस्थापनेत नोकरीस ठेवलेल्या कोणत्याही व्यक्तीच्या किंवा व्यक्तींच्या वर्गाच्या संबंधात, कोणत्याही योजनेच्या सर्व किंवा कोणत्याही उपबंधांच्या प्रवर्तनापासून या कलमाद्वारे सूट देण्यात आली असेल (मग अशी सूट, अशी व्यक्ती किंवा व्यक्तींचा वर्ग ज्यामध्ये नोकरीस ठेवलेला आहे, अशा आस्थापनेला देण्यात आली असो किंवा त्या व्यक्तीला किंवा व्यक्तींच्या वर्गाला म्हणून देण्यात आलेली असो) तेव्हा अशा आस्थापनेच्या संबंधात सेवायोजक पुढील गोष्टी करील :—

(क) अशी व्यक्ती किंवा व्यक्तीचा वर्ग ज्याला हक्कदार असेल अशा भविष्यनिर्वाह निधीच्या, निवृत्तिवेतनाच्या उपदानाच्या संबंधात, केंद्र शासन निदेश देईल असे हिशेब ठेवील, अशी विवरणे सादर करील, अशा गुंतवणुका करील, तपासणीसाठी अशा सुविधा पुरवील आणि असे तपासणी आकार भरील ;

(ख) सूट दिल्यानंतर कोणत्याही वेळी, केंद्र शासनाच्या परवानगीखेरीज अशी व्यक्ती किंवा व्यक्तींचा वर्ग, सूट मिळण्याच्यावेळी ज्याला हक्कदार असेल अशा, निवृत्तिवेतन, उपदान किंवा भविष्यनिर्वाह निधी यांच्या स्वरूपातील लाभांच्या एकूण परिणामात कपात करणार नाही, आणि

(ग) जेव्हा अशी एखादी व्यक्ति आपली नोकरी सोडून, हा अधिनियम लागू असलेल्या दुसऱ्या आस्थापनेत पुनर्नियुक्ती मिळवील तेव्हा, केंद्र शासन याबाबतीत विनिर्दिष्ट करील अशा मुदतीच्या आत, तिने सोडलेल्या आस्थापनेच्या भविष्यनिर्वाह निधींमध्यें तिच्या नावावर जमा असलेली संचित रक्कम, तिची ज्या आस्थापनेत पुनर्नियुक्ती झाली असेल त्या आस्थापनेच्या भविष्यनिर्वाह निधींमध्ये त्या व्यक्तीच्या खात्यावर किंवा, प्रकरणपरत्वे, त्या आस्थापनेला लागू होणाऱ्या योजनेखाली स्थापन केलेल्या निधीमध्ये हस्तांतरित करील. ]

[२][ (३क) जेव्हा एखाद्या आस्थापनेत नोकरीस ठेवलेल्या कोणत्याही व्यक्तीच्या किंवा व्यक्तींच्या वर्गासंबंधात विमा योजनेच्या सर्व किंवा कोणत्याही उपबंधांच्या प्रवर्तनापासून, पोटकलम (२क) किंवा पोटकलम (२ख) अन्वये सूट देण्यात आली असेल (मग अशी सूट अशी व्यक्ती किंवा व्यक्तींचा वर्ग, ज्यामध्ये नोकरीस ठेवलेला आहे, अशा आस्थापनेला देण्यात आलेली असो किंवा त्या व्यक्तीला किंवा त्या व्यक्तींच्या वर्गाला म्हणून देण्यात आलेली असो) तेव्हा अशा आस्थापनेच्या संबंधात सेवायोजक पुढील गोष्टी करील :—

(क) अशी व्यक्ती किंवा व्यक्तींचा वर्ग ज्याचा हक्कदार असेल अशा आयुर्विम्याच्या स्वरूपातील लाभाच्या संबंधात किंवा कोणत्याही विमा निधीच्या संबंधात, केंद्र शासन निदेश देईल असे हिशेब ठेवील, अशी विवरणे सादर करील, अशा गुंतवणुका करील, तपासणीसाठी अशा सुविधा पुरवील आणि असे तपासणी आकार भरील ;

(ख) सूट दिल्यानंतर कोणत्याही वेळी, केंद्र शासनाच्या परवानगीशिवाय, अशी व्यक्ती किंवा व्यक्तींचा वर्ग, सूट मिळाल्यानंतर ज्याचा हक्कदार असेल अशा आयुर्विम्याच्या स्वरूपातील लाभांच्या एकूण परिणामात कपात करणार नाही ; [३]* * * *

[३]* * * * * *

---

[१] १९६३ चा अधिनियम २८, कलम ११ अन्वये पोटकलम (३) ऐवजी समाविष्ट केले (३० नोव्हेंबर १९६३ रोजी व तेव्हापासून).

[२] १९७६ चा अधिनियम ९९, कलम ३४ अन्वये समाविष्ट केले (१ ऑगस्ट १९७६ रोजी व तेव्हापासून).

[३] १९८८ चा अधिनियम ३३, कलम २३(घ) अन्वये खंड (ख) मधील "आणि" हा शब्द तसेच खंड (ग) वगळण्यात आला (स्थायी आदेश क्रमांक ७१६(ड्), दिनांक १५ जुलै १९८८ अन्वये दिनांक १ ऑक्टोबर १९८८ रोजी व तेव्हापासून).

(४) जर एखाद्या सेवायोजकाने,—

(क्) पोटकलम (१) अन्वये मंजूर केलेल्या सुटीच्या बाबतीत त्या पोटकलमान्वये [1] [किंवा पोटकलम (१क) अन्वये ] लादलेल्या कोणत्याही शर्तीचे किंवा पोटकलम (३) च्या कोणत्याही उपबंधाचे ;

[2]* * * * *

[3][ (क्क्) पोटकलम [4][ (१ग) ] अन्वये मंजूर केलेल्या सुटीच्या बाबतीत त्या पोटकलमान्वये लादण्यात आलेल्या कोणत्याही शर्तीचे ; आणि ]

(ख्) पोटकलम (२) अन्वये मंजूर केलेल्या सुटीच्या बाबतीत, पोटकलम (३) च्या कोणत्याही उपबंधाचे ;

[5][ (ग्) कलम (२क) अन्वये मंजूर केलेल्या सुटीच्या बाबतीत, त्या पोट-कलमान्वये लादण्यात आलेल्या कोणत्याही शर्तीचे किंवा कोणत्याही उपबंधाचे ;

(घ्) कलम (२ख) अन्वये मंजूर केलेल्या सुटीच्या बाबतीत, कलम (३क) च्या कोणत्याही उपबंधाचे ] अनुपालन करण्यात कसूर केली असेल तर, या कलमान्वये मंजूर केलेली कोणतीही सूट, ती मंजूर करणारा प्राधिकारी लेखी आदेशाद्वारे रद्द करू शकेल.

[6][ (५) पोटकलम (१), पोटकलम [7][ (१ग) ], पोटकलम (२), पोटकलम (२क) किंवा पोटकलम (२ख) ] अन्वये मंजूर केलेली सूट जेव्हा रद्द करण्यात आली असेल तेव्हा, अशी सूट ज्याला ज्याला लागू होती अशा प्रत्येक कर्मचाऱ्यांच्या जमाखाती तो ज्या आस्थापनेत नोकरीला असेल त्या आस्थापनेच्या भविष्यनिर्वाह निधीत [8][[9][ निवृत्तिवेतन निधी ] किंवा विमा निधीमध्ये ] जमा असलेली संचित रक्कम [10][ संपूर्ण सेवेचा कालावधी पूर्ण होण्यापूर्वी ज्याने नोकरी सोडली असेल अशा कर्मचाऱ्यांच्या जमाखाती जमा असलेल्या नियोक्त्याच्या अंशदानाच्या हिश्श्यातून जप्त करण्यात आलेल्या कोणत्याही रकमेसह ] त्या योजनेमध्ये किंवा [11][ निवृत्तिवेतन ] योजनेमध्ये [8][ किंवा विमा योजनेमध्ये ] विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा मुदतीच्या आत आणि अशा रीतीने निधीत किंवा [9][ निवृत्तिवेतन निधीत ] [8][ किंवा ], प्रकरणपरत्वे, [8][ विमा निधीत ] त्याच्या जमा खात्यावर हस्तांतरित केली जाईल.

(६) पोटकलम [12][ (१ग) ] च्या उपबंधांच्या अधीनतेने, एखाद्या सूट दिलेल्या आस्थापनेच्या किंवा [11][ निवृत्तिवेतन ] योजनेचे उपबंध लागू असणाऱ्या एखाद्या आस्थापनेच्या एखाद्या कर्मचाऱ्याचा नियोक्ता, पोट-कलम (१) किंवा पोटकलम (२) अन्वये सूट मंजूर केली असली तरी, [9][ निवृत्तिवेतन निधी ] मध्ये सेवायोजकाच्या अंशदानाचा निवृत्तिवेतन योजनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल असा भाग [13]* * * त्याच्या भविष्यनिर्वाह निधीमध्ये [13]* * * अशा मुदतीच्या आत आणि अशा रीतीने भरील. ]

---

[1] १९८८ चा अधिनियम ३३, कलम २३(ङ्) (एक) अन्वये हा मजकूर समाविष्ट केला (स्थायी आदेश क्रमांक ७१६(ङ्), दिनांक १५ जुलै १९८८ अन्वये दिनांक १ ऑक्टोबर १९८८ रोजी व तेव्हापासून).

[2] १९७१ चा अधिनियम १६, कलम २७ अन्वये " आणि " हा शब्द गाळला (२३ एप्रिल १९७१ रोजी व तेव्हापासून).

[3] वरील अधिनियमाच्या कलम २७ अन्वये समाविष्ट केले (२३ एप्रिल १९७१ रोजी व तेव्हापासून).

[4] १९८८ चा अधिनियम ३३, कलम २३(ङ्) (दोन) अन्वये मूळ मजकुराऐवजी दाखल करण्यात आला (स्थायी आदेश क्रमांक ७१६(ङ्), दिनांक १५ जुलै १९८८ अन्वये दिनांक १ ऑक्टोबर १९८८ रोजी व तेव्हापासून).

[5] १९७६ चा अधिनियम ९९, कलम ३४ अन्वये समाविष्ट केले (१ ऑगस्ट १९७६ रोजी व तेव्हापासून).

[6] १९७१ चा अधिनियम १६, कलम २७ अन्वये पोटकलम (५) ऐवजी दाखल केला (२३ एप्रिल १९७१ रोजी व तेव्हापासून).

[7] १९८८ चा अधिनियम ३३, कलम २३(च्) (एक) अन्वये मूळ अक्षराऐवजी दाखल केले (स्थायी आदेश क्रमांक ७१६(ङ्), दिनांक १५ जुलै १९८८ अन्वये दिनांक १ ऑक्टोबर १९८८ रोजी व तेव्हापासून).

[8] १९७६ चा अधिनियम ९९, कलम ३४ अन्वये दाखल करण्यात आला (१ ऑगस्ट १९७६ रोजी व तेव्हापासून).

[9] १९९६ चा अधिनियम २५, कलम २ अन्वये " कुटुंब वेतन निधी " या मजकुराऐवजी दाखल करण्यात आला.

[10] १९८८ चा अधिनियम ३३, कलम २३(च्) (दोन) अन्वये समाविष्ट केला. (स्थायी आदेश क्रमांक ७१६(ङ्), दिनांक १५ जुलै १९८८ अन्वये दिनांक १ ऑक्टोबर १९८८ रोजी व तेव्हापासून).

[11] १९९६ चा अधिनियम २५, कलम ४ अन्वये " कुटुंब वेतन " या मजकुराऐवजी दाखल करण्यात आला.

[12] १९८८ चा अधिनियम ३३, कलम २३(छ्) द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल केले. (स्थायी आदेश क्रमांक ७१६(ङ्), दिनांक १५ जुलै १९८८ अन्वये दिनांक १ ऑक्टोबर १९८८ रोजी व तेव्हापासून).

[13] १९९६ चा अधिनियम २५ कलम ७ (ख्) द्वारे गाळले.

**खात्याचे हस्तांतरण.**

[१][ **१७क.** (१) हा अधिनियम लागू असलेल्या आस्थापनेत नोकरीस ठेवलेला कर्मचारी जेव्हा आपली नोकरी सोडून हा अधिनियम लागू नसेल अशा आस्थापनेत पुनर्नियुक्ती मिळवील, तेव्हा, त्याने सोडलेल्या आस्थापनेच्या निधीमधील अशा कर्मचाऱ्याच्या जमाखाती असलेली संचित रक्कम, केंद्र शासन याबाबतीत विनिर्दिष्ट करील अशा मुदतीच्या आत, जर त्या कर्मचाऱ्याची तशी इच्छा असेल आणि त्या भविष्यनिर्वाह निधीसंबंधीच्या नियमांनुसार अशा हस्तांतरणाला परवानगी असेल तर, त्याची ज्या आस्थापनेत पुनर्नियुक्ती झाली आहे, त्या आस्थापनेच्या भविष्यनिर्वाह निधीच्या खात्यात हस्तांतरित केली जाईल.

(२) हा अधिनियम लागू नसलेल्या अशा आस्थापनेत नोकरीस लावलेला कर्मचारी जेव्हा आपली नोकरी सोडील व हा अधिनियम लागू असलेल्या दुसऱ्या आस्थापनेत पुनर्नियुक्ती मिळवील, त्यावेळी अशा कर्मचाऱ्याने सोडलेल्या, आस्थापनेच्या भविष्यनिर्वाह निधीमध्ये, अशा कर्मचाऱ्यांच्या नावे साचलेली जमा रक्कम, जर त्या कर्मचाऱ्याची तशी इच्छा असेल आणि अशा भविष्यनिर्वाह निधीसंबंधीच्या नियमांनुसार अशा हस्तांतरणाला परवानगी असेल तर, त्याची ज्या आस्थापनेत पुनर्नियुक्ती झाली आहे, त्या आस्थापनेच्या निधीतील किंवा, प्रकरणपरत्वे, भविष्यनिर्वाह निधीतील त्याच्या खात्यात हस्तांतरित केली जाईल. ]

**१९५६ चा अधिनियम ३१, यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी प्रस्तुत अधिनियम अंमलात येणे.**

[२][ **१७कक.** "आयुर्विमा महामंडळ अधिनियम, १९५६" यामध्ये या अधिनियमाशी विसंगत असे काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमाचे उपबंध अंमलात येतील. ]

**आस्थापनेच्या हस्तांतरणाच्या प्रकरणी दायित्व.**

[३][**१७ख.** ज्यावेळी एखाद्या आस्थापनेच्या संबंधातील एखादा सेवायोजक विक्री, देणगी, भाडेपट्टा किंवा लायसनद्वारे किंवा इतर कोणत्याही रीतीने ती संपूर्ण आस्थापना किंवा तिचा काही भाग हस्तांतरित करील तेव्हा तो सेवायोजक आणि ती आस्थापना जिला अशा प्रकारे हस्तांतरित करण्यात आली असेल ती व्यक्ती; अशा हस्तांतरणाच्या तारखेपर्यंतच्या कालावधीच्या संबंधात, त्या सेवायोजकाकडून या अधिनियमाच्या, योजनेच्या किंवा [४][ [५][ निवृत्तिवेतन योजनेच्या ] किंवा विमा योजनेच्या ] कोणत्याही उपबंधान्वये येणे असलेल्या अंशदानाच्या व इतर रकमा भरण्यास संयुक्तपणे व पृथक्‌पणे दायी असतील :

परंतु, हस्तांतरितीचे दायित्व हे त्यास अशा हस्तांतरणाने प्राप्त झालेल्या मत्तांच्या मूल्याएवढे मर्यादित राहील. ]

**सद्‌भावपूर्वक केलेल्या कृतीचे संरक्षण.**

[६][ **१८.** हा अधिनियम, [५][ निवृत्तिवेतन योजना ] किंवा विमा योजना यानुसार सद्‌भावपूर्वक केलेल्या किंवा करण्याचा उद्देश असलेल्या कोणत्याही कृतीसाठी केंद्र शासन, राज्य शासन, अधिकरणांचा अध्यक्षीय अधिकारी, कलम ७क मध्ये उल्लेखिलेला कोणताही प्राधिकारी, निरीक्षक किंवा अन्य कोणतीही व्यक्ती यांच्या विरुद्ध कोणताही दावा, खटला किंवा वैध कार्यवाही होऊ शकणार नाही.

**अध्यक्षीय अधिकारी व इतर अधिकारी लोकसेवक असतील.**

**१८क.** अधिकरणाचा अध्यक्षीय अधिकारी, त्याचे अधिकारी व इतर कर्मचारी, कलम ७क मध्ये निदेशिलेले प्राधिकारी आणि प्रत्येक निरीक्षक भारतीय दंड संहितेच्या (१८६० चा ४५) अर्थांतर्गत लोकसेवक असल्याचे मानण्यात येईल. ]

---

[१] १९६३ चा अधिनियम २८, कलम १२ अन्वये समाविष्ट केले (३० नोव्हेंबर, १९६३ रोजी व तेव्हापासून).

[२] १९७६ चा अधिनियम ९९, कलम ३५ अन्वये समाविष्ट केले (१ ऑगस्ट, १९७६ रोजी व तेव्हापासून).

[३] १९७३ चा अधिनियम ४०, कलम ८ अन्वये समाविष्ट केले (१ नोव्हेंबर, १९७३ रोजी व तेव्हापासून).

[४] १९७६ चा अधिनियम ९९, कलम ३१ अन्वये मूळ मजकुराऐवजी दाखल केले (७ सप्टेंबर, १९७६ रोजी व तेव्हापासून).

[५] १९९६ चा अधिनियम २५, कलम ४ अन्वये "कुटुंब वेतन" या मजकुराऐवजी दाखल केले.

[६] १९८८ चा अधिनियम ३३, कलम २४ अन्वये कलम १८ ऐवजी दाखल केले (स्थायी आदेश क्रमांक ७१६(ङ्), दिनांक १५ जुलै, १९८८ अन्वये दिनांक १ ऑगस्ट, १९८८ रोजी व तेव्हापासून).

**शक्तीचे प्रत्यायोजन.** [1][ **१९.** समुचित शासन असा निदेश देऊ शकेल की, या अधिनियमाखाली, [2][ योजनेखाली, [3][ [4][ निवृत्तिवेतन ] योजनेखाली किंवा विमा योजनेखाली ]] त्याने वापरावयाची कोणतीही शक्ति किंवा प्राधिकार किंवा अधिकारिता, निदेशामध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा बाबींच्या संबंधात आणि अशा काही शर्ती असल्यास, त्यांच्या अधीनतेने—

(क) जेव्हा समुचित शासन केंद्र शासन असेल, तेव्हा अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल त्याप्रमाणे केंद्र शासनाला दुय्यम असणाऱ्या अधिकाऱ्यांकडून किंवा प्राधिकरणाकडून किंवा राज्य शासनाला दुय्यम असणाऱ्या अशा अधिकाऱ्यांकडून किंवा प्राधिकरणाकडून ; आणि

(ख) समुचित शासन राज्य शासन असेल तेव्हा अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल त्याप्रमाणे, राज्य शासनाला दुय्यम असणाऱ्या अधिकाऱ्यांकडून किंवा प्राधिकरणाकडूनही वापरण्यायोग्य असेल.]

**१९क.** [5][* * * *].

**केंद्र शासनाची निदेश देण्याची शक्ती.** **२०.** केंद्र शासनाला, या अधिनियमाच्या कार्यक्षम प्रशासनासाठी, वेळोवेळी त्याला योग्य वाटतील असे निदेश केंद्रीय मंडळाला देता येतील आणि असा निदेश देण्यात येईल तेव्हा, केंद्रीय मंडळ अशा निदेशाचे अनुपालन करील.

**नियम करण्याची शक्ती.** **२१.** (१) केंद्र शासनाला **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, या अधिनियमांचे उपबंध पार पाडण्यासाठी नियम करता येतील.

(२) पूर्वगामी शक्तींच्या सर्वसाधारणतेस बाध न आणता, अशा नियमाद्वारे, खालील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही बाबींसाठी उपबंध करता येतील, त्या अशा :—

(क) अध्यक्षीय अधिकारी आणि अधिकरणांचे कर्मचारी यांचे वेतन व भत्ते आणि सेवेच्या इतर अटी व शर्ती ;

(ख) अधिकरणापुढे अपील कशा स्वरूपात आणि कशा रीतीने सादर करावे आणि त्याचा कालावधी आणि ते अपील सादर करण्यासाठी देय फी ;

(ग) कलम ८ग च्या पोटकलम (२) अन्वये वसुली अधिकाऱ्याकडे पाठवावयाच्या प्रमाणपत्रांची प्रत प्रमाणित करण्याची रीत ;

(घ) या अधिनियमाखालील नियमाद्वारे विहित करणे आवश्यक असेल किंवा करता येईल अशी अन्य कोणतीही बाब.

(३) या कलमाखालील केलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर होईल तितक्या लवकर संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर ते एका सत्राने बसलेल्या अथवा दोन किंवा अधिक क्रमवर्ती सत्रे मिळून बनलेल्या अशा एकूण तीस दिवसांच्या कालावधीकरिता सत्रासीन असताना ठेवला जाईल. आणि पूर्वोक्त सत्राच्या क्रमवर्ती सत्राच्या पाठोपाठचे सत्र संपण्यापूर्वी, जर त्या नियमात कोणतेही आपरिवर्तन करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले अथवा तो नियम करण्यात येऊ नये याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले तर, त्यानंतर तो नियम अशा आपरिवर्तित रूपातच परिणामकारक होईल किंवा, प्रकरणपरत्वे, मुळीच परिणामक होणार नाही. तथापि, अशा कोणत्याही आपरिवर्तनामुळे किंवा शून्यीकरणामुळे, तत्पूर्वी त्या नियमाखाली करण्यात आलेल्या कोणत्याही गोष्टींच्या विधिग्राह्यतेला बाध येणार नाही.

**अडचणी निवारण्याची शक्ती.** **२२.** (१) अधिनियमाचे उपबंध परिणामकारक करण्यामध्ये कोणतीही अडचण उद्‌भवल्यास, कर्मचारी भविष्यनिर्वाह निधी आणि संकीर्ण उपबंध (विशोधन) अधिनियम, १९८८ द्वारे विशोधित केल्यानुसार केंद्र शासनाला, **शासकीय राजपत्रात** प्रकाशित केलेल्या आदेशाद्वारे या अडचणींच्या निवारणार्थ, त्याला आवश्यक वाटतील असे, या अधिनियमाच्या उपबंधांशी विसंगत नसणारे उपबंध करता येतील :

परंतु, उक्त विशोधन अधिनियमाला राष्ट्रपतींची अनुमती मिळाल्याच्या दिनांकापासून तीन वर्षांचा कालावधी संपल्यानंतर असा कोणताही आदेश देता येणार नाही.

(२) या अधिनियमान्वये देण्यात आलेला प्रत्येक आदेश, तो करण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर ठेवण्यात येईल.

**२३.** [5][* * * *].

---

[1] १९५३ चा अधिनियम ३७, कलम १७ अन्वये कलम १९ ऐवजी दाखल केले.

[2] १९७१ चा अधिनियम १६, कलम २९ अन्वये "कोणत्याही योजनेखाली" ऐवजी दाखल केले.

[3] १९७६ चा अधिनियम ९९, कलम २९ अन्वये मूळ मजकुराऐवजी दाखल केला (७ सप्टेंबर, १९७६ रोजी व तेव्हापासून).

[4] १९९६ चा अधिनियम २५, कलम ४ अन्वये "कुटुंब वेतन" या मजकुराऐवजी दाखल केले.

[5] १९८८ चा अधिनियम ३३, यांच्या कलम २५ अन्वये हा मजकूर वगळण्यात आला.

उद्योग

## पहिली अनुसूची

[ कलमे २(एक) आणि ४ पहा ]

खालीलपैकी कोणत्याही वस्तूच्या निर्मितीचे [1]* * * *काम करणारा कोणताही उद्योग, त्या वस्तू म्हणजे—

सिमेंट, सिगारेट,

विद्युत, यांत्रिक किंवा सर्वसाधारण अभियांत्रिकी उत्पादने,

लोखंड आणि पोलाद.

कागद.

कापड (संपूर्णतः किंवा अंशतः सूती किंवा लोकरी किंवा तागाचे किंवा रेशमी-नैसर्गिक किंवा कृत्रिम)

[2][१. आगपेट्या.

२. खाद्यतेल्ले व चरबी.

३. साखर.

४. रबर व रबर उत्पादने.

५. वीज निर्मिती, पारेषण आणि वितरण यांसह विद्युतशक्ती.

६. चहा.

७. मुद्रण [ श्रमिक पत्रकार (सेवेच्या शर्ती) आणि संकीर्ण उपबंध अधिनियम, १९५५ (१९५५ चा ४५) मध्ये दिलेल्या व्याख्येप्रमाणे असलेल्या वृत्तपत्र आस्थापनांशी संबंधित असणाऱ्या मुद्रण उद्योगाव्यतिरिक्त मुद्रणासाठी मुद्राक्षरांची जुळणी करण्याची, अक्षरमुद्रणांद्वारे मुद्रण करण्याची, शिलामुद्रणाची, उत्कीर्ण प्रकाशलेखनाची (फोटोग्रेवर), किंवा तत्सम अन्य प्रक्रिया किंवा पुस्तक बांधणी यांसह. ]

८. काच.

९. पाण्याचे दगडी नळ.

१०. स्वच्छताविषयक सामान.

११. उच्च आणि कमी दाबाचे चिनी मातीचे विद्युत विरोधक.

१२. उत्तापसह भट्ट्या (रिफ्रॅक्टरीज).

१३. कोले. ]

[3][ १. जड आणि विशुद्ध रसायने—

(एक) रासायनिक खते,

(दोन) टर्पेन्टाईन,

(तीन) राळ,

(चार) वैद्यकीय आणि औषधीय सिद्धपदार्थ,

(पाच) सौंदर्यप्रसाधन सिद्धपदार्थ,

(सहा) साबण,

(सात) शाई,

(आठ) मध्यम द्रव्ये, रंग, रंगीत लाख आणि रंग खुलविणारे पदार्थ,

(नऊ) मेदयुक्त आम्ले, आणि

[4][ (दहा) उद्योगांमधील ऑक्सिजन, ॲसिटिलीन आणि कर्बाद्विप्रणिल वायू. ]

२. नीळ.

३. लाख व लाखेच्या कांड्या.

---

[1] १९५३ चा अधिनियम ३७, कलम १८ अन्वये "किंवा उत्पादनाचे" हे शब्द गाळले.

[2] अधिसूचना क्रमांक एस. आर. ओ. १५६६, दिनांक ४ जुलै, १९५६ अन्वये जादा दाखल केले, पहा **भारताचे राजपत्र**, भाग दोन, विभाग ३, पृष्ठ १९९२, (३१ जुलै, १९५६ रोजी व तेव्हापासून).

[3] अधिसूचना क्रमांक एस. आर. ओ. २०२६, दिनांक ३ सप्टेंबर, १९५६ अन्वये जादा दाखल केले, पहा **भारताचे राजपत्र**, भाग दोन, विभाग ३, पृष्ठ १५३३, (३० सप्टेंबर, १९५६ रोजी व तेव्हापासून).

[4] अधिसूचना क्रमांक एस. आर. ओ. १९७६, दिनांक ८ जून, १९५७ अन्वये जादा दाखल केले, पहा **भारताचे राजपत्र**, भग दोन, विभाग ३, पृष्ठ १२४२, (३१ जुलै, १९५७ रोजी व तेव्हापासून).

४. अखाद्य वनस्पती आणि प्राणिज तेले आणि चरबी ]

[1][ खनिज तेल संस्करण कारखाना. ]

[2][ (एक) औद्योगिक आणि पावर अल्कोहोल कारखाना, आणि

(दोन) ॲसबेटॉस सिमेंट पत्रे बनवण्याचा कारखाना. ]

[3][ बिस्किटे बनविण्याचा उद्योग, बिस्किटे आणि पाव, मिठाई (कन्फेक्शनरी), आणि दूध व दूध भुकटी यांसारखी उत्पादने बनविणारी संयुक्त युनिटे धरून. ]

[4][ अभ्रक उद्योग. ]

[5][ प्लायवुड उद्योग. ]

[6][ मोटार दुरुस्ती व संधारण उद्योग. ]

[7][ १. भात गिरणी,

२. पीठ गिरणी

३. डाळ गिरणी. ]

[8][ खळ बनविण्याचा कारखाना. ]

[9][ १. पेट्रोलियम किंवा नैसर्गिक वायू समन्वेषण, पूर्वेक्षण, विंधण किंवा उत्पादन.

२. पेट्रोलियम किंवा नैसर्गिक वायू संस्करण. ]

[10][ ३. चामडे आणि चामड्याच्या वस्तू उद्योग. ]

[11][ १. दगडी बरण्या.

२. चिनी मातीची भांडी (क्रॉकरी). ]

[12][ फळे आणि भाज्या टिकवून ठेवण्याचा उद्योग म्हणजेच पुढीलपैकी कोणत्याही वस्तूची निर्मिती किंवा उत्पादन करणारा उद्योग :—

(एक) डबाबंद आणि बाटलीबंद फळे, रस आणि गर,

(दोन) डबाबंद आणि बाटली बंद भाज्या,

(तीन) गोठवलेली फळे व भाज्या,

(चार) मुरंबा, जेली आणि मार्मालेड,

(पाच) टोमॅटो उत्पादने, केचप आणि सॉस,

---

[1] अधिसूचना क्रमांक एस. आर. ओ. २१८, दिनांक १२ जानेवारी, १९५७ अन्वये जादा दाखल केले, पहा **भारताचे राजपत्र**, भाग दोन, विभाग ३, पृष्ठ १७५ (३१ जानेवारी, १९५७ रोजी व तेव्हापासून).

[2] अधिसूचना क्रमांक एस. आर. ओ. ३०६७, दिनांक १९ सप्टेंबर, १९५७ अन्वये जादा दाखल केले, पहा **भारताचे राजपत्र**, भाग दोन, विभाग ३, पृष्ठ २०५८ (३० नोव्हेंबर, १९५७ रोजी व तेव्हापासून).

[3] अधिसूचना क्रमांक जी. एस. आर. १७०, दिनांक १२ मार्च, १९५८ अन्वये जादा दाखल केले, पहा **भारताचे राजपत्र**, भाग दोन, विभाग ३, पृष्ठ १३१ (३० एप्रिल, १९५८ रोजी व तेव्हापासून).

[4] अधिसूचना क्रमांक जी. एस. आर. ३१२, दिनांक ५ मार्च, १९६० अन्वये जादा दाखल केले, पहा **भारताचे राजपत्र**, भाग दोन, विभाग ३ (एक), पृष्ठ ५६९ (३१ मे, १९६० रोजी व तेव्हापासून).

[5] अधिसूचना क्रमांक जी. एस. आर. ६३२, दिनांक ३० मे, १९६० अन्वये जादा दाखल केले, पहा **भारताचे राजपत्र**, भाग दोन, विभाग ३ (एक), पृष्ठ ८५३ (३० जून, १९६० रोजी व तेव्हापासून).

[6] अधिसूचना क्रमांक जी. एस. आर. ६८३, दिनांक ९ जून, १९६० अन्वये जादा दाखल केले, पहा **भारताचे राजपत्र**, भाग दोन, विभाग ३ (एक), पृष्ठ ९५१ (३० जून, १९६० रोजी व तेव्हापासून).

[7] अधिसूचना क्रमांक जी. एस. आर. १४४३, दिनांक २४ नोव्हेंबर, १९६० अन्वये जादा दाखल केले, पहा **भारताचे राजपत्र**, भाग दोन, विभाग ३ (एक), पृष्ठ १८१९ (३१ डिसेंबर, १८६० रोजी व तेव्हापासून).

[8] अधिसूचना क्रमांक जी. एस. आर. ५३५, दिनांक १० एप्रिल, १९६१ अन्वये जादा दाखल केले, पहा **भारताचे राजपत्र**, भाग दोन, विभाग ३ (एक), पृष्ठ ६५४ (३१ मे, १९६१ रोजी व तेव्हापासून).

